

वर्ष - ६ अंक - १६

# अंगारमळा

मार्च २०२२

पिढ्यानपिढ्यांच्या अबोलतेला लिहिते-बोलते करण्याचा एक ईवलासा प्रयत्न

आठवे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, रावेरी
अ.भा. मराठी शेतकरी साहित्य चळवळ
आम्ही लटिके ना बोलू!
पिढ्यानपिढ्यांच्या अबोलतेला
लिहिते-बोलते करण्याचा एक ईवलासा प्रयत्न

- स्त्रीत्वाचे आत्मभान
- स्त्रीत्वाचा आत्मसन्मान

## आठवे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, रावेरी विशेषांक

## १९८८ वर्षापासून लाखो शेतकऱ्यांचे विश्वासपात्र

# प्लॅन्टो कृषीतंत्र

भारत सरकारच्या CSIR/NIO
प्रयोग शाळेने विकसित केलेल्या
तंत्रज्ञानावर आधारित

भारतातील विविध कृषी विद्यापिठांमध्ये
निरनिराळ्या पिकांवरील परिक्षणात
उत्पादन वाढिसाठी प्लॅन्टो
उत्पादने खुपच परिणाम कारक
असल्याचे सिध्द झाले आहे.



**स्व. बाळासाहेब प्रल्हाद विठ्ठलराव चौधरी**
संस्थापक – प्रलशर बायो प्रॉडक्टस् प्रा.लि.




An ISO 9001 : 2008 Certified Company
## प्रलशर बायो प्रॉडक्टस प्रा. लि., गोवा
डी, २/१०, काकोडा इंडस्ट्रियल इस्टेट, कुचेरेंम, काकोडा, गोवा. । महाराष्ट्र : संपर्क :– ☎ ०९४२२२१००८४

Krivic-@ 2022

# अंगारमळा

**Title Code :** MAHMAR47450

**वर्ष ६ । अंक १६ । मार्च २०२२**

**मूल्य : रु. ५०**

**अंगारमळा** हे मासिक मालक, संपादक, मुद्रक, प्रकाशक, गंगाधर मुटे यांनी त्रिवेणी ऑफसेट वर्क्स, प्रयाग ३१२, दक्षिणामुर्ती चौक, महाल, नागपूर-४४००३२ येथे छापून, मु.पो. आर्वी छोटी, ता. हिंगणघाट, जि. वर्धा-४४२३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

संपादक
**गंगाधर मुटे**

अंक मांडणी
**प्रकाश बोपीनवार**

संपर्क :
**अंगारमळा**
**मु.पो. आर्वी (छोटी)**
**ता. हिंगणघाट, जि. वर्धा**
**पीन कोड - ४४२ ३०७**
Email : angarmala2016@gmail.com
Mob. 9730582004, 9730786004

**ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी :**
Angarmala
Punjab National Bank
Branch Hinganghat (Wardha)
A/c No. 0202002100027538
IFS Code : PUNB0020200

अंकातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**Title Code :** MAHMAR47450

## अंतरंग

अनुक्रमणिका ........................................................................ १
कोरोनाने संमेलनाचे कंबरडे मोडले! .... गंगाधर मुटे ........... संपादकीय .......... २
आम्ही लटिके ना बोलू ................ युगात्मा शरद जोशी ... अमृतकुंभ ........... ४
शब्दांची शेती आणि पुस्तकांची
सुगी नको ............................ सौ. प्रज्ञा बापट ....... अध्यक्षीय भाषण .... ५
साहित्यिकांना अनुभवसमृद्ध करणारे
संमेलन ............................... राजेंद्र फंड ........... कव्हरस्टोरी ......... ९
दिल्ली शेतकरी आंदोलनाने काय
कमावले; काय गमावले ................ प्रा. बी.एम. मुटे ....... महाचर्चा ............ १३
कवीसंमेलनाचा वृत्तांत ................ अनिकेत देशमुख ...... वृत्तांत ............... १५
गझल मुशायऱ्याचा वृत्तांत ............. अझीझखान पठाण .... वृत्तांत ............... १९
संमेलनाच्या आयोजनाचे प्रयोजन ....... रवींद्र दळवी .......... आकलन ............ २१
महिला शेतकऱ्यांच्या दुःखाचा उद्गार ... बडीऊज्जमा बिराजदार साहित्यशेती ......... २५
स्त्रीत्वाच्या मर्यादा पाळणेही आवश्यक . तुळशीराम बोबडे ..... मंथन ................ २७
तिचं परगती पत्रक ..................... रावसाहेब जाधव ..... कथा ................ २८
"सीड मदर" राहीबाई ................ डॉ. आदिनाथ ताकटे . व्यासंग परिचय ...... ३३
पहिल्या भारतीय महिला डॉक्टर :
रखमाबाई .............................. सुनीता कोंमावार ...... यशोगाथा ............ ३५
युगात्मा शरद जोशी स्मारक ........................................................... ३९
डोळ्यातील द्राक्ष पाहू दे ................ गंगाधर मुटे ............ मृदगंधा .............. ४२
बांधावरच्या अस्वस्थ नोंदी ............ सचिन शिंदे ........... मृदगंधा .............. ४२
मराठी भाषेची चिंता नकोच ........... श्रीकांत धोटे .......... मायभाषा ............ ४३
मोटर सायकलशी लग्न .................. विनय मिरासे .......... रीती-रिवाज ......... ४५
अनाथांची आई सिंधुताई ............... सतीश मानकर ........ वनिताविश्व .......... ४६
लेक .................................... खुशाल गुल्हाणे ....... मृदगंधा .............. ४७
तू नसल्यावर .......................... अनिकेत देशमुख ...... मृदगंधा .............. ४७
व्यथा .................................. निलेश तुरके .......... मृदगंधा .............. ४८
बोंडसड .............................. रंगनाथ तालवटकर .... मृदगंधा .............. ४८

**- संपर्क प्रतिनिधी -**

● **श्री. रामेश्वर अवचार**, विशेष प्रतिनिधी, मो. ९९६०३३३४३७ ● **प्रा. भुपेश मुडे**, मुंबई, मो. ९२२३५३८०३० ● **श्री. निवृत्ती करडक**, नाशिक, मो. ९३७१२५९५४५ ● **श्री. कडुआप्पा पाटील**, जळगांव, मो. ९३७१२७२७८१ ● **श्री. रमेश खांडेभराड**, जालना, मो. ९४२१३२३६१३ ● **श्री. मदन सोमवंशी**, लातूर, मो. ९७६४०६१८७७ ● **श्री. राजु झोटींग**, यवतमाळ, मो. ९६७३३४६६३५ ● **श्री. शालीक पाटील नाकाडे**, गडचिरोली, मो. ९४०४२२०४३९ ● **श्री. धोंडबा गावंडे**, वर्धा, मो. ९४२००६२८७६ ● **श्री. दिलीप भोयर**, अमरावती, मो. ९४२००७४८८४ ● **श्री. दगडूजी शेळके**, जळगांव, मो. ७७१९९६१०२५ ● **श्री. बाबासाहेब आवचार**, परभणी, मो. ९९२१६३०१७४ ● **श्री. गुलाबसिंह रघुवंशी**, धुळे, मो. ९४२१४७२३१२

# कोरोनाने संमेलनाचे कंबरडे मोडले!

दोन वर्षापूर्वी कोरोना आला आणि होत्याचं नव्हतं करून गेला. कोरोनामुळे कमी-अधिक प्रमाणात सर्वच क्षेत्राला मार बसला पण अंगारमळा आणि अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळ यांचे मात्र चक्क कंबरडेच मोडून गेला.

शेतकरी चळवळीसाठी एखादं नियतकालिक चालवणे हे तसं आधीच अवघड काम होतं. यापूर्वी व्यापक स्तरावर झालेले प्रयत्न सुद्धा पूर्णपणे अपयशी ठरलेले होते. शेतकरी संघटना हे ऐतिहासिक आंदोलन पण या आंदोलनाला सुद्धा एखादं नियतकालिक चालवणे जवळजवळ अवघडच गेलं. शेतकरी संघटनेच्या मुख्यालयातून प्रकाशित होणारे 'शेतकरी संघटक' असो किंवा नाशिकवरून निघणारा आठवड्याचा ग्यानबा असो किंवा औरंगाबाद वरून निघणारा 'स्टॉल सेलेबल' स्वरूपातील 'शेतकरी संघटक' असो; एकही नियतकालिक शेवटपर्यंत चालू शकले नाही आणि ठराविक विशिष्ट कालावधीमध्ये ही नियतकालिके बंद पडलीत. शेतकरी संघटनेचे कार्य ऐतिहासिक आणि व्यापक; पण हे प्रदीर्घ आंदोलन सुद्धा एखादं नियतकालिक चालवू शकलं नाही. एखादं नियतकालिक नियमित का चालू शकलं नाही याचा उहापोह इथे करणार नाही पण चालू शकलं नाही हा इतिहास आहे.

अशा विपरीत स्थितीमध्ये निदान एखादं छोटंसं मिणमिणत्या पणतीसारखं त्रैमासिक किंवा मासिक चालावं अशा अपेक्षेने आपण अंगारमळा सुरू केला. सुरुवातीला त्रैमासिक आणि नंतर त्याचे रूपांतर मासिकांमध्ये झालं. मासिक स्वरूपातील 'अंगारमळा' बाळसे धरत आहे असे वाटत असतानाच अकस्मात कोरोना संकट आलं आणि कंबरडे मोडून गेलं. वैचारिक स्तरावरील मासिकाला आधीच वर्गणीदार मिळणे दुर्मिळ आणि वरून कोरोना संकट. शेतीमध्ये तर वाचनाची परंपराच नाही. जे काही वर्गणीदार मिळालेत त्यांची वर्गणी वर्षभरात संपली. दुसऱ्या वर्षाची वर्गणी पाठवून नूतनीकरण करणारे वाचकही तुरळकच. त्यांचेपर्यंत पोचून वर्गणी मिळवायची ठरवली तर खर्चाला न परवडणारे. वर्गणीदार मिळवण्यासाठी प्रवासावर होणारा खर्च व वर्गणीतून जमा होणारी रक्कम यांचे गणितीय समीकरण बसवणे तर त्याहीपेक्षा अवघड.

वर्गणीदार दूरवर ग्रामीण भागातील असल्याने सर्वापर्यंत अंगारमळा पोहोवचणे पोस्ट खात्याला कधी नीट जमलेच नाही. पोस्ट खात्याचा कारभार असा की, काही वर्गणीदारापर्यंत वर्षभरात एक सुद्धा अंक पोचला नाही. रजिस्टर पोस्ट करून अंक पाठवणे वर्गणीच्या तुलनेत अशक्य असले तरी काही लोकांना नाईलाजाने अंक पाठवण्याचा प्रयत्न करावा लागला. हा सर्व एकंदरीत विचार करता कोरोना पश्चात काळात मासिक स्वरूपात किंवा त्रैमासिक स्वरूपात अंगारमळा चालवणे अवघड आणि अशक्यप्राय झाले आहे.

जी स्थिती अंगारमळ्याची तीच स्थिती अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळीची. शेतकरी साहित्य चळवळीकडे स्वतःचा निधी नाही. या चळवळीला कुणी गॉडफादर नाही. चळवळीचे स्वरूप प्रस्थापित साहित्यिकांच्या आणि सरकारच्या विरोधात विद्रोही स्वरूप असल्याने प्रस्थापितांचे सहकार्य नाही व राजाश्रयही नाही, परिणामतः शासकीय अनुदानही नाही. अशा स्थितीत निव्वळ लोकवर्गणी आणि जाहिरात या दोन आर्थिक स्रोतांच्या बळावर आपण सहा शेतकरी संमेलने आयोजित केली. सहा वर्ष फारशी चणचण न गेल्याने आपण भव्य-दिव्य स्वरुपात सहा मराठी शेतकरी साहित्य संमेलने आयोजित करू शकलो पण कोरोना आला आणि पूर्णपणे घडी विस्कटली. लोकवर्गणी मिळवायला जश्या मर्यादा आल्यात तशाच शेती संबंधित उद्योग-व्यवसाय कोरोनामुळे मेटाकुटीस आल्याने जाहिराती मिळणे सुद्धा फारच अवघड झाले, जवळ जवळ बंदच झाले.

एक तर शेती संबंधित कुठल्याही उपक्रमाला लोकाश्रय मिळत नाही, लोकवर्गणी मिळत नाही, जाहिराती मिळत नाहीत आणि राजाश्रय सुद्धा मिळत नाही हे नेहमीचे दुखणे. शेतकरी फार मोठा ग्राहक नसल्याने शेती संबंधित साहित्याची जाहिरात दिल्याने जाहिरातदारांना त्याचा परतावा मिळत नसल्याने जाहिरातदार अनुत्सुक असतात. अन्य उत्पादनांच्या म्हणजे बिगर शेतमालाच्या जाहिराती मिळणे तर केवळ अशक्य. संमेलनाच्या आयोजनासाठी

पै-पै भीक मागत फिरावे तसे फिरताना कधी मानखंडना तर कधी अवहेलनाही वाट्यास येते. एवढे सहन करून सुद्धा जेव्हा अपेक्षित यश मिळेनासे होते तेव्हा हा सारा फाफटपसारा एकदाचा बंद करून टाकावा अशी एकदा नव्हे तर अनेकदा मनोदशा होऊन जाते. पण; ज्यांचा साहित्याशी दुरान्वयानेही संबंध नाही ती मंडळी जेव्हा निरपेक्ष भावनेने दातृत्वाचा हात पुढे करून सहकार्य करते तेव्हा परत एकदा मनावरील मरगळ झटकली जाते आणि ही ध्वजा आणखी जोमाने पुढे नेण्याची उर्मी उफाळून येते.


सद्यस्थितीत आजवर आपण साहित्यप्रेमी नव्हे तर युगात्मा शरद जोशींवर नितांत प्रेम करणारी मंडळी शोधून त्यांच्याकडून थोड्याफार जाहिराती व निधी मिळवत आलो आहोत आणि केवळ प्रेमाखातर ते सुद्धा जाहिरात-निधी देत आलेले आहेत. काही मोजक्या सहृदयी दातृत्ववृत्तीच्या सहकाऱ्यांच्या बळावर आठ संमेलने पार पडलीत पण पुढील भविष्यकाळात शेतकरी साहित्य संमेलनाला आयोजनापुरता तरी निधी मिळेल किंवा नाही अशी परिस्थिती निर्माण व्हायला लागली आहे. मात्र स्थिती कितीही अवघड आणि बिकट असली तरी शेतकरी मराठी शेतकरी साहित्य संमेलन थांबवणे हा त्यावरचा पर्याय ठरू शकणार नाही हेही तितकेच किंवा त्यापेक्षा जास्त महत्त्वपूर्ण आहे.

संबंध सृष्टीच्या उत्पत्ती आणि उत्क्रांतीच्या काळामध्ये अर्थात जेव्हापासून लेखणीच्या माध्यमातून साहित्य निर्माण व्हायला लागले, निदान तेव्हापासून तरी भूमीच्या सृजकांना स्वतंत्र आणि हक्काचे व्यासपीठ मिळाले असा इतिहासात दाखला मिळत नाही. याउलट शेतीशी संबंध नसलेली बिगरशेती साहित्य संमेलने गल्लीबोळापासून ते दिल्लीबोळापर्यंत आयोजित झाल्याचे इतिहासात पानापानावर नमूद झाल्याचे दिसत आहे. विभागवार साहित्य संमेलन जसे की विदर्भ साहित्य संमेलन, मराठवाडा साहित्य संमेलन, कोंकण साहित्य संमेलन, विद्रोही साहित्य संमेलन, विनोदी साहित्य संमेलन, दलित साहित्य संमेलन, गोंडवाना साहित्य संमेलन, ग्रामीण साहित्य संमेलन, झाडीबोली साहित्य संमेलन, वऱ्हाडीबोली साहित्य संमेलन, अहिराणी साहित्य संमेलन, कामगार साहित्य संमेलन, शिक्षकांचे साहित्य संमेलन, नोकरदारांचे साहित्य संमेलन.... किती किती नावे घ्यावीत? सर्व तऱ्हेची साहित्य संमेलने होतात पण होत नाही ते एकमेव साहित्य संमेलन म्हणजे शेती आणि शेतकऱ्यांचे साहित्य संमेलन. अशा स्थितीत आपण इतिहासाला कलाटणी देऊन नवीन पायंडा पाडणारं, शेती साहित्याचा झेंडा रोवणारं साहित्यसंमेलन आयोजित केलं आणि सलग आठ वर्षे आठ साहित्य संमेलन यशस्वीपणे पार पाडलीत.

एकंदरीत विचार करता असेच जाणवते की ही मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित करण्याची जबाबदारी नियतीने आपल्यावर टाकलेली आहे. आपण थांबलो तर दुसरे कुणीतरी शेतकरी साहित्य संमेलनाची पताका पुढे नेतील अशी निदान आजची स्थिती नाही. वसुंधरेच्या यथास्थिती वास्तवाच्या सृजनाची पायाभरणी होऊन शेती साहित्याची ध्वजा उंचावणारे नवीन हात आणि शेतीचे सृजन ऐकणारे नवीन रसिक कान निर्माण होईपर्यंत तरी नियतीने टाकलेल्या जबाबदारीपासून आपल्याला दूर पळता येईल असे वाटत नाही आणि ते समयोचितही होणार नाही. एकंदरीत निष्कर्ष इतकाच की, साहित्य संमेलने आयोजित होणे ही आजची काळाची गरज आहे आणि ती पेलण्याची जबाबदारी स्वीकारणे ही सुद्धा काळाचीच गरज आहे.

सोकावलेल्या अंधाराला, इशारा आज कळला पाहिजे
वादळ येऊ दे कितीही पण, हा दीप आज जळला पाहिजे

परिस्थिती कशीही येवो, इलाज असो किंवा नाईलाज... भविष्यातील संभाव्य बऱ्यावाईट स्थितीमध्ये आपल्याला नकारात्मक विचाराऐवजी सकारात्मक विचार करून पुढील वाटचाल सुरूच ठेवावी लागणार आहे. जसे शक्य होईल तसे पण शेतकरी साहित्य संमेलन आयोजनाचा आपण घेतलेला वसा यापुढेही आपण आपल्याला असाच पुढे न्यावा लागणार आहे. त्यासाठी आपले आधीच मजबूत असलेले आपले खांदे आणखी मजबूत करावे लागतील.... दुसरा, तिसरा,चवथा..... अन्य कोणताही पर्याय दृष्टिपथात दिसत नाही.



**- गंगाधर मुटे आर्वीकर**

# आम्ही लटिके ना बोलू

**युगात्मा शरद जोशी**



अमृतकुंभ

वर्तमानपत्रांत, मासिकांत आपल्या जवळच्यापैकी कोणाचे नाव, फोटो छापून आले म्हणजे आपण केवढ्या कौतुकाने तो अंक मिळवितो, वाचतो, जपून ठेवतो! म्हणजे साहित्यात आपले, आपल्या ओळखीचे आपण शोधत असतो. मग, खरे म्हटले तर, शेतावर राबणाऱ्या आपल्या सगळ्यांच्या आयुष्याचे चित्रण, प्रतिबिंब आपण साहित्यात शोधायला पाहिजे.

दर वर्षी पावसाळा यायच्या आधी बी-बियाण्यांची जमवाजमव, खर्चासाठी सावकाराची मिनतवारी, सोसायटीतली कारस्थाने, भानगडी, पाऊस येतो किंवा नाही याची चिंता, आल्याचा आनंद, येत नसला तर पोटात उठणारा भीतीचा गोळा, पिकावर येणाऱ्या तणांच्या आणि रोगांच्या धाडी, पीक उभे राहिल्यावर होणारा आनंद, बाजारात गेल्यावरची शोकांतिका, वाढते कर्ज, पुढाऱ्यांची मग्रुरी, आग लागल्यावर घरातून निसटताना व्हावी तशी गावच्या आयुष्यातून सुटण्याची ज्याची त्याची स्वतःपुरती धडपड या किड्यांसारख्या जीवनात लिहिण्यासारखी प्रचंड सामुग्री आहे; पण ७० टक्के लोकांच्या आयुष्याचे प्रतिबिंब साहित्यात कधीच पडले नाही.

खुरपताना, गवत काढताना, पिके काढताना, जात्यावर दळताना शेतकरी स्त्रियांनी उत्स्फूर्त म्हटलेली गाणी माळरानातच विरून गेली; मोटेवर, नांगरावर बैलांच्या साक्षीने शेतकऱ्यांनी ढाळलेले दुःखाचे कढ तापलेल्या जमिनीतच जिरून गेले.

शेतकऱ्याची पिके लुटून नेलेल्या दरोडेखोरलुटारुंच्या तळांवर गायिली गेलेली उत्तान, उन्मत्त गाणी साहित्यात आली.

मोठ्या लुटारुंनी दरबार भरवायला सुरुवात केल्यावर त्यांचे कौतुक करणाऱ्या भट-शाहिरांची प्रतिभा गाजली, त्यांचे मनोरंजन करणाऱ्या कलावंतिणींच्या लावण्यांचा पूर आला, संगीताच्या मैफिली झडू लागल्या.

पिके लुटून पेठा, शहरे वसवणाऱ्या व्यापाऱ्यांच्या, कारकुनांच्या समाजाचे साहित्य तयार झाले. साहित्य असो, संगीत असो, कला असो- शेतकऱ्याचे असे त्यात काहीच नाही.

इतिहास जसा विजेते लिहितात तसेच साहित्य-संगीत-कला सुद्धा विजेत्यांच्याच असतात. आमचे काहीच नाही; मग आम्हाला लुटणाऱ्यांच्या लावण्या-तमाश्यांत आम्ही आपले मनोरंजन करून घेऊ लागलो; पण त्यात चंद्रकांत राजाच्या मुलीची कहाणी आली, शेतकऱ्याच्या मुलीची नाही.

मग, त्यातले त्यात जवळचे साहित्य आम्हाला संतांचे वाटू लागले. कुठेतरी देव आहे, स्वर्ग आहे, मुक्ती आहे; एका नामात गुंगले की सर्व दुःखाचा विसर पडतो; 'शेवटी, देहाच्या दुःखाचा विचार काय करायचा? आत्मा अमर आहे.' या दिलाशात गावोगाव 'रुप पाहता लोचनी'च्या भजनात आम्ही सुटका शोधू लागलो.

शहरात गेलेली शेतकऱ्यांची पोरे शहरांत रमली. त्यात लिहिण्याचे कसब असणाऱ्यांनी गावाविषयी लिहिले; पण, शहराला काय पटेल, काय आवडेल याचाच विचार करीत लिहिले. 'हरामखोरांनो! तुम्ही माझे गाव लुटले, या पापाचा तुम्हाला झाडा द्यावा लागेल.' हा टाहो कोणी फोडला नाही. उलट, आपल्या ग्रामीण जन्मामुळे साहित्यात आपल्याला काही राखीव जागा असावी असा आक्रोश करणारी एक साहित्य आघाडी उभी झाली. शेतकऱ्यांच्या दुःखाचं भांडवल करून त्यावर साहित्यक्षेत्रात स्थानाचा जोगवा मंडळी मागू लागली.

दूरदर्शन आता गावोगाव येईल. आज त्यावर अनेक कथा चालू आहेत. हमलोग, खानदान, ये तो है जिन्दगी, रजनी इत्यादि, इत्यादि. या 'हमलोग' मध्ये आम्ही लोक कुठेच नाही. खानदानी शेतकरी कुटुंब नाही, या जिन्दगीत आमचे आयुष्य कोठेच नाही. पाच टक्क्यांच्या आयुष्याच्या चित्रणाने ९९ टक्के दूरदर्शन भरला आहे; पण, आपल्या घरच्या लुटून नेलेल्या वैभवाने भरलेल्या त्यांच्या महालांचे आम्ही जिभल्या चाटीत कौतुक करतो; 'हे आमचे आहे' या विचाराने संतापून उठत नाही.

हे अपरिहार्य आहे. साहित्य गुलामांचे नसते, विजेत्यांचे असते. सगळ्या जगाकडे बघायचे झाले तर इंग्रजी वाङमयाच्या वैभवशाली दरबारात इंग्रजीची ऐट दाखवणाऱ्या इंडियन लेखकांना इंडियातील ग्रामीण साहित्यिकांइतकेसुद्धा स्थान नाही. ताकद साहित्याची नसते, ताकद त्यामागील समाजाच्या सधनतेची असते. युरोपातील देश आज इंग्रजी शिकत नाहीत, अमेरिकी शिकतात. आम्ही अक्षरशः गुलामांचे गुलाम आहोत.

शेतकरी संघटनेच्या कामाच्या ओघात माझ्या लक्षात आले की, शेतकऱ्यांची जीभ कापली गेलेली आहे. दुसऱ्या कुणाची तरी जीभ लावूनच त्यांना बोलता येते. (ग्रामीण साहित्यिक शहरी विद्वानांची जीभ लावतात, पुढारी मुंबईची जीभ लावतात. अगदी सोसायटीचा सेक्रेटरीसुद्धा तालुक्याची जीभ लावून बोलतो. शेतकऱ्याच्या जिभेने कोणीच बोलत नाही.)

आम्ही बाललेले जगात ऐकले जाईल अशी साधने आमच्याकडे नसतील, शेती लुटून औद्योगिकीकरण करणारी व्यवस्था संपेपर्यंत ती साधने आमच्याकडे येणारही नाहीत; पण तोपर्यंत आमची जीभ तोंडात सलामत ठेवली पाहिजे. शब्द कसेही येवोत - अशुद्ध, बोबडे, वेडेवाकडे, तालहीन, सूरहीन, सौंदर्यहीन- पण त्यांतला अर्थ हा आमच्या अनुभूतीचा प्रामाणिकपणा टिकवणारा पाहिजे. साहित्याच्या बाजारी 'मुंगी व्याली, शेळी झाली' वाङमयाला उठाव असला तरी निदान आमच्या आमच्यात तरी आमचा निश्चय 'आम्ही लटिके ना बोलू'.

आमची गुलामगिरी, आमचे नाकर्तेपण अर्थकारणातून राजकारणात गेले, समाजकारणात गेले; साहित्यात आणि संस्कृतीच्या क्षेत्रात एक कण जिवंत ठेवू शकलो तर त्या बीजातून शेतकरी आंदोलन यशस्वी झाल्यावर नव्या प्रामाणिक संस्कृतीचे तरू कोटी कोटी तयार होतील.

(शेतकरी संघटक २५ जुलै १९८५)

# शब्दांची शेती आणि पुस्तकांची सुगी नको

सौ. प्रज्ञा बापट



**अध्यक्षीय भाषण**

ज्यांनी विचार करायला शिकवलं, शेतकऱ्याची घरलक्ष्मी असल्याचा आनंद ज्यांच्यामुळे कळला, त्या आदरणीय युगात्मा शरद जोशी यांच्या, तुमच्या माझ्या सगळ्यांच्या मनात असलेल्या स्मृतींना अभिवादन. मंचावरच्या आदरणीयांना प्रणाम आणि सगळ्या सारस्वतांना माझा नमस्कार.

हे साहित्य संमेलन आगळंवेगळं आहे. वाल्मीकीच्या रामायणाचं लोक साहित्यातलं प्रतिबिंब इथे अक्षरशः मूर्त रूप घेऊन उभं आहे. युगात्मा शरद जोशींनी मूर्ती नव्याने घडवल्या, मंदिराचा जीर्णोद्धार केला. रावेरीचं परित्यक्ता सीतामंदीर, स्वयंसिद्धा सीतामंदिर झालं. जुने संदर्भ नव्याने मांडून त्यांच महत्त्व इथे अधोरेखित झालं. त्या वेळी शेतकरी संघटना आणि महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी यासाठी जिवाचं रान केलं. महिला आघाडीसाठी हे अतिशय आदराचं आणि आनंदाच ठिकाण आहे. म्हणून अध्यक्ष पदावर महिला आहे.

साहित्यिक म्हणजे शब्दप्रभू! साहित्यात समाजाचं प्रतिबिंब असतं. समाज म्हणजे आपण सगळे. आपल्या जगण्याचे प्रतिबिंब म्हणजे साहित्य. काय असतं आपलं जगणं? आपल्याला अन्न,वस्त्र, निवारा हवं असतं, ते मिळावं - रोज मिळावं आणि आज आहे त्यापेक्षा दिवसेंदिवस चांगलं मिळत राहावं, यासाठी आपण संपत्ती गोळा करतो. नुसती संपत्ती असून चालत नाही, आपल्याला सगळ्यांनी चांगलं म्हणावं अशी आपली इच्छा असते. म्हणजे आपल्याला सन्मान हवा असतो. संपत्ती आणि सन्मान सतत मिळत राहण्याकरिता आपल्याला सत्ता आवश्यक वाटते. संपत्ती, सन्मान आणि सत्ता या तीन गोष्टींच्या असण्यात आणि नसण्यात कथा कवितांची बीज असतात जे साहित्यिक या तीन गोष्टी शिवाय अप्रतिम शब्दलेणी घडवतात ते संत असतात. संत साहित्याचा विषय - शाश्वत समाधान. सगळे संत शाश्वत समाधानात शांत असतात. आपण संपत्ती, सन्मान आणि सत्ता यांच्या वर्तुळात फिरत असतो आणि या तिन्हींची वर्तुळं मोठी मोठी होत जावीत अशी आपली धडपड असते.

साहित्याचा आणखी एक विषय स्त्री-पुरुष संबंध. हजारो हजार वर्षांपूर्वी, स्त्रीपुरुष संबंध अनिर्बंध होते. माणसाने अनुभवाने, आरोग्याच्या निकषांवर त्याचे नियम ठरवले. त्या-त्या प्रदेशातील ऋतुमान आणि माणसाची जीवन पद्धती लक्षात घेऊन, स्त्री-पुरुषांचं वैयक्तिक आरोग्य, संततीच आरोग्य, परिणामत: समाजाच शारीरिक मानसिक आरोग्य लक्षात घेऊन सगळ्या जगभर या संबंधांचे नियम ठरवल्या गेले. माणसाच्या बौद्धिक उत्क्रांतीच्या दरम्यान त्याला नैतिकतेचा आयाम मिळाला म्हणून अनेक देशात, अनेक समाजात या नियमांमध्ये खूप फरक दिसतो: पण जगाच्या पाठीवर सगळ्या देशात, सगळ्या समाजात हे नियम आहेत. नियम पाळणे किंवा तोडणे हा ज्याचा त्याचा विचार आहे. म्हणजे संपत्ती, सन्मान, सत्ता आणि संबंध याचं वर्णन म्हणजे साहित्य! या विषयांवर लेखक - कवी - लिहितो, कारण त्याच्याजवळ अनुभव असतो. अनुभव हे बीज आहे. विचारांमुळे त्या अनुभवाला शब्दाचे अंकूर फुटतात. अर्थवाही वाक्यांचे धुमारे फुटतात.

साहित्याच्या विषयावरून, साहित्य निर्मितीच्या काळावरून, साहित्यिकाच्या जातीवरून आणि आता साहित्यिकाच्या राजकीय भूमिकेवरूनही साहित्याची विभागणी होते. साहित्याचा दर्जा मात्र विधायक परिणामांवरून ठरतो. क्लिष्ट, अलंकारांनी जड झालेली भाषा वाचताना शीण येतो. भाषा साधी सोपी असेल तर मन लावून वाचलं जातं. भाषा उगीचच उग्र असेल तर मनस्ताप होतो. भाषा शिवराळ असेल तर उथळपणाचा खळखळाट वाटून पुस्तक न वाचता मिटल्या जातं.

शेती आणि शेतकरी या विषयांवर हजारो कथा, कविता, कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. शेती व्यवस्थेने किती तरी विषय दिले साहित्यिकांना. काळी आई, भेगाळलेली जमीन, डोळ्यातला पाऊस, उशिरा येणाऱ्या पावसाचा कौतुक, पेरणी, ढवळ्या-पवळ्या, सर्जा-राजा, कारभारणीची हिरवी स्वप्नं, विहीर, मोटेवरची गाणी, हिरवा शालू, मोत्यांची कणसं, पांढरं सोनं - हे कौतुक वाटण्याचे विषय! तर ओला, कोरडा दुष्काळ, पीक करपणं किंवा पूर-पीक वाहून जाणं, गारपीट, शेतमाल मातीत मिसळणं, भाव न मिळणं, कांदे-टमाटे फेकून देणं, उलटी पट्टी, मुलांना बायकोला चप्पल कपडे आणता न येणं, मुला-मुलींना चांगलं शिक्षण देता न येणं, त्यांची शहराकडे धाव, तिथे निर्वासितांचं अधांतरी जगणं, शहरी राहणीची भूल पडणं, वाईट संगत, व्यसन लागणं, आयुष्याचं पोतेरं होणं आणि...... आत्महत्या हा आणखी एक विषय. आजकाल शेतीपेक्षाही जास्त महत्त्वाचा. शेतकऱ्यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग.... राजकारण! ग्रामपंचायत ते लोकसभा व्हाया जिल्हा परिषद.. मग ग्रामीण नेतृत्व, सरपंच, पाटील, आमदार - खासदारांच्या संस्था आणि संस्थानांमधली बेधुंदशाही. त्या कुरणात चरणारी धूर्त नोकरशाही, नोकरीसाठी लाचार होणारी शेतकऱ्यांची मुलं-मुली.... हे वैफल्य यावं असे विषय. किती किती तरी विषय दिलेत शेतीने साहित्यिकांना! कविता करा, कथा लिहा, नाटक-कादंबऱ्या लिहा, सिनेमे काढा.... विषयच विषय! या सगळ्या विषयांवरच्या साहित्यकृती अतिशय उत्तम असतात. दर्जेदार असतात; पण या साहित्यकृतीमुळे शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची

आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक स्थिती सुधारली नाही. ही परिस्थिती बदलायला साहित्यिकांनी मदत करावी, एवढीच रास्त अपेक्षा आम्ही शेतकरी करत आहोत. साहित्यिकांनी छातीवर बिल्ला लावून आंदोलनात उतरावे अशी अपेक्षा नाही. पण लेखणीची धार आणि शब्दाचं वजन वापरून, आपला बुद्धिजीवीपणा पणाला लावून समाजाला वस्तुस्थितीचे भान साहित्यिक करून देऊ शकतात ना? शेतीने पुरवलेल्या विषयांवर फक्त मनोरंजनासाठी न लिहिता वास्तव आणि त्याचे भयानक परिणाम जे बिगर शेतकरी, शहरी सुशिक्षितांना सुद्धा भोगावे लागतील - ते साहित्यिकांनी सांगितले पाहिजेत, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

माननीय जयंत नारळीकरांनी विज्ञानकथा ही एक नवीन संकल्पना कथा विश्वात रुजवली. आता साहित्यिकांनी सत्यघटनांवर आधारित कृषी - विज्ञानकथा लिहाव्या अशी अपेक्षा आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करून उत्पन्न कसं वाढतं, बीटी आणि एचटीबीटी बियाणं, जनुकीय सुधारणा केलेलं बियाणं वापरून - शेतकरी कर्जाच्या विळख्यातून कसा मोकळा होतो. शेतकरी आणि त्याच्या घरलक्ष्मीचे कष्ट, पैसा आणि वेळ कसे वाचू शकतात..... या सत्यकथा साहित्यिकांनी लिहाव्यात अशी अपेक्षा आहे.

आज शेतीव्यवसायच तोट्याचा. शेतीत कष्टणारे मायबाप नोकरी देणारं शिक्षण देऊ शकले नाहीत म्हणून मुलं-मुली मायबापांना मानत नाहीत, जुमानत नाहीत. शेती करणाऱ्या मुलांची लग्न होत नाही. शेतकऱ्याशी लग्न ठरलं तर मुली जीव देतात. शिक्षणासाठी शहरात आलेली काही मुलं-मुली वाईट संगतीला लागून आयुष्याची लक्तरं करून घेतात. कुटुंबाच्या स्थैर्याला तडे जातात. कुटुंब ही मानवी उत्क्रांतीची सर्वोत्तम व्यवस्था आहे. ग्रामीण भागात अजूनही कुटुंब व्यवस्था भक्कम आहे. शेतकरीन गरीब असेल पण नात्यांची श्रीमंती तिने जपली आहे. कुटुंब तुटल्याचे परिणाम शहरी - सुखवस्तू - पुरोगामी समाजात दिसत आहेत. नाती जोडून ठेवण्याची, दुसऱ्याला समजून घेण्याची या लोकांची कुवत दिवसेंदिवस कमी होत आहे. युगात्मा शरद जोशींनी शेतकरी कुटुंब हेच सुखाचं एकक मानलं. आम्हा शेतकरी बहिणींना त्यांनी चांदवडची शिदोरी दिली. त्यातल्या एका - एका वाक्यात कथा - कवितेचे बीजं आहेत. फक्त सकारात्मक दृष्टिकोन हवा. युगात्मा शरद जोशींनी स्वयंसिद्धा सीतामंदिर बांधलं. समोर एक सभागृह बांधलं. परित्यक्ता प्रशिक्षण केंद्र असं त्याचं बटबटीत पुरोगामी नाव ठेवता आलं असतं पण त्याचं नाव ठेवलंय माहेर कारण नात्याचा सन्मान सर्वोच्च. वाल्मीकी आणि जनक जसे सीतेच्या पाठीशी बाप होऊन उभे राहिले तश्या बापांची समाजाला गरज आहे. समाजात परित्यक्ता असूच नये, पण चुकून कोणी दुर्दैवी असेल.... असा बाप तिच्या पाठीशी उभा राहिला तर परित्यक्ता - स्वयंसिद्धा होते. हा त्या बाप माणसाचा मोठा विचार! हा विचार घेऊन साहित्यिकांनी लिहितं व्हावं अशी अपेक्षा आहे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा सतत चर्चेत येणारा शब्द. अभिव्यक्ती स्वातंत्र्य ही सुबुद्ध समाजाची विशेषता आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य सगळ्यांना असलंच पाहिजे; पण कुठलंही स्वातंत्र्य फुकटात मिळत नाही. त्यासाठी किंमत मोजावी लागते. अभिरुची असेल तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य कायम राहतं अन्यथा स्वातंत्र्य नासतं. विनोदी लेखन सुद्धा अभिरुची असेल तर सशक्त होतं. त्या विनोदावर सगळ्यांनाच खळाळून हसू येतं. नाहीतर कीव करावी असे विनोद आपल्याला बघावे, ऐकावे, वाचावे लागतात.

साहित्यिकांनी विद्रोही सुद्धा असलंच पाहिजे. त्याशिवाय तुंबलेल्या विचारांवरचं शेवाळ दूर कसं होणार? विद्रोही साहित्यातही अभिरुचीचं भान असेल तर त्या विद्रोहाचा परिणाम कायम राहतो. खरंतर साहित्याला विद्रोही असं नाव देण्याची गरजही भासू नये. उलगुलान ची हाक देणारा - बिरसा मुंडा - समाजाला मिळतो. नंतर त्याचं जगणं महाश्वेतादेवींच्या लेखणीतून त्याच ताकदीनं साहित्यात येतं. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या क्रौर्याची आणि मिशनऱ्यांचा ढोंगी प्रेमळपणाची आपल्याला चीड येते. ते तर परकेच, पण इथल्याच कुळवंत जमीनदारांनी, जंगलच्या ठेकेदारांनी मुडांचा तिरस्कार करणं, त्यांना लुटून भिरकावून देणं आपल्याला अस्वस्थ करतं. आरण्येर अधिकार वाचतांना कृष्णभारत महाश्वेतादेवींच्या शब्दाशब्दातून जाणवतो, पानापानावर दिसतो.

विद्रोही साहित्याचं आणखी एक देखणं रूप म्हणजे बहिष्कृत भारत आणि मूकनायक. बहिष्कृत भारताच्या प्रत्येक अंकात पहिल्या पानावर ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायातली ओवी आहे.

**आता कोंदंड घेऊनि हाती। आरूढ पांइये रथी।**
**देई अलिंगन वीरवृत्ती। समाधाने।**
**जगी कीर्ती रुढवी। स्वधर्माचा मानु वाढवी।**
**इया भारापासोनि सोडवी। मेदिनी हे।**
**आता पार्थ निःशंकु होई। या संग्रमा चित्त देई।**
**एथ हे वाचूनी काही। बोलो नये।**

प्रत्येक शब्द अर्थ आणि संदर्भ घेऊन उभा आहे. यातला देखणा वाक्यांश - जगी कीर्ती रुढवी! रुढवी म्हणजे वाढवी. पण त्यात आधी रुढी सारखं रुजणं आहे. मातीत मुळं रोवणं आहे. मातीत कष्टाची मूळ रुजल्याशिवाय कीर्ती उगवून येत नाही. चार दिवसांची टिमकी म्हणजे कीर्ती नव्हे. कीर्ती मागून, पैसे मोजून, भीती दाखवून, ओरबाडून, मारून टाकूनही मिळत नाही. आयुष्यभर मातीत घट्ट रुतून-रुजून काम केल्यावर ती मिळते. संघटनेत आयुष्यभर मातीतून रुतून-रुजून काम केलेल्या व्यक्ती आहेत.... त्यांची व्यक्तिचित्रं साहित्यिकांनी रेखाटावी.

**मूकनायकात तर जगद्गुरू तुकोबाराय ठणकावून सांगतात.**
**काय करू आता धरूनिया भीड।नि:शंक हे तोंड वाजविले।।**

**नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण ।सार्थक लाजून नव्हे हीत।।**
**आले ते उत्तर बोलो स्वामीसवे।धीट नीट जीवे होऊनिया।।**
**तुका म्हणजे जीवा समर्थांशी गाठी।घालावी हे मांडी थापटूनी।।**

किती उंचीवर नेऊन ठेवलंय विद्रोहाला! विद्रोह करतांनाच कृतीत विधायकता आहे. म्हणून हा विद्रोह आजही धगधगता आहे. तोडा, फोडा, मोडा, झोडा. कापा, पेटवून द्या, जाळून टाका..... रस्त्यावर उतरून दहशत पसरवणे म्हणजे विद्रोह नव्हे. विद्रोह हे क्रांतीचं बीज आहे. बियाणं सशक्त जोमदार असेल तर झाड उगवून. तरारून येतं. उथळ अशक्त विद्रोहातून उन्मादाची आणि वैफल्याची खुरटी झुडपं येतात. क्रांती लाट किंवा पूर नसते. लाट विरते पूर ओसरतो– चिखल रोगराई देऊन जातो. अशी क्रांती समाजाला पुन्हा गर्तेत ढकलते. एक व्यवस्था नाकारतांना, दुसरी निरोगी, स्वच्छ, सशक्त व्यवस्था उभी करण्याची सकारात्मकता हवी.ती आपल्याला युगात्मा शरद जोशींनी शिकवली. समाजवादी म्हणजेच शोषणवादी व्यवस्था नाकारतांना, स्वातंत्र्यवाद मांडतांना शरद जोशींनी शेतीचा, मातीचा, पाण्याचा, बियाणांचा, खतांचा, बाजारपेठेचा, लुटीच्या कायद्यांचा, अर्थव्यवस्थेचा आणि अनर्थव्यवस्थेचाही अभ्यास करायला शिकवलं. माज घरात जाऊन निगुतीने पदार्थ रांधायला सांगितलं. ते विकायला शिकवलं. अभ्यास करून, अनुभव घेऊन भांडायचं, वाद घालायचा. धीट नीट जीवे होऊनिया. कृषीकारण आणि अर्थकारण या विषयांची वैचारिक उधारी–उसनवारी करणारे कथित शेतकरी नेते आणि शरद जोशींच्या पाठशाळेतला अभ्यासू शेतकरी यातला फरक साहित्यिकांनी समाजापुढे आणावा अशी अपेक्षा आहे.

आपल्या व्यवहारात भाषेला खूप महत्त्व आहे. ग्रामीण भाषा मातीशी, शेतीशी जोडलेली असते. पण ग्रामीण भाषा म्हणजे भ ची बाराखडी नव्हे. शिव्या देऊन लिहिणं, बोलणं कुणी कुणी पुरोगामीपणाचं लक्षणं मानतात. स्त्रियांचा अपमान होईल असे शब्द, अशी भाषा पुरोगामी कशी असेल? स्त्रियांना दुय्यम मानणं हाच मुळी प्रतिगामीपणा आहे. जुनाट, बुरसटलेल्या, रूढिग्रस्त विचारांच्या लोकांची, स्त्रिया त्यांची मालमत्ता असल्याचे जे समजत होते अशा कोणे एकेकाळच्या अप्रगत लोकांची ती भाषा आहे. स्त्री पुरुषांच्या प्रत्येक नात्याला सन्मानांनी सांगणं हा पुरोगामीपणा आहे. नात्यांचा सन्मान करणं ही वैचारिक प्रगल्भता आहे. यासाठी साहित्यिकांचं सहकार्य हवं!


स्वतःला पुरोगामी म्हणवणारे आजकाल शाळकरी मुलांची प्रेमप्रकरण रंगवत असतात. सहावी सातवीतल्या मुलामुलींची प्रेम प्रकरणं, असे सिनेमे, अशा मालिका फार प्रसिद्धी पावतात. मुलामुलींच्या शिक्षणात हा असा अडथळा? मग बालविवाहाला विरोध करणाऱ्या, स्त्री शिक्षणासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या, महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाईंची आठवण फक्त फोटोला हार घालण्यापुरती? जिजाऊच्या लेकी, सावित्रिच्या लेकी..... फक्त भाषणाचा विषय? आधीच ग्रामीण भागात शैक्षणिक गुणवत्ता कमी..... त्यात शाळेच्या पाऊलवाटेवर लागणारा हा चकवा! कसं शिकायचं खेड्यातल्या मुलामुलींनी? याचा परखडपणे विरोध करून ग्रामीण मुलामुलींच्या शिक्षणाची पाऊलवाट साहित्यिक सुरक्षित करतील अशी अपेक्षा आहे.

आजकाल छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांची नावं, उठता बसता घेण्याची पद्धत आहे. शेतकऱ्यांच्या शेतातल्या भाजीच्या देठालाही हात न लावण्याची आज्ञा शिवाजी महाराज लिखित पत्रात देतात. छत्रपती संभाजी महाराज शेतकऱ्यांना शेतीसाठी कायद्यांनी संरक्षण, प्रोत्साहन देतात. प्रसंगी खाजगीतून मदत देतात. त्यांनी कायदे करून शेतीला संरक्षण दिलं. आज कायदे करून शेतीची लूट होत आहे. स्वतंत्र भारतात दोन–अडीचशे कायदे शेती विरुद्ध आहे. शेतकऱ्यांच्या आसुडाबद्दल बोलतांना बोलणारे अशा अभिनिवेशात बोलतात की जणू काही तेच महात्मा फुले आहेत. पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कसं फसवलं जातात, असाहाय्य, अगतिक केलं जातं. स्वार्थासाठी शेतकऱ्यांना कसं वापरलं जातं. हे सगळ्यांनी अनुभवलं आहे. या विषयावर लिहिण्यात जोखीम आहे खरी, पण साहित्यिक हे आव्हान पेलतील अशी अपेक्षा आहे.

साहित्यात भारताचे चित्र दिसते, इंडियाचेही! भारत–इंडिया दरी स्पष्ट जाणवते. ही दरी दिवसेंदिवस जास्त रुंद व जास्त खोल होत आहे. शेती उद्ध्वस्त म्हणून शहरे असुरक्षित होत आहेत. साहित्यिकांनी ग्रामीण आणि शहरी या दोन्ही समाजांना जागं केलं पाहिजे. शाई गाळून, शब्दांची शेती आणि पुस्तकांची सुगी नको. समाजाला आवडेल तेच साहित्यिक लिहीत राहतील तर ते दुर्दैव आहे. समाजाला आवश्यक ते साहित्यिकांनी लिहिलं पाहिजे हा आग्रह आहे, ही अपेक्षा आहे.




**सौ. प्रज्ञा बापट**




## महिको प्रायव्हेट लिमिटेड

ई-मेल : info@mahyco.com, वेब-साइट : www.mahyco.com

/MahycoGrow /MahycoGrow /Mahycogrow

# साहित्यिकांना अनुभवसमृद्ध करणारे संमेलन





**राजेंद्र फंड**

८ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन रावेरी येथे २७ फेब्रुवारी रोजी संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ शेती साहित्यिका सौ. प्रज्ञाताई बापट, स्वागताध्यक्ष ज्येष्ठ शेतकरी नेत्या, सौ.सरोजताई काशीकर, प्रमुख पाहुणे, शेतकरी नेते मा. वामनराव चटप, संयोजक मा. बाळासाहेब देशमुख, कार्याध्यक्ष श्री. गंगाधर मुटे यांचे उपस्थितीत संपन्न झाले. संमेलनाचे उदघाटन महिला उद्योजिका मा. सौ. माधुरीताई गडकरी यांनी केले.

आतापर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील मोठ्या शहरात होणारे साहित्य संमेलन हे प्रथमच एका खेडेगावात व कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे फक्त निमंत्रित साहित्यिकांच्या उपस्थितीत धूमधडाक्यात साजरे झाले. इतर साहित्यिक व साहित्य रसिकांसाठी फेसबुक ऑनलाईन व्यवस्था केल्याने २० हजारपेक्षा जास्त जनतेने हे साहित्य संमेलन घरी बसून पहिल्यापासून शेवटपर्यंत पाहिले. कमीतकमी खर्चात जास्तीत जास्त लोकांपर्यंत हे साहित्य संमेलन कसे करता येईल याचा आदर्श पायंडा या संमेलनाने इतर साहित्य संमेलन घेणाऱ्या संस्थांना घालून दिला.

**८ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन रावेरीतच का :–**

रावेरी हे खेडेगाव यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यातील नागपूर हायवेपासून जवळच असलेलं गांव आहे. दंडकारण्य असलेल्या या गावात श्रीरामाच्या आज्ञेने दूर अशा जंगलात सीतामातेला गरोदर अवस्थेत आणून सोडले. या ठिकाणी असलेल्या वाल्मिक ऋषींच्या आश्रमात लव कुश यांचा जन्म झाला. या आश्रमात त्यांचे सर्व प्रकारचे शिक्षण झाले. पुढे श्रीरामाचा अश्वमेध यज्ञाचा घोडा या बालकांनी अडवला. या युद्धात लव व कुश यांनी शत्रुघ्न, लक्ष्मण व हनुमानाचा पराभव केला. शेतकरी संघटनेचे नेते युगात्मा शरद जोशी संघटनेच्या कामानिमित्ताने २ मे १९८२ ला रावेरीला आले असता या गावातील सीतामाईचे पडलेलं मंदिर पाहिलं. सीतामाईचा पौराणिक इतिहास समजावून घेतला. एक शेतकरी राजाची भूमिकन्या व रामासारख्या सार्वभौम राजाची राणी असलेल्या सीतामाईने वनवासात राहूनही आपल्या दोन मुलांचा धैर्याने सांभाळ केला. स्त्रीत्वाचे आत्मभान, आत्मसन्मान आणि आत्मबळ जपले. अशा या स्फूर्तिदायक पावनभूमीतील स्फूर्तिदायक इतिहास समस्त महिलावर्गालाच नव्हे तर सर्वांना समजावा म्हणून युगात्मा शरद जोशी यांनी स्वतःची जमीन विकून जुन्या हेमाडपंथी मंदिर असणाऱ्या शीळेचाच वापर करून या सीतामाई मंदिराचा जीर्णोद्धार केला. असे हे शेतकरी संघटनेचे स्फूर्तिस्थान असलेले रावेरी गांव या वर्षी साहित्य संमेलनासाठी म्हणून निवडले गेले.



**कवी संमेलन व गझल मुशायरा**

या साहित्य संमेलनात महाराष्ट्रभरातून एकूण ४२ कवींनी सहभाग नोंदवून व गझल मुशायऱ्यांमध्ये १६ गझलकारांनी सहभाग घेऊन संमेलनाचा अर्धा दिवस शेतकरी विषयाशी निगडित कविता व गझल सादर करून गाजवला. या कविसंमेलनात माझी मी पाहिला एक शेतकरी कोरोना साथीत मदत करतांना'' ही कविता सादर केली. जेव्हा जवळच्या नातेवाईक यांनी कोरोना रुग्णांना मदत केली नाही अशा वेळी एक शेतकरी एक हात मदतीचा या न्यायाने खास कोरोना रुग्णांसाठी पिकवलेल्या भाजीपाला मोफत त्यांच्या घरी नेऊन देत होता. कोरोना रुग्णाला ही मदत लाखमोलाची होती. ज्यावेळी त्याच्यावर कोरोना पॉझिटिव्ह होण्याची वेळ आली.अशा वेळी सर्वांकडून मदत मिळाल्याने तो खूप खुश झाला.अशा प्रकारची कविता सादर केली.

या संमेलनाचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे उद्घाटन ते समारोपाच्या कार्यक्रमाचे सर्व राज्यस्तरीय शेतकरी संघटनेचे नेते त्यामध्ये शेतकरी संघटनेचे सर्वोच्च नेते मा.आ. ॲड. वामनराव चटप, मा.प्रज्ञाताई बापट, मा. जयंत बापट, मा. सरोजताई काशीकर, मा.विजय नवल, मा.दिलीप भोयर, मा.सिंधुताई इखार, मा.गीता खांडेभराड, मा.शैलजाताई देशपांडे, मा.ललित बहाळे, मा.मधुसूदन हरणे, मृद शास्त्रज्ञ मा. डॉ. आदिनाथ ताकटे, मा. बाळासाहेब देशमुख, मा. नामदेवराव काकडे, मा. राजेंद्र झोटिंग, मा. राजेंद्र तेलंगे व इतरही अनेक दिग्गज पाहुणे कविसंमेलन व गझल मुशायऱ्याला दाद देत होते.

त्यानंतर महाचर्चेमध्ये दिल्ली शेतकरी आंदोलनाने काय कमावले व काय गमावले या विषयावर मा. शैलजाताई देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली शेतकरी संघटनेचे अध्यक्ष मा. ललित बहाळे, स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष मा.मधुसूदन हरणे, शेतकरी नेते व उद्योजक मा . विजय निवल, राहुरी कृषी विद्यापीठाचे मृद शास्त्रज्ञ मा.डॉ. आदिनाथ ताकटे या सर्वांनी केलेल्या चर्चेत शेतकरी आंदोलन, सरकारची भूमिका व शेतकऱ्यांचे अनुत्तरित प्रश्न याची सर्व साहित्यिक यांना ओळख झाली.



**परिसंवादातील काही मुद्दे :**

**डॉ.आदिनाथ ताकटे :** गेल्या १०० वर्षाची शेतीची परिस्थिती सांगताना मृदशास्त्रज्ञ ताकटे सर म्हणाले १०० वर्षात या देशावर २६ दुष्काळ पडलेत. त्यातील ५ ते ६ दुष्काळ फार मोठे होते. या १० वर्षात हवामानात तर इतके विचित्र बदल झाले आहेत की शेती व्यवस्थापनच कोलमडले गेले आहे. शेतकरी राजा पिकाच्या खर्चाने अगदी मेटाकुटीला आला आहे. दिल्ली शेतकरी आंदोलनाविषयी ते म्हणतात की केंद्रसरकारने हे शेतकरी विधेयक मागे घेण्यापूर्वी विविध शेतकरी संघटना, कृषिशास्त्रज्ञ व कायद्याचा अभ्यास करून मागे घेतले असते तर शेतकऱ्यांना निश्चित फायदाच झाला असता. एका दृष्टीने हे आंदोलन अपयशी ठरले.



**मा. विजय निवल :** शेतकरी नेते व कृषी उद्योजक श्री. विजय निवल आपल्या दिल्ली आंदोलनाबाबत म्हणाले की हे दीर्घकालीन आंदोलन हे देशातील फक्त पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश पुरतेच मर्यादित होते. महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांनी त्याचे स्वागत करून बाहेरून पाठिंबा दिला होता. तसं पाहिलं तर कृषी क्षेत्र हे सर्वात मोठे क्षेत्र असूनही नेहमीच दुर्लक्षित राहिले आहे. २००८ साली साऊथ एशियातील १३ देशांनी एकत्र येऊन बैठकीत बैठकीत व्यापार खुला करण्याची घोषणा केली होती. त्यावेळचे पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग यांनी संसदेत या विधेयकावर चर्चा केली. मात्र त्या वेळचा विरोधी पक्ष भाजपाने या विधेयकाला कडाडून विरोध केला. परंतु २०१९ मध्ये कोरोना आला. यावेळी अनेक तरुण बेरोजगार झाले व हेच तरुण शेतीकडे वळाले. काही महिन्यापुरता जीडीपी वाढला व याच काळात उत्तर प्रदेश व पंजाबचे इलेक्शन आले. हे इलेक्शन डोळ्यासमोर ठेवून या सरकारने शेतकरी हिताचे घेणेदेणे नसताना संसदेत थातुरमातुर चर्चा करून राजकारणाची पोळी भाजण्यासाठी हे विधेयक मागे घेतले. दिल्ली येथील शेतकरी यांनी केलेले हे आंदोलन माझ्या दृष्टीने अपयशी ठरले.

**मा. मधुसूदन हरणे (प्रदेशाध्यक्ष स्वभाप) :** परिसंवादाचे पुष्प

गुंफताना स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. मधुसूदन हरणे यांनी बाजार समिती, दलाल व शेतकरी यांच्याबद्दल आपल्या भाषणात सखोल विवेचन केले. ते म्हणाले कि. हे शेतकरी कायदे शेतीहिताचे होते किंवा कसे हे पाहणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात या कायद्याने २० टक्के गमावले असून अजून ही ८० टक्के कायदे तसेच आहे. या कायद्याने तालुक्या-तालुक्यामध्ये शेतीमालाच्या खरेदीसाठी एक स्वतंत्र बाजारपेठ निर्माण केली. त्याठिकाणी अडते, दलाल यांना कृषी उत्पन्न बाजार समितीचा परवाना घेणे बंधनकारक केले. मग परवाना देताना या दलालांचा राजकीय उपयोग आपल्याला होऊ शकेल का हे पाहूनच तसेच पक्षनिधी व इतर निधी पाहूनच परवाने दिले गेले. येथूनच भ्रष्टाचाराला सुरुवात झाली. शेतकऱ्यांनाही आपला माल बाजार समितीतच विकावा असे बंधन घालण्यात आले. जीवनावश्यक वस्तूबाबत फक्त शेतमाल हाच जीवनावश्यक वस्तुत गणला जातो. औषधे, शिक्षण हे जीवनावश्यक वस्तूंत न गणल्याने याचे भाव गगनाला भिडलेत. मात्र शेतमालाचे भाव त्या प्रमाणात वाढले नाही. जर हे कायदे कृषी हिताचे होते तर ते का मागे घेण्यात आले असा प्रश्न विचारात ते म्हणाले की पाच राज्याच्या निवडणुका व शेतकरी आंदोलनाचा असर निवडणुकीवर पडू नये म्हणून घाईगर्दीने योग्य अभ्यास न करता हे कायदे मागे घेण्यात आले. हे कायदे मागे घेतल्याने मोदी सरकारचे काही नुकसान झाले नसून शेतकरी व दलाल यांना या कायद्यामुळे जो फ्रीडम होता तो संपुष्टात आला. या कायद्यातच सुधारणा करून नवीन शेतकरी हिताचे कायदे अस्तित्वात यावेत. यासाठी आम्ही संघर्ष करू असे ते शेवटी आपल्या भाषणात म्हणाले.

**मा. ललित बहाळे (प्रदेशाध्यक्ष शेतकरी संघटना) :** शेतकरी साहित्यिक आणि शेतकरी यांच्याविषयी बोलताना शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा.ललित बहाळे म्हणाले की, आमचा शेतकरी जे मांडतो ते आकर्षक नसते. मात्र तेच साहित्यिकांनी आकर्षक भाषेत मांडणे ही आमची रास्त मागणी आहे. आजकाल भाषा पवित्र्यासोबत विज्ञान, अर्थशास्त्र , इतिहास, आणि तत्त्वज्ञान यांचा पाया असलेलं साहित्य निर्मिती झाली तर त्याला मोठी मागणी असेल.

साहित्यिकांना ७ वा वेतन आयोग झेलला जातो पण शेतकरी आंदोलन झेलले जात नाही असा टोलाही त्यांनी लावला. साहित्यिकांना आवाहन करतांना ते म्हणाले की, नुसत्या वेदनेवर तुम्ही मोठे होऊ नका. नियंत्रणाच्या विरोधात, शेतीचे नवीन तंत्रज्ञान तसेच आत्महत्येचं वर्णन करण्यापेक्षा आत्महत्येच्या कारणांचे वर्णन लिखाणात येऊ द्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २ हजार रुपये मासिक खात्यावर टाकण्याचा उद्देश म्हणजे छोटे व्यापार ठप्प झाले होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेचे चाक फिरावे म्हणून मोदी सरकारने ही स्कीम सुरू केली. पण एव्हढ्यानेही बाजार न वाढल्याने भारताचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वायदे बाजारात आपला माल कुठेही विका असा कायदा केला. जेणेकरून बाजारातील अर्थचक्र फिरेल. बाजारात जादा भावात गहू, तांदूळ, साखर खरेदी करायची व रेशनवर कमी भावात विकायचे अशी योजना सुरू केली. या योजनेमुळे जनतेची क्रयशक्ती कमी झाली. बहुतेक घरातील एक व्यक्ती काम करते व बाकीचे बसून खाऊ लागली. खाण्यासाठी कमावण्यासाठी आता फार कष्ट पडत नाही. ते सहज रेशनवर उपलब्ध होते.

सतत तांदूळ व साखरेचा वापर घरात व शाळेतही वाढल्याने लहान बालकापासून ते मोठ्यांपर्यंत डायबेटिस व हायपरटेन्शनचे प्रमाण वाढले. शेतीचे नवीन तंत्रज्ञानांचा शोध लागला. जेनेटिक इंजिनीअरिंग सारख्या शोधातून एखाद्या अन्नपदार्थातून नको तो भाग काढून टाकून त्यात नवीन उपयुक्त भाग टाकता येतो. परंतु त्याला अजून मान्यता नाही म्हणून तंत्रज्ञानाच स्वातंत्र्य मिळायला हवं. मोदींसाहेबांची घोषणा जय अनुसंधान आहे पण त्याचा वापर होत नाही. ते झालं तर प्रत्येकाच्या हाताला काम येईल व बेरोजगारीही संपेल. मोदी सरकारने हे शेतकरी विधेयक मागे घेतल्याची अधिसूचना काढली त्या दिवशी सर्व पक्ष, शेतकरी संघटना यांनीही त्याचे स्वागत केले. परंतु दुसऱ्या दिवशी विरोधकांनी विरोध केला. दिल्ली शेतकरी संघटनेचे आंदोलन पुढे पुढे भरकटल्याने अपयशी ठरले.

**मा. शैलजाताई देशपांडे :** परिसंवादाचे अध्यक्षपदावरून संमेलनाविषयी बोलताना त्या म्हणाल्या आजचे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन खूप महत्त्वाचे आहे. साहित्य हा समाजाचा आरसा आहे. या ब्रीदवाक्याची आठवण करून देताना त्या म्हणाले की, आम्ही लटिके न बोलू हे ब्रीदवाक्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. प्रत्येक साहित्यातून शेतकऱ्यांच्या जगण्याचे, शेतकऱ्यांच्या स्त्रियांचे हुंकार साहित्यातून आले पाहिजे. शेतकऱ्यांच्या वेदना म्हणजे त्यांच्या मालाचा जाहीर लिलाव, शेतकऱ्यांचा माल लिलावाच्या वेळी तुडवणे हे थांबले पाहिजे. शेतकऱ्यांना आज व्यापार स्वातंत्र्य हवे आहे.



कोणते बियाणे पेरावे, कोणत्या बाजारपेठेत माल विकावा, शेतमालावर प्रक्रिया करावी, तसेच मालाच्या मापाची शाश्वती हवी आहे. कोरोनामुळे बाजारच बंद असल्याने शेतकऱ्यांनी शहराच्या तोंडी स्वतः आपला माल विकला व बाजारसमिती व्यतिरिक्त ही मी माझा माल विकू शकतो याची हमी आली. मोदींनी शेतकरी कायद्याची घोषणा केली तेव्हा कोणी तरी कायदा तर केला आहे. ते तर ठीक आहे. त्यातील दोष काढून एकत्र बसून ते बदलवून घेता ही येतील. मात्र कायदाच नको म्हणणे हे मात्र चुकीचे आहे. या दृष्टीने आम्ही विचार केला. मात्र तरीही एक मात्र खरे आहे की हे कायदे पारित करण्याची वेळ मात्र चुकली आहे. त्यातच दिल्ली येथे शेतकरी संघटनेने केलेले आंदोलन फार ताणून धरले, चांगले निर्णय मागे पडले. त्यामुळे या आंदोलनाने कमावल्यापेक्षा गमावले जास्त आहे.

**क्षणचित्रे :**

- साथी हाथ बढाना : ॲड.वामनराव चटप म्हणाले की, गेली ८ वर्षांपासून श्री.गंगाधर हे शेतकरी साहित्य संमेलनाचा रथ चालवत आहे. एक हिंदी गाण्याचा संदर्भ देऊन ते शेतकरी साहित्यिकांना हा साहित्य संमेलनरुपी जगन्नाथाचा रथ अखंडपणे चालविण्यासाठी म्हणतात साथी हाथ बढाना, एक अकेला (गंगाधर मुटे)थक जायेगा, मिलकर बोझ उठाना, साथी हाथ बढाना.
- शेतकरी साहित्य संमेलनामधील ग्रंथदिंडीला उपस्थित सर्व साहित्यिक, शेतकरी संघटनेचे पुरुष व महिला कार्यकर्ते यांना पालखीला खांदा देण्याचा सन्मान देण्यात आला.

**ठळक वैशिष्ट्ये :**

- फक्त निमंत्रित २५० साहित्यिक, पाहुणे यांनाच साहित्य संमेलनात प्रवेश.
- उर्वरित साहित्यिक व साहित्य रसिक यांना फेसबुक लाईव्ह द्वारे संमेलन पाहण्याची संधी. २० हजारपेक्षा जास्त साहित्यिक यांनी ऑनलाईन संमेलन पाहण्याचा लाभ घेतला.
- सर्व प्रमुख पाहुण्यांचा फक्त गुलाब पुष्प देऊनच सन्मान.
- संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. गंगाधरजी मुटे साहेबांचे कुटुंबातील २२ व्यक्ती, आई, भाऊ, बहीण, पत्नी, भावजयी, मुले, नातू , भाचे वय वर्षे ८० पासून ते १५ वर्षे पर्यंतचे सर्व जण शेतकरी संघटनेच्या कार्यकर्ते यांच्यासोबत संमेलन प्रक्रियेत रात्रंदिवस कष्ट करत होते. सरांचे बंधू श्री.गणेशराव मुटे हे तर अपघाताने कुबड्यांवरच असतानाही संमेलनाचे अगोदरचे २४ तास न झोपता दुसऱ्या दिवशी संमेलनात पाहुण्यांचे स्वागत गीताचे हार्मोनियम वादन, व इतर कार्यक्रमाची देखरेख व दुसऱ्या दिवशी रात्री २ वाजेपर्यंत न झोपता फक्त काम काम आणि कामच करत होते. त्यांच्या कष्टाला सलाम.मुटे कुटुंबीय यांचे घरातील कुणी ही स्टेजवर विनाकारण लुडबुड केली नाही. हे सर्व मी ३ दिवस सोबत राहून अनुभवले.
- संमेलनाचे उद्घाटन, इतर सर्व कार्यक्रम ते समारोप पर्यंत शेतकरी संघटनेचे सर्व राज्यस्तरीय नेते कार्यक्रमात बसून होते. साहित्य संमेलनाचे हे एक अनोखे दर्शन होते.
- निमंत्रित प्रत्येक साहित्यिक यांना रुपये १ पासून कितीही संमेलन निधी द्यावा असा निर्देश त्यांच्या इच्छेनुसार होता.
- विश्वस्तरीय लेखनस्पर्धेच्या फक्त उपस्थित विजेत्या स्पर्धकांनाच ट्रॉफी दिली गेली. बाकीच्या सर्वांना सर्टिफिकेट व पुस्तके भेट देण्यात आले.
- कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त आनंद देणारे साहित्य संमेलन पाहावयास मिळाले.

**मला काय दिले**

- विश्वस्तरीय लेखनस्पर्धेचा परीक्षक होण्याचा बहुमान मला दिला.
- वर्तमान पत्र, कार्यक्रम पत्रिकेद्वारे मला महाराष्ट्रभर प्रसिद्धी दिली.
- ग्रंथदिंडीत साहित्यिक म्हणून पालखीला खांदा देण्याचा सन्मान दिला.
- शेतकरी कविसंमेलनात सहभाग व सन्मान दिला.
- मी सहसंपादित करत असलेला माझ्या ग्रामसेवा संदेश दिवाळी अंकास ग्रंथदिंडीत सहभाग दिला.
- माझ्या ग्रामसेवा संदेश या दिवाळी अंकासाठी साहित्य पाठवा या बॅनरला साहित्य मंडपात स्थान दिले.
- समारोप समारंभात विश्वस्तरीय लेखन स्पर्धेचा परीक्षक म्हणून मोठा सन्मान केला.




- शेतकऱ्यांच्या प्रमुख समस्यांची जाणीव झाली. शेतकरी साहित्य लिहिण्यास ऊर्जा मिळाली.शेतकरी संघटनेची जवळून ओळख झाली.
- कमीत कमी खर्चात भव्य दिव्य साहित्य संमेलन कसे पार पाडावे याचा अनुभव दिला.
- सर्वात महत्त्वाचे म्हणजे गंगाधरजी मुटे व कुटुंबीयांचा ३ दिवस सहवास व पाहुणचार मिळाला.

**लेखांकन :– राजेंद्र फंड**

**राहाता (अहमदनगर) मो.९८८१०८५६७१**

# दिल्ली शेतकरी आंदोलनाने काय कमावले; काय गमावले



प्रा. बी.एम. मुटे



युगात्मा शरद जोशी विद्यानगरी भूमिकन्या सीताकुटी, रावेरी येथे संपन्न झालेल्या आठव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनामध्ये तिसरे सत्र दिल्ली शेतकरी आंदोलनाने काय कमावले; काय गमावले. या विषयावर महाचर्चा आरोप-प्रत्यारोप आयोजित होती. महाचर्चेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शेतकरी नेत्या मा. शैलजाताई देशपांडे तर मा. ललित बहाळे अध्यक्ष, शेतकरी संघटना, मा. डॉ.आदिनाथ ताकटे, मृदूशास्त्रज्ञ, राहुरी विद्यापीठ, स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. मधुसूदन हरणे व शेतकरी नेते विजय निवल यांचा महाचर्चेत सहभाग होता. महाचर्चा ही फेसबुक लाईव्ह व यूट्यूब लाईव्ह असल्यामुळे नेटकऱ्यांनी तेवढ्याच उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

महाचर्चेच्या प्रारंभी शेतकरी नेते विजय निवल यांनी या विषयावर आपली भूमिका मांडली. मनमोहनसिंग सरकारने २००८ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे अस्तित्व संपविणारे शेतीविषयक सुधारणा कायदे पहिल्यांदा मांडले, पण केवळ राजनैतिक विरोध म्हणून विरोधी पक्ष भाजपने त्याचा विरोध केला. कोरोना काळात त्यात अधिक सुधारणा करून मोदी सरकारने अधिक सक्षम असे तीन कृषी विषयक कायदे विधेयक लोकसभेत मंजूर करून घेतले. मात्र राज्यसभेत त्यावर चर्चा न करता आवाजी मताने गोंधळात मंजूर करून घेतले आणि यामुळे अधिक संशय विरोधकांच्या मनात निर्माण झाला. त्याचाच फायदा केवळ राजकारण करण्यासाठी विरोधकांनी केला. या कायद्याविरोधात रान उठविले. पुढे चर्चा न करताच आणि सम्यक समितीने मांडलेला अहवाल विचारात न घेता उपरोक्त विधेयक परत घेतले, हे मोदी सरकारचे अपयश असले तरी दिल्ली आंदोलनाने शेतकऱ्यांनी खूप काही गमावलं. असं प्रतिपादन चर्चेदरम्यान मा. निवल यांनी केलं.

तीन कृषी विषयक कायदे हे पुर्णतः शेतकरी हिताचे होते. जर मोदी सरकारने सर्व संघटनांशी, शास्त्रज्ञांशी व अर्थतज्ज्ञ यांच्या सोबत चर्चा करून मांडले असते तर ते तकलादू ठरले नसते. त्यात विरोध करण्यासारखे काही नसताना सुद्धा सरकारनेच विरोधकांना विरोध करण्याची संधी उपलब्ध करून दिली, त्यातच विरोधकांचे फावले आणि दिल्ली आंदोलन शेतकऱ्यांना अनेक वर्ष मागे घेऊन गेले, असे मी शास्त्रज्ञ या नात्याने स्पष्ट करू इच्छितो असे विचार मा.डॉ. ताकटे यांनी व्यक्त केले.

फेसबुक लाईव्ह असलेल्या चर्चेवर कृषी विषयक विधेयक शेतकरी हिताचे होते, तर ते सरकारने वापस का घेतले? या नेटकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मा. मधुसूदन हरणे म्हणाले, खरंतर हे कायदे मागे घेतल्यामुळे महाराष्ट्राचे २० टक्केच नुकसान झाले. ८० टक्के कायदे अगोदरच अस्तित्वात होते, काहींची अंमलबजावणी सुरू आहे. पण जर का उर्वरित २० टक्के तीन कायद्याच्या माध्यमातून मिळाले असते, तर शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने बरेच काही साध्य झाले असते. या तीन कृषिविषयक कायद्याने खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळणार होते. विरोधकांनी या कायद्याच्या विरोधात चुकीच्या पद्धतीने रान उठविले. हा विरोधकांचा विरोध किती तकलादू व अर्थहीन होता, यासंदर्भात वेगवेगळी उदाहरणे देऊन त्यांनी विरोधी मत खोडून काढले. या कायद्यान्वये बाजार स्वातंत्र्याच्या दृष्टीने एक पाऊल सरकारने टाकलेले होते, म्हणून आम्ही ताकतीने या कायद्याचे समर्थन केले. शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव ही १९८० पासूनची आमची मागणी या कायद्यान्वये पूर्ण होणार होती. सुरुवातीला शरद पवारांपासून तर राकेश टीकैत पर्यंत सगळ्यांनी समर्थन केले, पण शेवटी मोदीविरोध म्हणून राज्यसभेतील गोंधळी चर्चेनंतर भाजप विरोधी सर्व पक्ष एकत्र येऊन विरोध केला. शेवटी काय तर शेतकऱ्यांच्या हितापेक्षा राजकारणच भारी ठरले व शेतकरीहित राजनीतीने पुन्हा एकदा अक्षरशः तुडविले, अशी भक्कमपणे समर्थनीय बाजू मा. हरणे यांनी मांडली.

मा. ललित बहाळे, अध्यक्ष, शेतकरी संघटना ही चर्चा पुढे नेताना म्हणाले, एपीएमसी अधिकृत भेसळ करण्याचे कारखाने आहेत. एपीएमसीची भूमिका नियंत्रकाची आहे, अशा नियंत्रण यंत्रणेचे रूपांतर जर व्यापार सुविधा केंद्रांमध्ये होत असेल तर कोण्या शेतकऱ्याला नको असेल. याविरुद्ध शेतकरी आंदोलन कसा काय करू शकतो. मग दिल्ली आंदोलन शेतकऱ्यांचे खरोखरच ठरू शकेल का? ह्या स्थितीकडे साहित्यिकांनी कानाडोळा करणे कसे काय शक्य आहे? साहित्यिकांची प्रतिभा येथे कशी मिंधी ठरली. समाजाच्या अंतर्मनातील प्रतिबिंब साहित्यात उमटत असेल तर दिल्ली आंदोलन हे शेतकऱ्यांच्या नावावर धूळफेक करणारे होते, ते शेतकऱ्यांच्या हिताला, स्वातंत्र्याला बाधक होते, हे खरंतर साहित्यात उमटायला हवं होतं. पण साहित्यिक दिल्ली आंदोलनाचे समर्थनार्थ उतरणे हे एक न उलगडणारे कोडच आहे आणि ते साहित्यिकच जाणो! असा प्रतिटोला त्यांनी हाणला. तीन कृषिविषयक कायद्याने उत्पादन, प्रक्रिया, वाहतूक, साठवणूक आणि पणण या क्षेत्रात शेतकरी कोणासोबतही करार करू शकणार होता. या कायद्याने अर्थव्यवस्था अधिक गतिमान झाली असती. जेनेटिक इंजिनियरिंग यासारख्या शोधातून क्रांती शक्य होती. तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना मिळणार होते. बेरोजगारी

संपविण्याचे हत्यार, साधन हेच कायदे बनणार होते आणि हे सगळं कायदे परत घेतल्यामुळे शेतकरी पुन्हा एकदा पारतंत्र्याच्या खाईत ढकलल्या गेला. एवढं सगळं दिल्ली आंदोलनाने गमावलं.

अध्यक्षीय संबोधनातून चर्चा करताना मा. शैलजाताई म्हणाल्या, आम्ही लटिके ना बोलू हे या शेतकरी संमेलनाचे ब्रीदवाक्य आहे, तेव्हा प्रत्येक साहित्यातून शेतकऱ्यांच्या जगण्याची व त्या शेतकऱ्यांच्या स्त्रीची वेदना आणि त्या वेदनेचा हुंकार उमटायला पाहिजे. खऱ्या अर्थाने समाजाची, आमची साहित्यिकांकडून हीच अपेक्षा आहे. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याच्या पहाटेचं जे कित्येक वर्ष आम्ही शेतकरी स्त्रिया स्वप्न बघत होतो ते स्वप्न या कायद्याने पूर्ण होणार होतं किंवा त्या दृष्टीने एक पाऊल पडणार होते पण आमच्या शेतकरी स्त्रियांच्या या स्वप्नावरच दिल्ली आंदोलनाने घाला घातलाय. भरकटलेल्या दिल्ली आंदोलनाने आम्हा शेतकरी स्त्रियांचा सन्मान गाडला गेला, याचे आम्हाला सर्वात जास्त दुःख आहे.एकूणच दिल्ली शेतकरी आंदोलनाने शेतकऱ्यांचं जगणंच गमावलं ,असा महाचर्चेतून सूर प्रकट झाला.

**शब्दांकन : प्रा. बी. एम. मुटे**


८ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा...!



Coromandel
FUTURE POSITIVE
Raju T. Kapse
Assistant Manager marketing



Baba Ghavghave
Mob. 9860363160
7798309043
Venketesh Krishi & Machinery
Bazar Chowk, Sindhi Railway, Dist. Wardha




SSI Reg.No. 270081200088 Part 2 Dt. 27-04-2011
WASUDEO PRESSING FACTORY
COTTON MERCHANTS & COMMISSION AGENT
SINDI - 442 105 (C. Rly.) Dist.- Wardha
Email : wasudeopressingfactory@in.com
Fax : 07155-261679
Mob : 9422844004
9860967856
9890435034

सिंदी सहकारी शेतकरी खरेदी विक्री समिती मर्यादित, सिंदी
रजि.नं. एम.के.टी./९०३, बाजार चौक, सिंदी (रेल्वे), त. सेलू, जि. वर्धा
सेलू विकास खंडातील एकमेव सहकारी विपणन संस्था
श्री. दिलीप म. गावंडे, सभापती, मो. ९८९०७०९२२६
श्री. अशोक चिं. कलोडे, उपसभापती, मो. ९१६८३६५२६७
मुख्यालय : सिंदी (रेल्वे) मोबा. ९७६६७४७०९४ व शाखा : सेलू मोबा. ८७६६७३६४३६
संचालक मंडळ : श्री. प्रभाकर चिं. कलोडे, श्री. महावीर ल. तिवारी, श्री. अशोक रा. हिंगणेकर, श्री. मुकेश ना. ढोक, श्री. शंकर ना. काटोले, श्री. सचिन मो. नंदुरकर, श्री. नरेन्द्र वि. सायरे, श्री. प्रविण ल. पाटील, श्री. राजेश र. कोपरकर, श्री. आशिष सं. देवतळे, श्री. सुरेश पं. सोनटक्के, श्रीमती शोभा सु. बेलखोडे, श्रीमती आशा मा. वडान्द्रे

# शेतकरी कवी संमेलन वृत्तांत



अनिकेत देशमुख



युगात्मा शरद जोशी विद्यानगरी, भूमिकन्या सीताकुटी, रावेरी येथील नियोजित असलेले सातवे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन कोरोनाच्या सार्वत्रिक वाढलेल्या प्रादुर्भावामुळे कोरोना अरिष्ट पर्यायी ऑनलाईन वेबमिलन सप्ताहाच्या माध्यमातून गेल्या वर्षी यशस्वीरीत्या पार पडले. याच वेळी कार्याध्यक्ष श्री. गंगाधरजी मुटे यांनी पुढच्या वर्षी आठवे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन याच रावेरी नगरीत प्रत्यक्ष स्वरूपात म्हणजेच ऑफलाईन घेण्याचे निश्चित केले होते. आणि ठरल्याप्रमाणे दिनांक २७/फेब्रुवारी/२०२२ रोजी 'मराठी राजभाषा दिनी' हे संमेलन मोठ्या उत्साहात व चैतन्यदायी वातावरणात पार पडले. याचे सर्व श्रेय कार्याध्यक्ष श्री. गंगाधरजी मुटे आणि त्यांची संपूर्ण टीम यांना जाते. या सर्वांचे अथक परिश्रम व मेहनतीचे आणि त्यांच्या शिस्तबद्ध नियोजनाचे फलित म्हणजेच यशस्वी आणि उत्तमरीत्या पार पडलेला हा आठव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचा संस्मरणीय सोहळा होय.

संमेलनातील सकाळच्या उद्घाटन सत्रानंतर झालेल्या 'निमंत्रितांच्या जम्बो शेतकरी कवी संमेलनामध्ये' शेतीमातीशी व वनिताविश्वाशी निगडित अप्रतिम कवितांनी रसिक श्रोत्यांची दाद मिळविली. या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी नागपूर येथील सुप्रसिद्ध कवयित्री मा. धनश्रीताई पाटील होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून मा. गंगाधरजी मुटे उपस्थित होते. या कवीसंमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन व निवेदन आपल्या खुमासदार शैलीमध्ये प्रसिद्ध निवेदक कवी श्री.अनिकेत जयंतराव देशमुख, पाऊलखुणाकार, गोपालखेड जि. अकोला यांनी केले.

**नमो मायभाषा! जयोस्तुते मराठी!**  
**तुझे शब्द सान्निध्य माझे ललाटी**  
**जडो ध्यास हा छंद व्यासंग बोली**  
**घडो हे समस्ता! नमो मायबोली..!!**

विवेक मुटे, तेजू कोपरकर व स्वरा पोहणे या बालकलाकारांनी आपल्या गोड गळ्यातून सादर केलेल्या या मराठी भाषेच्या स्तवनाने या शेतकरी कवीसंमेलनाच्या दुसऱ्या सत्राला सुरुवात झाली. आपल्या सुमधुर आवाजामध्ये या बालकलाकारांनी हे अप्रतिम गीत सादर केले.

**आता तयार व्हावे लढण्यास लेखणीने,**  
**रक्षण अबोलतेचे करण्यास लेखणीने।**  
**न्यावा शिवाररानी जागर सरस्वतीचा,**  
**इडापिडा अव्यक्ती पुरण्यास लेखणीने ।।**

अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनात पंचप्राण फुंकणाऱ्या वरील ओळींनी सूत्रसंचालक मा.अनिकेत देशमुख यांनी या कविसंमेलनाचा आगाज केला. सर्व उपस्थित मान्यवर व निमंत्रित कवींचे शब्दसुमनांनी स्वागत करून त्यांनी नांगराचा फाळ म्हणजे कविता, भजनातील टाळ म्हणजे कविता, काळ्या आईला हसवणारं काळंकुट्ट आभाळ म्हणजे कविता !! या स्वतःच्याच कवितेतील ओळींनी या कवीसंमेलनाची दमदार सुरुवात केली. आयोजकांच्या सूचनेनुसार निमंत्रित कवींची संख्या मोठी असल्यामुळे टप्प्याटप्प्याने हे कवीसंमेलन पुढे नेण्यात आले. कविता सादरीकरणासाठी प्रत्येक टप्प्यामध्ये सात ते आठ निमंत्रित कवींना विचारपीठावर बोलावण्यात येत होते.

या कविसंमेलनाची सुरुवात अकोला येथील ज्येष्ठ कवी 'वऱ्हाडधनकार' मा. शिवलिंगजी काटेकर यांच्या 'समतेची दिंडी' या कवितेने झाली.जवारीच्या रानामंदी जशी डोलती कणसं, डेबूजीच्या कीर्तनात जसे डोलती माणसं समतेचा संदेश देणाऱ्या या कवितेने रसिकांची दाद मिळविली व कवीसंमेलनाची दमदार सुरुवात झाली. त्यानंतर पर्यावरण कवी म्हणून प्रसिद्ध असलेले अंजनगाव सुर्जी येथील मा.विनायक अंगाईतकर यांनी कधीतरी असे मनासारखे घडावे ही निसर्गाचा समतोल राखा हा संदेश देणारी कविता सादर केली. त्यानंतर अमरावती येथील सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी मा. खुशाल गुल्हाने यांनी आपली औंदाचं साल ही कविता सादर केली. जलमभर भुलणार नाही औंदाचं साल या त्यांच्या वऱ्हाडी कवितेतून त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनामधील विदारक स्थितीचे व अस्मानी-सुलतानीमुळे येणाऱ्या अवकाळी संकटांचं मार्मिक वर्णन केलं.

उमरखेड येथील युवाकवी सचिन शिंदे यांनी बापाचं आपल्या गोठ्यातील जनावरांशी असलेलं मायेचं नातं मांडणारी दावण या भावगर्भ कवितेतून त्यांनी शेती मातीची व्यथा आपल्या शब्दात मांडली. त्यानंतर चंद्रपूर येथील ज्येष्ठ कवी मा. प्रदीप देशमुख यांनी आपल्या गंजीफा या कवितेमध्ये मातीमध्ये स्वप्न पेरतो, जागत बसतो, अशी आंधळी चाल नेहमी चालत असतो शेती करणे म्हणजे हा एक प्रकारचा जुगारच आहे हे मार्मिक भाष्य करणारी कविता मांडली. त्यानंतर अकोला येथील ज्येष्ठ कवी मा. वासुदेव खोपडे यांनी आपल्या पेरनं या कवितेतून आल्या मिरगाच्या सरी, तृप्त झालीया जमीन, काळ्या काळ्या मातीतून, सुरू झालंय पेरनं शेतकऱ्यांच्या जीवनामधील पेरण्याची लगबग मांडली. या कविसंमेलनाचे पुढील पुष्प मंगरूळपीर जिल्हा वाशिम येथील प्रसिद्ध कवी प्रा. संजय कावरे यांनी आपली जातं ही रूपकात्मक कविता सादर करुन रसिक श्रोत्यांची दाद मिळविली. जातं फिरे गरगर, पीठ येई भरभर, माय दयता दयता, चिंब भिजते

पदर या त्यांच्या ओळींनी श्रोत्यांच्या काळजाचा ठाव घेतला. यानंतर कविसंमेलनाच्या पुढच्या टप्प्यामध्ये अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंचाचे अध्यक्ष मा. श्याम ठक अकोला यांनी आपली बाप वावर पेरते ही कास्तकाराचं जगणं मांडणारी रचना सादर केली.

ग्रामसेवा संदेश या महाराष्ट्रातील प्रथितयश दिवाळी अंकाचे सहसंपादकीय कार्य सांभाळणारे अहमदनगर येथील प्रसिद्ध साहित्यिक मा. राजेंद्र फड यांनी कोरोना काळात शेतकऱ्यांनी लोकांना केलेली मदत मी पाहिला एक शेतकरी या कवितेतून मांडली. त्यानंतर राळेगावचे भूमिपुत्र युवाकवी निलेश तुरके यांनी शेतकऱ्यांची झाली बघा दैना दैना रे, लग्नासाठी पोरी कोणी देईना.'' ही भीषण वास्तव परिस्थिती शेतकऱ्यांची दैना या कवितेतून मांडली तेव्हा उपस्थित रसिक श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. त्यानंतर परळी बीड येथील कवी मा. लक्ष्मण लाड यांनी आपल्या आत्मकथा या कवितेतून शेतकरी जीवनाच्या वास्तव परिस्थितीचे चित्रण केले. त्यानंतर शेतकरी साहित्य चळवळीशी व वऱ्हाडी बोलीभाषेशी घट्ट नाळ जुळलेली असलेले नाशिक येथील प्रसिद्ध कवी मा.रवींद्र दळवी यांनी आजची मुलं आपल्या बापाला काय सांगू पाहत आहेत? हे कास्तकार नाही बनायचं या वऱ्हाडी बोली भाषेतील चिंतनशील कवितेतून त्यांनी वास्तव चित्र रेखाटले, ज्याला रसिकांनी दाद दिली. त्यानंतर यवतमाळ येथील कवी मा. देवेंद्र जोशी यांनी सुंदर माझे खेडे या वृत्तबद्ध रचनेतून खेड्यातील बदलत जाणारी परिस्थिती मांडली. त्यानंतर अमरावती येथील कवी मा. राजेश अंगाईतकर यांनी सुखाची घडी ही कविता सादर करुन शेतकऱ्यांची व त्यांच्या कुटुंबांची व्यथा मांडली.

बीड येथील कवी मा. सिद्धेश्वर इंगोले यांनी आपल्या गोड गळ्यातून येचतिया पांढरं सोनं या कवितेतून कापूस वेचणाऱ्या स्त्रीची तळमळ या शेतीमातीशी नातं सांगणाऱ्या कवितेतून मांडली. त्यानंतर परळी बीड येथील कवी मा. केशव कुकडे मुक्तविहारी यांनी सुद्धा हाच धागा पुढे नेत बाप सृष्टीचा निर्माता ही बापाच्या डोळ्यातील ओलं चैतन्य टिपणारी त्यांची रचना काळजात घर करून गेली. त्यानंतर हिंगणघाट येथील कवी मा. नरेंद्र गंधारे यांनी आपल्या गोड गळ्यातून जरासं हितगुज तुमच्याशी ही गेय कविता सादर करून रसिकांची दाद मिळविली. त्यानंतर परळी येथील कवी मा. बालाजी कांबळे यांनी आपल्या इतकं जोरात फेकू नका साहेब, आम्हाला झेलता येत नाही या कवितेतून सध्याच्या राजकीय परिस्थितीवर मार्मिक भाष्य आपल्या ठसकेबाज शैलीत केले.

वर्धा येथील सुप्रसिद्ध कवी वावरकार मा. संदीप धावडे यांनी शेतकरी आत्महत्यांचे वास्तव मांडणारी 'साहेबराव करपे पाटील' यांच्यावरील कविता सादर केली व त्यातून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची व्यथा मांडली व किसानपुत्र शेवटपर्यंत लढणार आहे हे आपल्या कवितेतून सांगितले. त्यानंतर हिंगणघाट येथील कवी मा. रंगनाथ तालवटकर यांनी आपल्या नफ्यात उरतो बारदाना या कवितेतून पिकांवर येणाऱ्या रोगराईच संकट व त्यातून होणारे शेतीचे अतोनात नुकसान हे वास्तव चित्रण मांडले. त्यानंतर अमरावती येथून आलेले ज्येष्ठ कवी मा. रत्नाकर वानखडे यांनी शेतकऱ्याचे जीवन ही शेतकऱ्यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकणारी रचना सादर केली. त्यानंतर अमरावती येथून आलेले ज्येष्ठ कवी मा. दिलीप भोयर यांनी आम्ही पाहिले ही सामाजिक व राजकीय वास्तव चित्रण रेखाटणारी रचना सादर केली. त्यानंतर वर्धा येथील ज्येष्ठ कवी मा. नारायण निखाते यांनी देव म्हणे मी सध्या तरी या माणसाला भेटणार नाही ही वेगळ्या धाटणीची रचना सादर केली. त्यानंतर बुलडाणा येथून आलेले कवी मा. मारुती कुळसंगे यांनी बळीराजाचं वेदनादायी जीवन मांडणारी फास ही गेय रचना सादर केली.

यवतमाळ येथील युवाकवी महेश कोंबे यांनी काळी माय ही मातीशी नातं सांगणारी भावगर्भ रचना सादर केली. त्यानंतर या संमेलनाच्या उद्घाटन सत्राचे सुंदर निवेदन करणारे आकाशवाणीचे



निवेदक राहिलेले वर्धा येथील कवी मा. जगदीश भगत यांनी उगाच गैरसमज करून घेऊ नकोस पाऊस सर्वांसाठी सारखा असतो म्हणून ही विचार करण्यास भाग पाडणारी मार्मिक रचना सादर केली. त्यानंतर मारेगाव येथून आलेले ज्येष्ठ कवी मा. रामदास आत्राम यांनी आपल्या गोड आवाजामध्ये शेतीमातीशी सांगड घालणारी गेय कविता सादर केली. त्यानंतर रावेरीचे भूमिपुत्र या शेतकरी साहित्य संमेलनाच्या आयोजन व नियोजनामध्ये ज्यांचा महत्त्वाचा वाटा आहे असे ज्येष्ठ कवी मा. राजाभाऊ देशमुख यांनी बोंडअळी ही शेतकऱ्यांच्या पिकांवरील रोगराई व समस्यांचे चित्रण करणारी रचना सादर केली.

अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळीचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गझलकार, कवी, लेखक मा. गंगाधरजी मुटे यांच्या शृंगारिक कवितेने या कवी संमेलनामध्ये वेगळीच रंगत आणली.

**चांदसा मुखडा, झीलसी आँखे**
**जुल्फो का बादल ऱ्हाऊ दे,**
**तुझ्या डोळ्यातलं वादळ पाहू दे**

ही शेतीमातीशी निगडित प्रतिमा व उपमा असणारी वेगळ्या धाटणीची ही शृंगारिक रचना त्यांनी आपल्या खास शैलीमध्ये सादर केली.

अशा प्रकारे सर्व उपस्थित निमंत्रित कवींच्या कवितांनंतर सलग अडीच तास या शेतकरी कविसंमेलनाचे आपल्या खुमासदार शैलीत बहारदार सूत्रसंचालन व निवेदन करणारे प्रसिद्ध कवी निवेदक पाऊलखुणाकार या नावाने सुपरिचित असलेले अकोला येथील मा. अनिकेत जयंतराव देशमुख यांना कविता सादर करण्यासाठी प्रमुख अतिथी गंगाधरजी मुटे यांनी निमंत्रित केले. यावेळी त्यांनी सर्वप्रथम या आठव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या उत्कृष्ट आयोजन व नियोजनाबद्दल सर्व आयोजकांचे व आदरणीय गंगाधरजी मूटे सरांचे मनःपूर्वक अभिनंदन करून या निमंत्रितांच्या कविसंमेलनाचे निवेदन करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानले. बापाचं आणि लेकीचं हळवं नातं मांडणारी आपली एक रचना लेक ही कविता त्यांनी यावेळी सादर केली.सारं बदललं जग आता उरली ना नेकी, बापासाठी पुन्हा मायसदा होतात ह्या लेकी या त्यांच्या गोड आवाजातील ओळी रसिकांच्या काळजात घर करून गेल्या.

या कवीसंमेलनाच्या अध्यक्षा मा. धनश्रीताई पाटील नागपूर यांनी शेवटी अध्यक्षीय समारोप केला. आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये त्यांनी या कवीसंमेलनामध्ये सहभागी झालेल्या सर्व कवींचे अभिनंदन केले तसेच सर्वांना शेती मातीशी निगडित प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या लिखाणासाठी शुभेच्छाही दिल्या. त्यांनी यावेळी स्त्रीत्वाचा सन्मान वाढवणाऱ्या व शेतीमातीशी नातं सांगणाऱ्या आपल्या दोन रचना सादर केल्या. आपल्या मनातील कविता कविता कशी असावी ही रचना त्यांनी सादर केली. त्यानंतर शेवटी अध्यक्षांच्या परवानगीने तब्बल अडीच तास चाललेल्या या ऑफलाईन व फेसबुक लाइव्ह या ऑनलाईन माध्यमातून पार पडलेल्या या निमंत्रितांच्या जम्बो कवीसंमेलनाचा समारोप झाला.

**– अनिकेत जयंतराव देशमुख (पाऊलखुणाकार)**
**रा. गोपालखेड ता.जि. अकोला**
**संपर्क– ९६८९६३४३३२**

असे गैर ती आत्महत्या कधीही, म्हणे कास्तकारास समजावुनी
परी कारणांचा जरा शोध घ्यावा, अशी सुज्ञता दाखवेना कुणी
**– गंगाधर मुटे 'अभय'**

-------

इराद्यांना तुझ्याही पंख फुटतीलच भरारीचे
तुला ओलांडता यावा अगोदर उंबरा सखये
**– अझिझखान पठाण**

-------

माणसांनो रे फुलाया ही धरा इतके करा
झाड ,पाणी अन मुलींचे गर्भ सारे वाचवा.
**– वीरेंद्र बेडसे**

-------

येतो मला ढगांवर संताप फार देवा
जाणून या धरेची जेव्हा तहान घेतो
**– सतीश गुलाबसिंह मालवे**

-------




**शुद्ध बियाणं लावा दारोदारी,**
**सुख समृद्धी येईल घरोघरी.**



# कलश सीड्स प्रा. लि.

मंठा रोड, जालना - ४३१२०३.

Kalash

# शेतकरी गझल मुशायरा वृत्तांत

**अझीझखान पठाण**



आठवे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन सीता मातेचं वास्तव्य लाभलेल्या ऐतिहासिक पावनभूमी रावेरी येथे ता. राळेगाव जि. यवतमाळ येथे राजभाषा दिनी दि.२७ फेब्रूवारी २०२२ रोजी संपन्न झाले. एरवी नेहमी दोन दिवसांचे होणारे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन यावेळी कोरोना आणि त्यासंबंधी असलेल्या निर्बंधांना गृहीत धरून एक दिवशीय करण्यात आले होते. एका दिवसात साहित्य दिंडी, उत्घाटन सत्र ते परिसंवाद, कवी संमेलन, विश्वस्तरीय लेखन निकालाचे बक्षीस वितरण, समारोप सत्र एवढ्या भरगच्च कार्यक्रमातही गझल मुशायऱ्याचे सत्र ठेवल्याबद्दल आयोजकांचे आणि विशेषतः या साहित्य संमेलनाचा डोलारा यशस्वीपणे पेलणारे मा. गंगाधर मुटे सर यांची मराठी गझल आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या मुशायऱ्याला निमंत्रित गझलकार कृतज्ञ राहतील.

अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन जरी शेतीविषयक प्रश्नावर उहापोह करण्याकरता होत असले तरी शेतकरी गझल मुशायऱ्यात मात्र गझलांनी एकूणच शेती मातीच्या व्यथा वेदनांसोबत समाजाच्या, माणसाच्या जगण्यातल्या सगळ्याच पैलूंना स्पर्श केल्याने मुशायरा एकसुरी झाला नाही, हे या मुशायऱ्याचे वैशिष्ट्य. माता सीतेचा स्पर्श लाभलेल्या रावेरी नगरीत स्त्री शक्तीचा सन्मान म्हणून संमेलनाच्या सगळ्याच सत्रांचे अध्यक्षपद साहित्यिक स्त्रियांनी भूषविले. शेतकरी गझल मुशायऱ्याच्या अध्यक्षपदाचा मान नागपूरच्या गझलकारा मा. प्रा. चित्रा कहाते यांना मिळाला.

केवळ शेती विषयाला वाहिलेल्या साहित्य संमेलनात शेतकरी गझल मुशायरा अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनात नुसताच आयोजित केल्या जात नाही तर मराठी गझलेच्या उण्यापुऱ्या साठ-सत्तर वर्षाच्या इतिहासात एखाद्या साहित्य संमेलनात गझलेला वाहिलेलं स्वतंत्र सत्र व व्यासपीठ अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनानेच प्रथमतः उपलब्ध करून दिले आहे. आजपावेतो झालेल्या अ. भा. वा तत्सम मराठी साहित्य संमेलनाच्या इतिहासात मराठी गझलेला एखादं दुसरा अपवाद सोडला तर कधीही स्वतंत्र सत्र लाभले नाही पण अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन याला अपवाद आहे. अगदी वर्ध्याच्या पहिल्या संमेलनापासून तर नागपूर, गडचिरोली, मुंबई, पैठण, अलिबाग ते रावेरीतही गझल मुशायरा नेहमीप्रमाणे गाजला.

मुशायऱ्यात सगळेच मातब्बर गझलकार सहभागी असल्याने मुशायऱ्याची सुरवात कुणाच्या गझलेने करावी हा संभ्रम होता...मग राळेगावच्याच भुमिपुत्राला हा मान देण्यात आला. गजेंद्रकुमार ठुने यांनी

**आई समान जपतो शेतीस बाप माझा**
**का शेवटीस जातो मातीत बाप माझा**

या तरन्नुममध्ये सादर केलेल्या गझलेने मुशायऱ्याचा शानदार आगाज केला. काही अपरिहार्य कारणामुळे मुशायऱ्याच्या अध्यक्ष प्रा. चित्रा कहाते यांना तातडीने नागपूरला निघणे भाग होते म्हणून आयोजकांच्या परवानगीने त्यांनी आपले अध्यक्षीय मनोगत आणि

**बंगल्याची घरे व्हावयाला काळजाला झरे पाहिजे**
**दोन घटका पुन्हा आश्रयाला या घरा उंबरा पाहिजे**

ही मनाच्या ठाव घेणारी गझल सादर करून आणि मुशायऱ्याला शुभेच्छा देऊन त्यांनी निरोप घेतला. अध्यक्षीय आसन रिकामे ठेवत त्यांची सांकेतिक उपस्थिती गृहीत धरून मुशायऱ्याचा प्रवास सुरूच होता. शिक्रापूर (पुणे) वरून आलेले सतिशसिंग मालवे यांनी मुशायऱ्याचा मूड सांभाळत

**माझ्याकडे भलेही माझे शिवार नाही**
**समजू नका तरीही मी कास्तकार नाही**
**विस्तार फक्त माझा यानेच शक्य झाला**
**मी संकुचित कधीही केला विचार नाही**

असा जगण्यातला आत्मानुभव सांगत मुशायतऱ्यात वेगळाच रंग भरला तर दिवाकर जोशींनी

**स्वातंत्र्य धर्म माझा, बंधुत्व जात आहे**
**जयहिंद एवढी बस, ओठात बात आहे'**

**म्हणत देशभक्तीचा सूर ओढला तर लगेच**

**दुःखदायी मरण भारवाही मरण**
**वाट बघता कधी येत नाही मरण'**

म्हणत मृत्यू विषयी वैश्विकसत्यही ते सांगून गेले.

अकोल्याचे तरुण, उमदे गझलकार दस्तीकार निलेश कवडे यांनी

**पेटतो वैशाख वणवा.. एक ठिणगी लागते**
**जिंकतो संघर्ष मित्रा जिद्द हृदयी लागते'**

हा जगण्याला उभारी देणारा शेर श्रोत्यांचा भाव खाऊन गेला तर

**आत्महत्येने बळीची जिंदगी गेल्यावरी**
**कोणत्या चौकात सांगा मेणबत्ती लागते**

हा शेर उपस्थितांना अंतर्मुख करून गेला. ज्येष्ठ गझलकार, साहित्यिक मा. प्रा विनय मिरासे अशांत यांनी

**बोलून खूप झाले करणेच भाग आहे**
**जगणे सुमार झाले मरणेच भाग आहे**

अशी खंत व्यक्त करत

**जो तो इथे बुडाशी आहे जरा तडकला**
**देऊन डाग पाणी भरणेच भाग आहे**

असा अनुभवी सल्लाही सांगितला. परभणीचे नव्या दमाचे आणि आपल्या शेरीयतने गझलकार म्हणून स्वतःची दखल घ्यायला लावणारे गझलकार आत्तम गेंदे आले आणि

**नाही भिती जराही त्याच्या मनात आता**
**तो राहतोय अमुच्या बुजगावण्यात आता**
**खांद्यावरून आधी डोक्यावरी बसवले**
**काहीच अर्थ नाही धमकवण्यात आता**

म्हणत रसिकांची वाहवा लुटून गेले तर परभणीचेच यशवंत म्हस्के समाजाचे चित्रण रंगवताना म्हणाले की

**कितीही झाकले डोळे तरी चोरी लपत नाही**
**समज हा मांजरीचा की तिला काही कळत नाही**

आणि समाज भानातून प्रेमाकडे वळताना

**मला चोरायचे आहे तुझ्या डोळ्यातले काजळ**

म्हणत रसिकांना प्रेमभावनेत डुंबवून गेले.

व्यवसायाने डॉक्टर असलेल्या जालनाच्या डॉ. राज रणधीर यांनी शेतीमातीतून मुशायऱ्याला प्रेमाकडे वळवताना

**कैकदा चोरून मला ती का अशी न्याहाळते**
**त्रास होतो कैकदा अन छान सुद्धा वाटते**

अशी रोमँटिक खंत व्यक्त करीत

**फक्त ही मैत्रीचं आहे की अजून काही तरी**
**का मनाच्या आत माझ्या एक हळहळ राहते**

असा नाजूक सवालही आपल्या प्रेयसीला केला. परभणीच्याच संजय तिडके यांनी माणूस हा समाजशील प्राणी आहे याची आठवण करून देत

**देवधर्म अन जातीसाठी नका माणसे जाळू**
**धर्म एक हा माणुसकीचा मिळून सारे पाळू**

असे आर्जव करीत

**जत्रे मध्ये व्यवहार तुझ्या मी कसा करू मी दुनिये**
**खुनी लफंगे अन काही लुच्चे, कुणाकुणाला टाळू**

असा सवाल करून रसिकांची दाद मिळवली. वरचेवर चढत्या क्रमाने जाणाऱ्या मुशायऱ्यात वेळ होती आणखी एका तरुण उमद्या आणि आपल्या गझलांनी महाराष्ट्रभर ठसा उमटवणाऱ्या आत्माराम जाधव यांची.

**काळजाचे कान होऊ लागले**
**कोण इतके गोड होऊ लागले**

असे म्हणत त्यांनी मुशायऱ्याच्या प्रवासाची प्रशंसा केली आणि तरन्नुममध्ये

**शेतात राबणारा शब्दात मांडतो मी**
**किस्सा जरी पुराना तळमळ नवीन आहे**
**फसशील रे पुन्हा तू ऐकून गोड बाता**
**माशास भुलवणारा हा गळ नवीन आहे**

असे म्हणत राज्यकर्त्यांचे शेतकऱ्यांना फसवण्याचे नवनवीन ढोंग उजागर केले. गझलसम्राट मा. सुरेश भटानंतर गझल लिहिणाऱ्या एका पिढीचे शिलेदार, ज्येष्ठ गझलकार प्रा.डॉ. सिद्धार्थ भगत यांचा मुशायऱ्यात नवीन लिहित्या लेखण्यांना प्रेरणादायी सहभाग होताच, त्यात उत्तम शेरांवर प्रा. सिद्धार्थ भगत आणि मा. गंगाधर मुटे सर यांची गझलकारांना मिळणारी दाद लिहिणाऱ्यांना प्रेरणा आणि उभारी देणारी होतीच आणि आता पाळी होती प्रत्यक्ष त्यांना ऐकण्याची.

**केलेत माफ सारे माझे कसूर त्यांनी**
**होते नको कराया हे काम क्रूर त्यांनी**
**सत्तेशिवाय नाही सामर्थ्य येत ऐसे**
**बघ आणला मुताने पाण्यास पूर त्यांनी**

असे आपल्या चीर-परिचित अंदाजात शेर सादर करीत व्यवस्थेचे वाभाडे काढले तर

**उन्हातान्हात जीवाची कितीदा काहिली झाली**
**तरीही ठेवली आहे खुज्यांची दूर छाया मी**

म्हणत चळवळीला, संघर्षाला पेटते ठेवण्याचा मनसुबा जाहीर केला. मुशायऱ्याच्या शेवटी मुशायऱ्याचे सूत्र संचालक नागपूरचे अझीझखान पठाण यांनी

**पावसा बघ फास मी घेणार नाही**
**तू सरींचे दोर खाली सोडले तर**

असा संदेश पावसाला देत

**हे नाही म्हटले की कुठला ताज मिळो**
**या माझ्या शब्दांना बस आवाज मिळो**

अशी माफक अपेक्षा तरन्नुममध्ये व्यक्त केली. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या मुशायरा समारोपावर येऊन ठेपला होता आणि समस्त गझलकार आणि उपस्थित रसिकांनाही मा. गंगाधर मुटे सरांची गझल ऐकायची उत्कंठाही शिगेला पोचली होती आणि मुटे सरांनीही त्यांचा भ्रमनिरास न करता आपल्या नेहमीच्या मिस्कील आणि सडेतोड स्वभावाचे दर्शन त्यांच्या शेरातून घडवलेच.

**शृंगारल्या मनाला वैश्विक खाज नाही**
**भोगत्व सोडले तर कसलाच माज नाही**

असे जाहीर करत,

**सोकावलेल्या अंधाराला इशारा आज कळला पाहिजे**
**वादळ येऊदे कितीही पण हा दीप जळला पाहिजे**

असे म्हणत अन्नदाता शेतकरी आणि त्या संबंधी चळवळीच्या भविष्याचा जाहीरनामाच घोषित करत मुशायऱ्याचा शानदार समारोप केला. जगाच्या पोशिंद्याची तगमग त्याच्या दुख:ची, संघर्षाची कहाणी वाचत बसण्यात धन्यता मानत नाही तर त्यांच्या संघर्षाच, दैन्याच मूळ शोधून उत्तररूपी मशागत करण्यात कुठेही कमी पडत नाही. गेल्या आठही संमेलनात जमलेला हा गोतावळा दरवर्षी नवनव्या शेतिनिष्ठ जाणिवांसह शेतीमातीचे वास्तव उजागर करीत जातो. मराठी साहित्य विश्वाला 'मराठी शेतकरी मुशायरा' ही वास्तववादी जिवंत संकल्पना याच व्यासपीठावरून दिल्याचे आता सर्वश्रुत झाले आहे, यात दुमत नाहीच आणि हे आता मान्यच करावे लागणार आहे. याही वर्षी तब्बल २ तास गझलकारांनी आपल्या प्रतिभेने शेती-माती जाणिवांचा गजर करीत ऐतिहासिक अश्या मुशायऱ्यातून शेतिनिष्ठ अभिव्यक्तीची उंची गाठत तमाम सारस्वतांना अंतर्मुख केले.

**अझीझखान पठाण**
**नागपूर**
**मो. ७८७५८ ९४३४३**

# संमेलनाच्या आयोजनाचे प्रयोजन



रवींद्र दळवी



वर्धा, नागपूर, गडचिरोली, मुंबई, पैठण, अलिबाग, छोटी आर्वी (आभासी संमेलन), रावेरी, यवतमाळ... असा गेल्या आठ वर्षापासून, शेतकरी संघटनेचे प्रणेते युगात्मा शरद जोशी यांच्या शेती अर्थकारणाच्या विज्ञानवादी विचाराची कास धरून, त्यांच्याच प्रेरणेने सुरु झालेला हा साहित्यिक प्रवास आज आठव्या वर्षात प्रवेशकर्ता झालेला आहे. गत आठ वर्षात या संमेलनाने काय दिले? या संमेलनाची उपलब्धी काय? एवढे शेती साहित्य उपलब्ध असताना, अश्या उपक्रमाची गरजच काय? या आयोजनाचे प्रयोजन तरी काय? हे प्रश्न जाणत्या मनाला पडणे स्वाभाविक आहे. मला वाटते या सर्व प्रश्नांची उत्तरे या संमेलनाच्या आयोजनातच दडली आहे.

कलात्मक अंगाने मांडले गेलेले शेती साहित्य हे मनाला मोहू शकते. एकवेळ निसर्गाचा आल्हाददायकपणा, शृंगार, मनाला भुरळ पाडू शकतो पण पोटाला मात्र भाकर पाहिजे असते. भाकरीचा प्रश्न केवळ मनोरंजनाने सुटत नसतो. आभाळातील चंद्र-तारे, हिरवं रान, वाहणारी नदी, वाऱ्याच्या तालावर दिमाखात डोलणारी पिके, खेड्यामधले घर कौलारू, अश्या स्वप्नरंजन मांडणीतून मूळ प्रश्नालाच बगल दिली गेल्याने, शेतीतील वास्तव कायम दुर्लक्षित राहिले आहे. जो पर्यंत महात्मा फुले यांचे साहित्य आपण वाचत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे शेती विषयक विचार, युगात्मा शरद जोशी यांचे शेती अर्थकारणाबद्दलचे चिंतन, विचारांचा अंतर्भाव नियोजनकर्ते आपल्या नियोजनात अंगिकारत नाही, जो पर्यंत खऱ्या अर्थाने शेतीचे प्रश्न सुटणार नाहीच. ही जबाबदारी जशी नियोजनकर्त्याची आहे, तेवढीच किंवा त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त साहित्यिकांची आहे अश्या परखड प्रास्ताविकातून संमेलनाचे कार्याध्यक्ष तथा मराठी शेतकरी साहित्य चळवळीचे प्रणेते श्री. गंगाधर मुटे यांचे हे मार्मिक भाष्य या संमेलनाच्या आयोजनामागील प्रयोजनाची वास्तविकता दर्शविण्यास पुरेसे आहे.

हेच वास्तव प्रकर्षाने या व्यासपीठावरून गेल्या आठ संमेलनातून मांडले जात आहे. ते समाजापर्यंत पोहचत आहे. महाराष्ट्रातील विविधांगी भौगोलिक वैशिष्ट्ये असलेल्या, अगदी पिकांच्या लागवडीनुसारही त्या ठिकाणाचे वैविध्य असलेल्या विविध ठिकाणी जिल्हा, तालुका, गाव अश्या पातळीवर हे संमेलन जाणीव पूर्वक आयोजित करण्यात आलेले आहे. शेतकरी कुठलाही असो; तो नाशिकचा द्राक्ष उत्पादक असो, की विदर्भातील कापूस पिकविणारा असो, की कोंकणातील भात पिकविणारा असो, संघर्ष त्याच्या पाचवीला पुजला आहेच. अन्नदाता सुखी भव: असं आपण कितीही अंतःकरणापासून म्हणत असलो तरी जगाचा पोशिंदा असलेल्या, अन्नदात्याची दशा सर्वच ठिकाणी समाधानकारक आहे असे, आज स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीतही म्हणता येणार नाहीच. याउलट ती दिवसेंदिवस खालावत आहे हे सत्य नाकारता येणार नाहीच. शेतकऱ्याचे शोषण त्या साक्षात निसर्गाकडून सुद्धा होते हे आताच आलेल्या अवकाळी पावसाने प्रत्यक्ष दाखवून दिलेले आहे. अस्मानी सुलतानी दृष्ट चक्रातून सुटण्याचे सुचिन्ह दृष्टीपासून कोसो दूर आहे. दिल्लीचे आंदोलन आणि तीन कायद्यांचा गुंता आपण अनुभवला आहेच. त्याचे पडसाद येत्या काळात शेतीला घेरणार हेही खरे आहेच.

या संमेलनाकडे मी केवळ एक साहित्य संमेलन म्हणून बघत नाही. साहित्याचा उत्सव, साहित्याची मेजवानी, पुस्तकाची जत्रा अश्या भोळ्याभाबळ्या दृष्टीनेही मी कधीच पाहिले नाही. अगदी जेव्हा मी नागपूर येथील दुसऱ्या संमेलनात एक रसिक म्हणून सहभागी झालो, तेव्हा मला प्रकर्षाने जाणवले होते की, या संमेलनाची जातकुळी वेगळीच नाही तर हे एक चिंतन शिबीर असून इथे येणारा प्रत्येक रसिक हा एक प्रशिक्षणार्थीच असतो. त्याला तिथे विचार देणारेही, केवळ हौसेखातर प्रतिष्ठेसाठी किंवा वक्ता म्हणून मिरवण्यासाठी आलेले नसतात. येथील वक्ते, मार्गदर्शक पुस्तकी ज्ञानातून उभे झालेले नसून,अगदी रस्त्यावर उतरून आंदोलन करणारे, आदरणीय ड.वामनराव चटप सारखे समर्पित कृतिशील विचारवंत आहेत. त्यांच्या अनुभवसिद्ध विचारसरणीतून जे पाझरते ते जिरविण्याची ताकत असलेले जातिवंत इथे भेटतात. ही भेट म्हणजे साधीसुधी भेट नसून शेतीनिष्ठ वास्तव जाणिवांच्या आदानप्रदानाची खोलवर मुरलेली बैठकच असते. याच संमेलनात मी ''ताकतीन मले असं लियता याले पायजे! पानी लियल का कागदावर ढग जमाले पायजे'' असा दुर्दम्य आशावाद पेरणारा कार्यकर्ता कवी लेखक संदीप धावडे आपल्या धारदार वाणीने शेती वास्तवाचे चटके देत, व्यवस्थेची कातडी सोलून काढताना अनुभवले आहे. आजवर पार पडलेल्या संमेलनाध्यक्षाची नावे जरी आपण पाहिली तरी सहज लक्षात येईल की, युगात्मा शरद जोशी, प्राचार्य रा. र. बोराडे. डॉ. शेषराव मोहिते, प्रा. विठ्ठल वाघ, प्रा. इंद्रजित भालेराव, प्रा. भास्कर चंदनशिव, वसुंधरा काशीकर, प्रज्ञा बापट ही नावे आणि त्यांचे काम त्यांचे लेखन सर्वश्रुत सर्वमान्य आहे.

संमेलनाच्या आयोजनातील मुख्य बाब म्हणजे संमेलनास पोषक अशी वातावरण निर्मिती. या प्रत्येक संमेलनाच्या आधी, युगात्मा शरद जोशी यांच्या जन्मदिवशी ३ सप्टेंबर रोजी, विश्वस्तरिय लेखन स्पर्धेचे आयोजन केल्या जाते. एरवी स्पर्धा

म्हटली कविता कागदावर लिहून पाठवायची. त्या प्रवेशिकेचे पुढे काय होते, कोण तपासतो, खरेच पात्र प्रवेशिकेची निवड केली जाते का, हा पूर्ण विषयच गुलदस्त्यात असतो. पण स्पर्धेमध्ये पारदर्शकता आणत कागदावर लिहून पाठविण्याचा प्रघातच या संमेलनाने मोडीत काढला. स्पर्धा विश्वस्तरीय आणि विषय शेतीमातीचा. म्हणजे 'लोकल ते ग्लोबल' शेतीवास्तव जास्तीत जास्त उजागर होईल, अश्याच पद्धतीने विषयाची निवड केली जाते. उदा. शेती आणि शेतकरी, युगात्मा शरद जोशी , कर्जाच्या विळख्यात शेती, सरकारी धोरण शेतकऱ्याचे मरण, शेती आणि कोरोना,रानातला पाऊस या सारख्या प्रत्यक्ष शेतीवर थेट प्रभाव पाडणाऱ्या, विषयाची निवड करण्यामागे जास्तीत जास्त वस्तुनिष्ठपणे लेखन होणे हाच या मागचा मुख्य हेतू.

साहित्यातील सर्वच प्रकार अगदी काव्यलेखना पासून तर कथा, गझल, गीतरचना, वैचारिक लेख, शेतीविषयक लेख, छंदमुक्त, छंदबद्ध कविता, मागोवा, ललित, अनुभव कथन, रसग्रहण, समीक्षण अशा साहित्याच्या सर्वच प्रकारात लेखन अपेक्षित असते. ज्याला जे जमते त्याने त्या त्या प्रकारात व्यक्त व्हावे. अश्या प्रकारच्या लेखनातून लेखन करताना, लिहिणारा आभाशी काल्पनिक विश्वात रमत नाही. त्याला तशी मुभाच नसते किंबहुना तो तसे लिहूच शकत नाही. त्या ठिकाणी त्याला, त्याच्या मांडणीला अभ्यासाची, संशोधनाची अनुभवाची जोड द्यावीच लागते. अगदी गेल्या आठ वर्षातील केवळ स्पर्धेच्या अनुषंगाने झालेले लेखन, साहित्य जरी आपण तपासून पाहिले आणि ते प्रकाशित करायचे म्हटले तरी या आठ वर्षात शेतीसाहित्याचा वास्तवदर्शी दस्तऐवज तयार झाला असल्याचे ठळकपणे लक्ष्यात येईल. त्या सोबतच संमेलनातील अध्यक्षीय भाषणे, हा एक स्वतंत्र चिंतनाचा विषय. परिसंवादातील विषयांची वक्त्यांकडून अभ्यासपूर्ण मांडणी. शेतकरी संघटनेतील कृतिशील कार्यकर्त्यांची मनोगते, प्रासंगिक विषयावरील विविध मान्यवरांची भाष्ये. पुस्तक प्रकाशन, कंसातील माणसे(प्रातिनिधिक काव्यसंग्रह) संमेलन विशेषांक, आदरणीय ललित बहाळे सर, मधुसूदन हरणे सर, सरोजताई काशीकर, गीताताई खांडेभराड, प्रज्ञाताई बापट, दिलीप भोयर, ड. सतीश बोरूळकर, ड.प्रदीप पाटील यांची भाषणे तर शेतीमातीच्या वस्तुनिष्ठ जाणिवा समृद्ध करणारी अशीच होती. प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत सर आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीव्दारे शेतीसाहित्यातील वास्तववादी लेखन करणाऱ्या, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील लेखकांच्या साहित्याची चिकित्सक पद्धतीने समीक्षा करून सातत्याने या व्यासपीठावरून अश्या लेखकांचा त्यांच्या साहित्यकृतीचा, परिचय साहित्य विश्वाला करून देत आहेत. हे खूप मोठं काम या आठही संमेलनाच्या आयोजनातून झालेले आहे.

डॉ. राऊत यांच्या पीएचडी प्रबंधाचा विषयच 'शेतकरी संघटना आणि साहित्याचा अनुबंध' असा असून हा प्रबंध, ग्रंथरूपाने आज अभ्यासकांसाठी उपलब्ध करून दिलेला आहे. सोबतच राहुरी कृषी विद्यापीठाचे मृदशात्रज्ञ डॉ. आदिनाथ ताकटे सर, याच विचारपीठावरून परिसंवादाच्या माध्यमातून, तंत्रज्ञानावर आधारीत काळाची गरज म्हणून, आधुनिक शेतीविषयक अतिशय महत्त्वपूर्ण अशी माहिती आपल्या अभ्यासपूर्ण विवेचनातून शेतकऱ्यापर्यंत पोहचवीत आहेत. आधुनिक शेतीत समाविष्ट असलेले, माती परीक्षण, पिकांची लागवड, फवारणी, पिकांची काळजी, हवामानातील बदल, पाण्याचे नियोजन, विद्यापीठीय संशोधन, बाजारपेठ, नवनवे संकरित वाण ई. विविधांगी विषयाच्या लेखाव्दारे वस्तुनिष्ठ साहित्याचे दस्तावेजीकरण होत असल्याने हे या चळवळीचे फलित मानतो मी.

युगात्मा शरद जोशी प्रणीत चांदवडची शिदोरी या विचाराचा धागा पकडून नुकतेच महिला सक्षमीकरणास समर्पित, रावेरी येथे संपन्न झालेल्या आठव्या संमेलनात तर संमेलनाध्यक्षापासून उदघाटक आणि प्रत्येक सत्राच्या अध्यक्षा महिला असल्याने मातृशक्तीचा नवा अध्याय लिहिण्यास प्रेरणा देणारे असेच आहे. साहित्यविश्वात रोल मॉडेल ठरलेल्या या संमेलनाची दखल सर्वच अग्रगण्य दैनिकांनी घेऊन विशेष कौतुकास पात्र ठरविलेले आहे. वाचकप्रिय, प्रतिष्ठित अश्या अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त 'ग्रामसेवासंदेश' दिवाळी अंक, जो मंत्रालयातील विभागासह महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये पोहचविल्या जातो. त्या दिवाळी अंकाचे, कार्यकारी संपादक, साहित्यिक डॉ. राजेंद्र फंड, यांनी आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून, तीन दिवस रावेरी येथील वास्तव्यात या आठव्या संमेलनाच्या, वैशिष्ट्यासह संमेलनाने काय दिले? या बद्दलचा शब्दबद्ध केलेल्या बोलक्या वृत्तांतात ते म्हणतात, ''की कमीत कमी खर्चात तंत्रज्ञानाचा समर्पक वापर करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत संमेलन कसे पोहचविल्या जाते, याचा आदर्श पायंडा या संमेलनाने घालून दिलेला आहे.''

या आधीच्या सर्व संमेलनाचीही प्रसार माध्यमांनी योग्य ती दखल घेतलेली आहेच. अगदी एबीपी माझा सारख्या प्रसिद्ध वृत्तवाहिनीने देखील संमेलनाला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देऊन संमेलन सर्वोतोमुखी केलेले आहेच. मराठी साहित्यविश्वात केवळ शेती विषयाला वाहिलेला गझल मुशायरा फक्त अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनातच आयोजित केल्या जातो. याच चळवळीचे एक शिलेदार, प्रसिद्ध गझलकार अझीझ पठाण यांचा एक शेर मुद्दाम इथे द्यावा वाटतो शेत हतबल मज म्हणाले आर्जवाने! कासरे लपवून ठेवा पेरल्यावर अशा प्रकारचे जीवघेणे वास्तव, जेव्हा गझल सारख्या अलवार विधेतून उजागर होते, तेव्हा शेतीमातीच्या या भयाण वास्तवाची धग थेट काळजाचा ठाव घेते आणि ऐकणाऱ्याच्या काळजातून वाहच निघत नाही, तर तो अंतर्मुख होतो.

श्री. गंगाधर मुटे यांचा ''माझी गझल निराळी' या गझल

संग्रहावर भाष्य करताना, प्रसिद्ध गझलकार श्री.राज पठाण, अंबेजोगाई, हे म्हणतात की ''हा गझलसंग्रह, गझलविश्वाची परिभाषा बदलणारा असून, शेतकऱ्याच्या वेदनांची कैफियत मांडण्यासाठी मुटे यांनी गझल हा काव्यप्रकार निवडावा हेच मुळी धाडसाचे काम आहे. हा गझलसंग्रह विषयाच्या अनुषंगाने अव्दितिय असाच आहे. 'शेतकऱ्याचा आसूड' या महात्मा फुल्यांच्या पुस्तकानंतर शेतकऱ्याच्या जीवनाला समग्र स्पर्श करणारे लिखाण माझ्या वाचनात आले नव्हते. ही पोकळी गंगाधर मुटेच्या समर्थ लेखणीने भरून काढली.'' 'माझी गझल निराळी' हा संग्रह या चळवळीची मोठी उपलब्धी मानतो मी. सोलापूर दिव्य मराठीचे वरिष्ठ उपसंपादक श्री. सिद्धराम भै. पाटील यांनी सोलापूर विद्यापीठात सादर केलेल्या 'मराठी ब्लाग्ज; एक अभ्यास' या लघुशोधनिबंधात 'रानमोगरा-माझी वाङ्मयशेती' मुटे सरांच्या या ब्लाग्जच्या समावेशाने ही चळवळ विद्यापीठात पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. याच व्यासपीठावरील शेतकरी गझल मुशायऱ्यातून अनेक मान्यवर गझलकार आज पुढे आलेले आहेत. आपल्या कसदार प्रतिभेने अनेक नव्या लिहित्या हातांना वैचारिक बळ देऊन प्रेरणादायी ठरत आहेत. शेतीमातीचे वास्तववादी दर्शन या संमेलनातून होत असल्याने, अवघ्या साहित्यविश्वातील संमेलनाच्या भाऊगर्दीत आपले वेगळेपण आणि आयोजनाची काळसापेक्ष अनिवार्यता यामुळे ही चळवळ दिशादर्शक ठरत आहे...!

**रवींद्र अंबादास दळवी**
**नाशिक**
**चेल : ७०३८६ ६९५४२**

कपाळी घामात तुडुंब भीजलेले कुंकू तिचा, संसार बळकट करीत आहे.
डोक्यावर आभाळागत मायेचा पदर तिचा, जगाच पोट भरवत आहे.
**- गणेश वरपे, माजलगाव**

-------

कष्टास मोल लाभो,जे राबतात त्यांच्या
तोडू मिळोनिया जो वेढून पाश आहे.
**- खुशाल गुल्हाणे**

-----

शेती शिवाय नाही असा कुठलाच कारखाना
ज्यात मिळेल हजार दाणे टाकून एक दाणा
**- राजेश अंगाईतकर, यवतमाळ**

--------

मातीत पीक गेले जळले कधी बियाणे
आहे बळीस इतका पाऊस बाधलेला
**- आर. के. आठवले**

------

होतसे तुझे असे बघ, नापीक शेत का?
पीक काढता न आले, तर काय फायदा?
**- मुक्तविहारी**

-------

हुंदके हे कसे थांबवावे जे बळीच्या गळा दाटले
न्याय देण्या खरा अन्नदात्या न्यायदाता खरे पाहिजे ।
**- चित्रा कहाते, नागपूर**

-------

तो असतो मालक शेतीचा पालक
त्याला नसते रजा असा तो बळीराजा
**- विनायक अंगाईतकर**




# कृषि उत्पन्न बाजार समिती,

## हिंगणघाट, जि. वर्धा

**बाजार समितीची वैशिष्टे**

- शेतकऱ्यांकरीता धान्यबाजार व कापुस बाजार येथे रु. १ मध्ये भरपेट जेवन.
- रु. १/- मध्ये निवासची व्यवस्था व सकाळी निःशुल्क चहा.
- २४ तास सुरक्षा व्यवस्था.
- मार्केट यार्डवरून बस स्थानकापर्यंत निशुल्क बसची व्यवस्था.
- (रु. १०००/- मध्ये लग्न) कानगाव येथे बिछायत व भांड्यासह रु. १०००/- मध्यें मंगल कार्यालयाची व्यवस्था.
- अभियांत्रिकी (बि.ई.) द्वितीय वर्षाला प्रवेश घेणाऱ्या शेतकरी व शेतमजुर पाल्यांना रु.३०,०००/- पावेताच्या लॅपटॉपचे ५० टक्कें अनुदानावर वितरण.
- चर्चा सत्राचे आयोजन व रु.१०/- मध्ये शेतकऱ्यांना १,७४,३११ फेरोमॅन ट्रॅपचे वितरण.
- प्रकल्पाअंतर्गत ९०००० चौ.फुट मध्ये लिलाव शेडची उभारणी
- संगणीकृत लिलावाची १००% अंमलबजावणी
- धान्य मार्के यार्डवर सि.सि.टि.व्ही. कॅमेरा उभारणी
- योजनेअंर्तगत क्लीनिंग ग्रेडिंग मशिन व गोदाम बांधकाम सुरू
- भव्य प्रशासकीय इमारतीची उभारणी

**आगामी महत्वाकांक्षी योजना**

- शितगृह उभारणी
- माती पाणी व पान परीक्षण प्रयोगशाळा




**संचालक मंडळ :** मा. हरिष वडतकर (उपसभापती), सर्वश्री मधुकरराव डंभारे, मधूसुदन हरणे, ओमप्रकाशजी डालिया, उत्तमराव भोयर, शेषकुमार येरलेकर, विनोंद वानखेडे, अशोक उपासे, राजेश मंगेकर, सुरेश सतोकर, बापुरावजी महाजन, बळीराम नासरे, सुरेश वैद्य, पंकज कोचर, संजय कातरे, सौ. सुरेखाताई सायंकार, सौ. माधुरीताई चंदनखेडे, संजय तपासे, राजेश कोचर, सचिव टी.सी. चांभारे

# कृषि उत्पन्न बाजार समिती, सिंदी

## उपबाजारपेठ, सेलु.

समितीच्या सिंदी व उपबाजारपेठ, सेलू येथील मार्केटला मोठ्याप्रमाणात धान्य व कापसाची आवक असुन **लिलावा द्वारे शेतमाल विक्री** केल्या जाते यामुळे शेतकेऱ्यांना जास्त दर मिळतो.

**शेतकऱ्यांना सूचना**

१. मार्केटमध्ये कापुस लिलावाद्वारे विक्री यात जास्त दर मिळतो.
२. शेतकऱ्यांनी आपला शेतमाल लिलावामध्येच विक्री करावा.
३. आपला शेतमाल स्वच्छ व वाळवून आणावा यामुळे दर जास्त मिळतो.
४. समितीच्या सिंदी व सेलु येथे शेतमाल तारण योजना सुरू आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. याकरिता कार्यालयात संपर्क करावा.
५. ढगाळी वातावरण असल्यास माल विक्रीस आणू नये.
६. हमी दरामध्ये चणा विक्रीकरिता नोंदणी सुरू आहे. खरेदी विक्री सोसायटी सिंदी, सेलू येथे संपर्क करावा.

**टिप –** मार्केटमध्ये येताना तोंडाला मास्क लावणे, सामाजिक अंतर ठेंवणे, सॅनिटायझर्स किंवा साबणाने हात धुणे आवश्यक राहील.

| **विद्याधर वानखेडे** | **काशिनाथजी लोणकर** | **आय.आय. सुफी** |
|---|---|---|
| सभापती | उपसभापती | सचिव |

**व सर्व संचालक मंडळ**

फोन नं. (ऑ.) २६६२६३
(नि.) २६६२६४

# मे. किर्ती मशिनरी

## सिंदी रेल्वे, ता. सेलू, जि. वर्धा

**प्रो. निळकंठराव घवघवे**

**वितरक :**



- ✦ कोरोमंडल इंटरनॅशनल लि.
- ✦ सल्फर मिल्स, मुंबई
- ✦ भारत इन्सेक्टीसाईड, दिल्ली
- ✦ तुलशी सिडस् लि., गुंटूर
- ✦ सेन्ट्रोमेअर बॉयो सोल्यूशन, हैद्राबाद
- ✦ दफ्तरी सिडस्, सेलू
- ✦ PHG इंडस्ट्रीयल इंन्स्टिट्यूट, कोईमतूर
- ✦ प्लुगा पम्प्स ॲन्ड मोटर्स, बडोदा
- ✦ रॉकेट इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन प्रा.लि., कोल्हापूर
- ✦ पारस इरिगेशन लि. अहमदनगर

# महिला शेतकऱ्यांच्या दुःखाचा उद्गार

बदीऊज्जमा बिराजदार (साबिर सोलापुरी)



उर्दू शायरीत स्त्री देहाचं तिच्या सौंदर्याचं भरभरून कौतुक होत आलंय. स्त्री म्हणजे हुस्न-ए-मलिका, चाँदसी महेबूबा, फुलो की रानी, जानेमन, यासारख्या असंख्य उपमा, प्रतीकांची मनमानी उधळणं करण्यात आलीय. स्त्री म्हणजे प्यालात मद्य ओतणारी साकी, पुरुषांना रिझवणारी, दरबारात, मैफलीत नाचगाणं करून त्यांचं मनोरंजन करणारी अशीच रसभरीत वर्णनं येतात. बहुसंख्य उर्दू गझलकारांनी स्त्री देहाचा जणू बाजार मांडलाय. पुरुषी लालसेच्या, वासनेच्या निरनिराळ्या पातळ्यांवर तिला जोखण्यात आलंय. याला मराठीत काव्यदेखील अपवाद नाही. मराठी कविता असो वा गझल 'ती'च्याकडं प्रिया, प्रियतमा, प्रेयसी, दासी, सखी, साजणी या दृष्टिकोनातूनच आजवर पाहिलं गेलंय. कैक गझलकारांनाही स्त्रीच्या सुंदर देहाचीच भुरळ पडलीय. स्त्री देहाचं वर्णन करण्यासाठी खंडोगणती काव्यं खर्ची पडलीयत. एकूण काय तर उर्दू अन् मराठी गझलांमधून स्त्री म्हणजे उपभोग्य वस्तू म्हणूनच तिला शृंगारिक शब्दांनी सजवून पेश करण्यात आलंय. प्रेमाच्या नावाखाली तिला दुय्यम स्थानीच ठेवण्यात आलंय. 'चूल अन् मूल' अशीच तिची व्याख्या करण्यात आलीय. अबला म्हणून तिला हिणवण्यात आलंय. तिचा माणूस असण्याचा मानवी हक्कच हिरावून घेण्यात आलाय.

स्त्रीलाही अस्मिता असते. तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असतं. समतेचा अधिकार असतो. तिच्यातही अफाट आंतरिक क्षमता असते. कुठल्याही संकटाला पुरून उरण्याचा तिच्यात चिवटपणा असतो. कष्ट करण्यात तर ती पुरुषापेक्षा कितीतरी पटीनं पुढं असते. आता हेच पाहा ना! नापिकी अन् कर्जबाजारीपणाला कंटाळून कितीतरी हतबल शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग अवलंबलाय. परंतु शेतकऱ्याच्या बरोबरीनं शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या सहचारिणीनं म्हणजे महिला शेतकऱ्यांनी कधी आत्महत्या केलाय का? उलटपक्षी पतीनं अर्ध्यावर संसार अन् जीवनाची साथ सोडून गेल्यानंतर यत्किंचितही न डगमगता तिनं मोठ्या धैर्यानं परिस्थितीशी चार हात करत संसार विस्कटू नाही दिला. अकस्मित कोसळलेल्या दुःखानं खचून न जाता, स्वतःला सावरून शेत शिवारात राबून राबून कर्जे फेडली. मुलांचं शिक्षण केलं. मध्येच जीवनयात्रा न संपवता ती शेवटच्या श्वासापर्यंत जगण्याची लढाई लढत राहते. कुठून येते तिच्यात ही ऊर्जा? याचा कुणी शोध घेतला आहे का? किती गझलकारांच्या गझलांमधून महिला शेतकऱ्यांच्या एकाकी संघर्षाची शौर्यगाथा, स्फूर्तिगाथा आलीय?

वास्तविक शेतीशी स्त्रीच अधिकाधिक निगडित आहे. किंबहुना शेतीचा शोध स्त्रीनंच लावलाय. मातीत बी पेरलं की ते उगवतं. माती ही सर्जनशील आहे. हे जगाला सर्वप्रथम स्त्रीनंच सांगितलंय. मातीची आत्मीय भाषा स्त्रीलाच अधिक कळते. ती कधीच मातीचा अव्हेर नाही करत. पडतील ते कष्ट उपसत ती मातीशी एकसंध राहते. सभोवताली कितीही दुःखं घोंगावत असली तरी ती जगण्याला अव्याहतपणे भिडत राहते. शेतकरी जसा भुमिपुत्र आहे तसं महिला शेतकरीही भूमिकन्या आहे. मातीतूनच नाती निर्माण होतात. परंतु याकडं फारसं कुणी लक्ष वेधलेलं नाही. आजवर महिला शेतकऱ्यांच्या दुःखाला चव्हाट्यावर कुणी आणलेलं नाही. महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्था संघटनाचंही याकडं साफ दुर्लक्ष झालंय. महिला शेतकरी कष्टकऱ्यांच्या वर्गात मोडत नाहीत का? कणखर महिला शेतकऱ्याचं कष्टाळूविश्व कुणी उलगडलं नाही. याविषयी कुणी बोलत नाही. सगळेच मौन बाळगून आहेत. मराठी कवितेच्या प्रांगणातील महिला शेतकऱ्यांच्या दुःखाचा एक मोठा कोपरा रिकामाच राहिला होता. हा रिता कोपरा भरून काढण्याचं काम अखेर महिला गझलकारांनीच केलंय. या दुर्लक्षित विषयाला त्यांनी ठसठशीत उद्गार दिलाय. ही खरोखर वाखाणण्याजोगी गोष्ट आहे.

घरातील कर्ताधर्ता शेतकरीच जेव्हा आत्महत्या करतो तेव्हा घरात दुःखाचं, चिंतेचं वातावरण असतं. शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर कौटुंबिक ताणतणावातून मुलानंही आत्महत्या केल्याच्या बातम्याही अलीकडच्या काळात येताहेत. दुःखाची दुहेरी कुऱ्हाड कोसळते ती महिला शेतकऱ्यांवरच पण ती मोडून नाही पडत. दुःखावर स्वतःच फुंकर घालते. यातून मार्ग शोधण्याचा कसोशीनं प्रयत्न करते. काट्यांना न टाळता फुलाप्रमाणं माळते. काटे दुःखाचंच प्रतिकात्मक रूप असतं. तिच्या कष्टप्रद जीवनाचा प्रवास कधी नाही थांबत. तिची वाटचाल सुरू राहते. ती हिमतीनं पुढं पुढं पावलं टाकत राहते. ज्योत्स्ना राजपूत (पनवेल) यांनी स्त्री शेतकऱ्यांचं दुःख त्यांच्या शेरातून साकारलंय.

**दुःखावरी स्वतःच फुंकर घालते स्त्री शेतकरी**
**काट्यांनाही फुलासारखे माळते स्त्री शेतकरी**

कधी शेतात उगवणं होत नाही म्हणून तर कधी सावकाराच्या तगाद्यामुळं शेतकरी गळफास घेऊन आत्महत्या करतो. आत्महत्या

हा कोणत्याही संकटावरचा पर्याय नसतो. ही बाब अगतिक झालेल्या शेतकऱ्यांच्या ध्यानात नाही येत. शेतकऱ्याच्या निधनानंतर त्याच्या पुरती त्याची व्यथा संपते खरी पण दुसरी पीडा सुरू होते ती तिच्या पत्नीची. तिचं कष्ट कधी संपणारं नसतं याची तिला जाणीव असते. ती दुःखाला धीरोदात्तपणे सामोरं जातं. संसाराचं सगळं उत्तरदायित्व आपल्या खांद्यावर समर्थपणे पेलते. शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर तिच्या पत्नीची कशी परवड होते. एक व्यथा संपल्यानंतर दुसरी व्यथा कशी सुरू होते. याचं वास्तवदर्शी चित्रण गझलकारा निलोफर फणीबंद यांनी त्यांच्या शेरातून केलंय.

**व्यथा संपते मेल्यानंतर शेतकरी**
**संपत नाही कष्ट कधीपण त्या पत्नीचे**

खेड्यापाड्यात आजमितीस अशा कितीतरी कष्टकरी महिला आढळून येतात की ज्यांना गावात स्वतःचं घरदार नसतं. त्यांच्या नावावर शेतीवाडी नसते. त्यांना सातबारा नसतो तरीही उठसूट त्यांची कष्टाशीच गाठ असते. वादळवाऱ्यात, उन्हापावसात दुःखाचा बोभाटा न करता त्या राबत असतात. अनंत अडचणीतही प्रपंचाचा नांगर नेटाने ओढत असतात माळरानाचं नंदनवन करण्यासाठी. त्यांच्या घामाच्या धारांनीच माळरान बहरत राहतं. आपलं उजाड, ओसाड आयुष्य घेऊनच त्या माळरान फुलवत असतात. हा बहर प्रत्येकास सुखावणारा असला तरी या मूळ माळरानाचा उतारा कधी कुणी काढलाय का? तपासलाय का? यामागील कष्टाचा मागोवा कुणी घेतलाय का, असे अंतर्मुख करणारे प्रश्न ज्योत्स्ना चांदगुडे शेरातून उपस्थित करतात.

**ना तिला घरदार वा ना कोणताही सातबारा**
**काढला आहे कुणी का माळरानाचा उतारा?**

भाराभार कष्ट करूनही जेव्हा शेतीतून पदरात काहीच नाही पडत तेव्हा शेतकरी हवालदिल होऊन जातो. निसर्गच त्याच्या मुळावर उठलेला असतो. शेतकरी आत्महत्या करतो, शेतीचा अखेरचा निरोप होतो. संसार वार्यावर सोडून जगातून निघून जातो. त्याच्या पश्चात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचं घर म्हणूनच गाव त्यांच्या घराकडं पाहत असतं. आत्महत्याग्रस्त असा शिक्काच त्याच्या घरावर बसतो. हा शिक्का खोडून काढण्यासाठी पुढं सरसावते ती त्याची पत्नीच. दुष्काळाची, पावसाची जराही तमा न बाळगता पोरक्या लेकरांना जगवण्यासाठी बैल औताला जुंपून ती शेतात बी पेरत असते. 'धरणीमाय देईल ठाव' यावर तिचा पक्का भरवसा असतो. केवढा हा दुर्दम्य आशावाद, केवढं हे धैर्य, केवढी ही सहनशीलता! घरावरचा शिक्का खोडून काढण्यासाठी उपाशीपोटी बैलाबरोबर राबण्याची केवढी ही जिद्द! हे सारं स्त्रीच सहन करू जाणो! तिच्या अफलातून जिद्दीवर अनिसा शेख (दौंड-पुणे) असा शेर लिहितात.

**भीत नाही दुष्काळाला भीत नाही पावसाला**
**लागलेला व्यर्थ शिक्का आज मी खोडते आहे**

महिला शेतकरी दुःखाला किंवा वैधव्याला गोंजारत नाही बसत. ती परिस्थितीला शरण न जाता चक्रव्यूह भेदून बाहेर पडते. स्वाभिमानी बाण्यानं जगते. 'लाथ मारीन तिथं पाणी काढीन' हा जगण्याला बळ देणारा आत्मविश्वास तिच्यात नेहमीच टवटवीत असतो. कोरडवाहू कपाळावर कुंकू लावण्याची आवश्यकता नसते. खरी निकड असते ती कोरडवाहू कपाळाला कष्टाच्या घामानं बागायती करण्याची. काबाड कष्टाचं मोल ती जाणून असते. म्हणून ती कधी कष्टाकडं पाठ नाही फिरवत. शेतीतील कष्ट हीच तिच्या सामर्थ्याची जागा असते. मुजोर व्यवस्थेसमोर ती कमजोर नाही होत. कष्टालाच ती कुंकू मानत असते. यावर पूजा फाटे यांचा असा शेर येतो.

**कपाळ माझे कोरडवाहू**
**कुंकू त्यावर कशास लावू?**

विठ्ठलाच्या रंगात मातीचा रंगही मिसळलेलं आहे. मातीच नातं कष्टाशी असतं. म्हणून ही विठ्ठल हा कष्टकऱ्यांचा सखा आहे. ऐतखाऊंना त्याच्या दरबारी जागा नाही. मातीत घाम गाळणाऱ्यांनाच तो पावतो. महिला शेतकऱ्यांचं मातीवरच दृढ विश्वास असतो. मातीत त्या नुसतं बी नाही पेरत तर विश्वासही पेरतात. हा विश्वास आंधळा असला तरी त्यातून पिकं तरारून येतील, अशी त्यांची विठ्ठलावरची श्रद्धा असते. म्हणून त्या कष्टाची कास, आस कधीच नाही सोडत. कष्ट हेच त्यांच्या जगण्याचं सार अन् आधार असतो. म्हणून त्या कष्टाच्या देवालाच साकडं घालतात. याकडं योगिता पाटील त्यांच्या शेरातून लक्ष वेधतात

**मातीत पेरला मी विश्वास आंधळा**
**डोळ्यात तू पिकांना साकार विठ्ठला**


**बदीऊज्जमा बिराजदार (साबिर सोलापुरी)**
**भ्रमणध्वनी: ९८९०१७१७०३**
sabirsolapuri@gmail.com


बळीराजा कष्ट करून घाम भुईत सांडतो
लेकरांच्या सुखासाठी डाव जीवाचा मांडतो
**– सौ. अनुराधा धामोडे, वाणगाव (पालघर)**

# स्त्रीत्वाच्या मर्यादा पाळणेही आवश्यक

**तुळशीराम बोबडे**



भारत एक पुरुषप्रधान देश आहे. असे असले तरीही महिलांनी प्रत्येक क्षेत्रात भरारी घेतली आहे, नव्हे तर त्यांनी काही ठिकाणी प्रथम स्थान प्राप्त केले आहे. भारत प्रथम महिला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील, भारत प्रथम महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, स्वतंत्र भारत प्रथम महिला राज्यपाल श्रीमती सरोजिनी नायडू, भारत प्रथम महिला आय पी एस अधिकारी श्रीमती किरण बेदी, माउंट एव्हरेस्ट सर करणारी प्रथम महिला बचेंद्री पाल, सर्वोच्च न्यायालय प्रथम महिला न्यायाधीश श्रीमती फतमाबी, प्रथम महिला लोकसभा अध्यक्ष श्रीमती मीरा कुमार, प्रथम महिला राजदूत श्रीमती विजया लक्ष्मी पंडित, प्रथम अनुसूचित जाती महिला मुख्यमंत्री श्रीमती मायावती, अंतरीक्षात जाणारी प्रथम महिला कल्पना चावला, भारतीय प्रथम आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले, आर्मीडे संचलन करणारी प्रथम महिला लेफ्टनंट भावना कस्तुरी, आणखी अशी बरीच उदाहरण असू शकतात पण त्यासाठी त्या मागे असणारी प्रेरणास्रोत कोणी असेल तर ती आहे सावित्रीबाई फुले.

महिला शिकली नसती तर एवढी पुढे जाऊ शकली नसती. सावित्रीबाईचा विवाह नवव्या वर्षी बारा वर्षीय ज्योतीराव फुले यांचेशी झाला. त्या दोघांचेही कार्य अद्वितीय आहे. सावित्रीबाई एक धाडसी, सहनशील, उदार, कवयित्री, समाज सुधारक, शिक्षिका, पत्नीधर्म परायन स्त्री म्हणून त्या महानायिका ठरतात. मेरी कोम बॉक्सिंग मध्ये श्रेष्ठ आहे. फोगट भगिनी, साक्षी मलिक कुस्तीत पारंगत आहेत. पुरातन काळातील गर्गेयी, मैत्रीई, चंदबीबी, रझीया सुलताना, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, राणी पद्मिनी, मा जिजाऊ, तसलीमा नसरीन, सुनीता विलिम, सानिया मिर्झा, मिताली राज अशी शेकडो उदाहरणे देता येतील.

भारतीय संस्कृतीत स्त्री माहात्म्य वर्णन केले आहे. मातृ परदैवतमा. शौर्य, ममता. शिवबाचा जन्म जिजाऊच्या पोटी झाला व त्या शिवबाने मातृप्रेरणेने आपले, मातापित्याचे व देशाचे नाव अजरामर केले. असं असलं तरीही निसर्गात स्त्री पुरुष भेद आहेच आणि तो राहणारच आहे. तसेच संस्कृती व प्रेरणा पाळणेही महत्त्वाचे आहे. स्त्रियांना समान हक्क, समान संधी अवश्य असाव्यात परंतू निसर्ग निर्मित मर्यादा पालनही अवश्य व्हावे.

कुणी संस्कृती व मर्यादाशील समाजासाठी काही संदेश दिला तर महिलांनी तो उपमर्द न समजता त्याचा गंभीर मतितार्थ ध्यानी घ्यावा कारण अती तेथे माती म्हणून नीती, परंपरा, चारित्र्य, वेशभूषा या बाबीकडे दुर्लक्ष होता कामा नये. हक्कासोबत कर्तव्यही असतेच याचे भान असावे. पुरुषांनीही महिलांचा योग्य सन्मान करावा. त्यांचे मन, सहकार्य विचारात घ्यावे, यालाच कौटुंबिक सहजीवन म्हणतात. आज महिलांना घरमालकी, स्त्रीधन, सातबारावर नाव आदी अधिकार प्राप्त आहेत. महिला त्याग, कष्ट, उपासतापास, व्रत, वैकल्ले, स्वच्छता, मातृ कर्तव्य करत आहेच. सोबतच पुरुषालाही आर्थिक उलाढाल, पुरुषी जबाबदारी, कुटुंब पालन, पिता कर्तव्य, पती कर्तव्य पार पाडावे लागतात, म्हणजे समान हक्का सोबत कर्तव्य व मर्यादा पालन आलेच.

**संसार दोघांचा असतो दोघांनी सावरायचा असतो**
**एकाने पसरवला तर दुसऱ्याने आवरायचा असतो**

**तुळशीराम बोबडे**
**अकोला**


उदर भरण होते शेतीत सकल जणांचे
चरून जाती येथे कळप जंगली श्वापदांचे
पक्षीही टिपतात येथील कणसातील दाणा
शेती शिवाय नाही असा कुठलाच कारखाना
ज्यात मिळेल हजार दाणे टाकून एक दाणा
**– राजेश अंगाईतकर, यवतमाळ**

------

कमरेला पदर खोचुनी आता विळा घेतला मी
धनी नाही एकटा आडवी रस्त्यात मी
**– बाबा कोकेवार**

# तिचं परगती पत्रक

**रावसाहेब जाधव**



**कथा**

''अय पुरी, आसी लेकुरवाळी भाजी नाय मिळणार कुठंच. लाल कोराची हाय. समदा बजार फिरली तरी येशील इठ्ठच.''

खरंच व्हतं ते. आतापोतर सम्दा बजार धुंडाळून आली व्हती ती. ''घेयचं ते काय मेलं, दोन मेथीच्या जुड्या.'' मनात कुरकुरत मंदानं समदा बजार पालथा घातला पर भाजी काय मनात भरत नव्हती.

''नाय... पर शंकर आन्नाच्या भाजीची बरुबरीच नाय व्हऊ शकत.'' असा मनात इचार करत ढिगातून दोन जुड्या उचलल्या. बोटं खुपसून कवळ्या बगल्या न्याहाळीत शेंडे इकडंतिकडं लोटत जुडीत लपलेल्या गवताचा शेंडा नखानं खुडून खाली टाकला. जुड्या पिसीत टाकल्या. भाव न करता छातीवर जपलेल्या पाकिटातनं धा रुपयाची नोट काढून शंकर आन्नाच्या हाती दिली. आधीच बटाटे, मिर्च्या अन टरबुजाच्या भारानं तान्लेल्या नाड्या जुळवत पीसी उचलून हाती धरली. बोटांवर पडणाऱ्या करकुच्याचा इचार न करता ती झपाझपा चालत चौफुलीवर पोचली. काळ्या पिवळयया जीब्गाडीतल्या दाटीवाटीत घुसली. कसीबसी बसली.

धडधडत चालनारी गाडी थांबवली. मळ्याच्या पायवाटवर उतरली. वजनदार पीसी तोलत चालत निन्घाली. घराच्या पडवीत पोचली. पीसी मेडीला नीट उभी करून ठिवली. दुसऱ्या मेडीला पाठ टेकून उसासा टाकत बसली. आता तिला मावळतीच्या उन्हाचा रंग दुपारपेक्शा जरा फिका वाटू लागला व्हता.

सकाळची शाळा असच्यानं वंदी आज दुपारपसूनच घरी आली व्हती. आईला पाहून तिनं दप्तर बाजूला सरकवत वहीतून भाईर काढून ठीव्लेलं पिवळ्या रंगाचं आपलं परगती पत्रक आईपुढ केलं ''आई यच्यावर सै करून ठीव. परत ध्येनात नाय ऱ्हाणार.'' मंदानं तो पिवळा कागद एका हातात धरला. दुसऱ्या हातात पेन धरून बराच येळ निरखत ऱ्हायली.

तव्हर वंदीनं पिसीतून एकेक करून समद्या वस्तू भाईर काढून टोकरी पाटीत भरल्या अन घरात नेऊन ठीवल्या. शेवटचं टरबूज मात्र उचलून वट्याकडंच्या राजनात नेऊन अलगत सोडून दिलं. त्याचा गरमपणा कमी व्हायच्या आशेनं. कदाचित ते उद्याच कापनं जानार व्हतं.

वंदीचं परगती पत्रक मंदानं सै करून बाजूला ठिवलं. ''वंदे पानी आं गं.'' वंदीनं पाण्याचा तांब्या भरून आईच्या हातात दिला. आपलं परगती पत्रक अन पेन उचलून दप्तरात यवस्थित ठिवलं. मंदानं दोन घोट पानी गिळून तांब्या जमिनीवर ठिवून उजवा तळहात तांब्याच्या तोंडावर ठिवला अन मिटल्या व्हटांनी स्वताशिच बोलत हरवत गेली. बराव वेळ मंग तांब्यावरचा तळहात तसाच राहिला. तोंड कोरडं आसुनबी.

कालपरवापोतर पाट्या भरून बजारात इकायला नेणाऱ्या मंदानं आज त्याच बजारातून तेच माळवं इकत आनलं व्हतं. बटाटे, काकड्या, वांगे, मेथी असं एक नंबर माळवं पिकवून दर सोम्मारी बजारात माळवं इकनारी ती मालकीन आज मात्र तेच माळवं इकत घेताना मालकीनीचा दिमाक गमावून बसली व्हती. अचानक नदरेपुढं तिला उरल्या चार बिघ्यातले ढेकळं किडलेल्या टरबुजान्सारखे दिसू लागले.

''वंदे, ते टरबूज तसंच टाकलं ना राजनात? नीट पाह्यलं व्हतं का?''

''आगं ते लई गरम लागलं हाताला. पक्कं उन्हटलं आसंल म्हनून टाकलं राजनात.'' वंदीचं बोलणं मंदाला काय ऐकू गेलं नही. ती उठली. राज्नातून टरबूज काढलं. पदरानं पुसलं. चहुकुन न्याहाळलं काय कुठं किडीबिडीचं भोक नसल्याची खातरी झाल्यावर पुन्हा राजनात सोडून दिलं.

''वंदे चुल्ह पेटव'' मंदाच्या सांगण्याआधीच वंदीनं चुल्ह्यातली राख आळ्यात वढून गवरीच्या खांडावर राकेल वतलं व्हतं. अन पेटवलेलं ते खांड आपल्या नाजूक हातांनी हिकमतीनं रचल्या लाकडान्खाली सरकवून लाकडं पेटायची वाट पाहत बसली व्हती.

''पेटवलं. च्या ठिवू का कालवन टाकू?''

''च्या ठीव. कालवन बाकिते मी.'' असं म्हणत मंदा घरात गेली. उभ्या पोत्याचं तोंड सोडून त्यातल्या चार खोंगा

भिगुनाच्या शेंगा पदरात घेतल्या अन पडवीत येऊन शेंगा सोलत बसली. मंदाचे खोंग दिड्खोंग शेंगदाने सोलून व्हईस्तोर वंदीनं च्याची कब्स्सी आनून मंदापुढं ठीवली अन तयार झालेले दाने वंजळीत उचलून घरात घेऊन गेली. हिरव्या जाडसर चार मिर्च्या, खोन्गभर जाड मीठ अन व्हते तेव्हढे शेंगदाने एका ताटलीत घेऊन दुसऱ्या हातात पाण्याचा तांब्या सांभाळत भितीला उभ्या पाट्याजवळ गेली. हातातल्या वस्तू खाली ठिवून पाटा आडवा पाडला. त्यावर वराटा सरळ उभा धारून त्याच्या अंगावर वंजळभर पानी घातलं. बाजूला ठिवला. पाट्याच्या खोलगट जागी साचलेलं पानी तळहात आडवा करून झटके देत दूर फिस्कारून दिलं. तोच रिकामी कब्स्सी खाली ठीवत मंदानं तिला थांबवलं. ''थांब गं, मीच वाटीते वाटंन तू लई जाड ठीविती.''

वंदी उठली. उष्टी कब्स्सी उचलली. तीत जरासं पानी घालून ईसळून बाजूला फेकलं अन घरात घेऊन गेली. मंदानं वाटन ताटलीत काढलं. घरात घेऊन गेली. धडकल्या चुलीवर भगूनं ठिवून कालवन टाकलं. उकळी फुटल्या कालवनाचं भगुनं बोटांवर काठ झेलत उचलून औलावर ठिवलं. मोकळ्या चुलीवर भानुसीवरला उभा तवा आडवा पाडला. काठूटीत पीठ चाळून मळत सरावल्या हातामधी उंडे आकार घेऊ लागले. तीन भाकऱ्या अन एक चान्की भाजून टोपल्यात पडली. मंग दोघी जेवल्या. खरं तर हे समदं रोजचंच पर आज सांगायचं कारण म्हंजी त्या दोघीमधी बोलणं कमी अन सराईतपनाच्या हालचाली तेव्हड्या चालत ऱ्हायल्या. तरीपन दोघी बी मनात मात्र रोजच्यापेक्षा जरा जास्तच बोलत व्हत्या. अन हे त्या दोघीन्ला बी जाणवत व्हतं. कदाचित म्हणूनच त्या दोघी एकमेकींच्या नजरा बी टाळत व्हत्या. ''लई वारं सुटलंय भायेर. घरातच टाक गोधडी.'' मंदाच्या उरातलं कापरं वार बोलन्यात वाहू लागलं व्हतं. हे कळण्याइतकी समज वंदीला आली व्हती. ती आता नव्वीच्या वर्गाची स्सामाही परीक्षा देणार व्हती. म्हणूनच गोधडीवर आडव्या पडल्या आईशेजारी बसून दप्तरातून आपलं पुस्तक काढून वाचू लागली व्हती. चार पानं उलटल्यावर डोळ्यावरल्या पापण्या जडावल्या अन ती केव्हा कलंडली हे तिला बी नाय कळलं.

मंदानं तिच्या तोंडावरून हात फिरवला. गोधडी वढून तिचं आंग झाकून टाकलं. पर स्वताच्या डोळ्यावर मात्र पाप्न्या काय वढू शकली न्हाई. आढ्याच्या वाश्याकड पाहत ऱ्हाईली. आज आधाराचे वासे तिला सापासारखे वळवळताना भासू लागले. डोळा लागू लागताच वाशांचं असणं सरून आंगावर सपर कोसळून पडल का काय असा भास व्हवू लागला. मंग ती उजाडायची वाट पाहू लागली. आता तिचे डोळे भितीवर लटकलेल्या घड्याळातल्या काट्यावर लटकून ऱ्हायले. त्या काट्यांचं सरकणं तिला बरच मांगं घेऊन गेलं. तिच्या डबडबल्या डोळ्यात आज पुन्यांदा नवऱ्याच्या वरीसरीदाच्या दिसाची तिच्या नातलगांची बैठक उसळ्या मारत वाटणीच्या कसरती करू लागली. तिनं नेह्मीसारखा हुंदका दाबला पर गतकोळाचा काटा मात्र कुरपासारखा टोचतच ऱ्हायला.

''सगळे पावने जमलेच हाय तर लावून टाका एकदांचा सोक्समोक्स.'' तिच्या धाकल्या दिरानं इशयाला हात घातला. ''दादाच्या आजारापाई चार बिघं जे वपलं ना तेव्हढं कमी द्या वयनीला.'' हे मंदाच्या देराचं म्हणणं म्हताऱ्या धोंडीबा मामाला काय मान्य झालं न्हाई. ''हे बग अन्ना, आरे एकत्र आसताना जे काय केलं ते समद्याइचं आसतय. मग ती कमाई आसू दे वा गमाई. तव्हा आसं करून न्हाय चालायचं.''

''न्हाय कसं? आता तिच्या नवऱ्याच्या आजारापाई गेली ना जुमीन? त्यात आमचा काय दोस? मंदाच्या ननंदेनं धाकल्या भावाची झील वढली.

''आगं बाई, ही वाटणी नावं करून घेईल अन दुसरा नवरा केला तर टाखिल ना सारं इकून.'' गर्दीत कुज्बुजणाऱ्या शांताक्काचं बोलनं मंदाचं काळीज चिरत गेलं तरी बी नवरा गमाव्लेलं तिचं काळीज साऱ्यांचं सारं मान्य करित गेलं. तिचं चवताळ मन हुंब्रू नाय शकलं त्या घडीला.

शेवटी झाले तीन हिस्से. म्हंजी ननंदबाईचं निस्त नाव. हिस्सा ऱ्हाणार तो देराकडच. मंदाला पडीचा हिस्सा घ्यावा लागला. तोही कमीच घेतला. वावराच्या वाटण्या सरल्या. हिरीच्या पाण्याची पाळी दोन दिसाची. वाटणीला आल्या भांड्यांवर बाडदन टाकून झाकलं. घर न्हाईच. घराचा एक कोपरा बी नाय आला वाट्याला. न्हाय म्हनायला घराच्या बदल्यात पंचीस हजार द्यावं कबूल केलं देरानं. त्यात सादी खोपटी बी नाय व्हणार हे कळत असून बी तिनं कुरबुर न्हाई केली.

''आपून कोर्टात जाऊ.'' मंदाचा भाऊ तिच्याशी झाल्या दुजाभावाचं दुख हाल्क करायचा प्रीयत्न करित व्हता. भावाचा हा सल्ला बी नकारत तिनं पदर खोसला. कोपऱ्यावरल्या बाभळीच्या आसऱ्याला खोपी उभी केली. रात अन दिसातला फरक तिनं इसरून मळा फुलवला. चार बिघे जमीनीनं तिला आता बैलगाडीची मालकीन बनवलं व्हतं. बैलगाडीभर माळवं घेऊन बाजाराला जाऊ लागली व्हती. तिची बैलगाडी बजार तळात आल्याआल्या धा-पाच खेपाडी भवती जमायचे. सौदा करायचे माळवाच्या डालक्या उचलून न्यायचे अन रिकाम्या डालक्या सांजच्या आधी परत करताना सौद्यापरमानं पैसे मोजून द्यायचे. पर मांगच्या चार हंगामात हिरीचं पानी बसल्यानं तिच्या उरावर आता कोरडे ढेकळं तेव्हढे नाचत व्हते. तशातच गुडग्यावर रिन्णारी वंदी आता नऊ वर्ग सरकत पढं आली व्हती.

पापण्या दाबून डोळ्यातला साचला गतकाळ वाहता केला. गाल पुसले. घड्याळ पाहिलं. तास काटा आता तिनाला भिडला व्हता. भायेर आजून आंधारच व्हता. डोळे मिटायची गरज भासू लागली व्हती. पर काळीजाचं डूच्काळनं काय थांबना. दुसरी जखम ठसठसत भळभळू लागली.

''काय चूक व्हती यैंची? कोनासाटी करीत व्हते ते?'' डोक्याला खोक पडून सुद हरपल्या नवऱ्याचा चेहरा तिच्या डोळ्यापुढं तरळू लागला.

दसरा. वंदीच्या जन्माच्या सालची हकीगत. मंदा माहेरला. वली बाळतीन. बातमी कळल्या कळल्या वंदीला बाळंत्यात गुंडाळलं. धाकल्या भावानं गाडी जुपली. सासरी पोचली. निपचित पडलेल्या तिच्या नवऱ्याच्या डोक्याला फडकं गुंडाळून झाल्यावर त्याचं रक्ताळलं आंग पुसत म्हादू तात्या हकीगत सांगत व्हता.

मोहतुराला आपल्या लाल कांद्याची गाडी नंदूनं मोहळी लावून भरली अन मार्किटच्या तळावर पयल्या हारित पयल्या नंबरला उलाळून दिली. तेव्हढ्यात गावातल्या गंगारामची गाडी आली. मार्किटच्या बेपाऱ्याईचं अन गंगाराम्च साटंलोटं नंदूच्या काय ध्येनात आलं नव्हतं. गंगारामनं आपली गाडी नंदूच्या गाडीच्या आधी उभी केल्यानं नंदूचा नंबर डावलला गेला.

''गंगा, आरं मी पयला आलोय. मोहतुराचा निलाव माह्याच गाडीचा व्हाया पायजे.''

''येडा झाला का नंद्या? आजपोतूर मी मोतुर चुकवला न्हाई. तू कुठून आला शाना.'' गंगारामच्या या बोलण्यानं नंदूचं उसळतं रगात डिवचलं गेलं.

''गंग्या आपल्या आधी गाडी लावू नको. नायतर आपल्यैत्क वाईट नाय मंग.''

''येड्यावानी नगं करू नंद्या. आज्पतूर माह्या नादी नाय लागलं कोनी. उगच जिरवून घ्याची आसल तर लाग नदी.'' गंगारामच्या शांत पण मगृरीच्या बोलन्यानं नंदू उसळून उठणार तोच जमलेल्या गर्दीतून सखातात्या पुढं झाला अन नंदूला वढत बाजूला नेऊन चार शबुदाचं शानपन शिकवू लागला. तवर चार बेपारी आपला लवाजमा घेऊन गाड्यानच्या हारीच्या तोंडाशी आले. निलावाचा सुभारंब केला. नारळ फोडलं. गंगारामच्या गळ्यात शाल टाकली. ''तीन हजार एकशे अकरा.'' गंगारामची गाडी पुकारली. नंदूचा मान गमावला गेला.

''अन्याय हाय हा.'' मनातली कळ नंदूनं दाबून धरली. भल्या पाहटी येऊन बी उपेग झाला न्हाई. ही सल डोक्याची सालं सोलत असताना नंदूनं हातातला कांदा मुठीत आवळून रस पिळून उरलेला चोथा बाजूला फेकला. नंदूच्या गाडीभवती बेपारी उभे ऱ्हाईले.

''सातशे अकरा.'' माल तर सारकाच पर भाव....? ऐकून नंदूचे डोळे कान्द्यांपेक्षा बी लाल झाले व्हते. आपला मोहतुराचा चानस गंगड्यानं मारला, म्हणून चरफडणारा नंदू आतून पेटत ऱ्हाईला.

तसाही गंगाराम कमिटीच्या सदस्याचा पोरगा. त्यामुळं त्याचं समदीकड धकत व्हतं. ''त्याच्या नादाला लागू नको.'' हा सखातात्याचा सल्ला नंदूचं मन जुमानीना. ते सुडाचा जबडा उघडायचा प्रीयत्न करतच ऱ्हाईलं.

आटपला निलाव. काटा झाला. पावती घेतली. नंदू आल्या वाटानं परत निन्घाला. खरंतर बैलच त्याला घेऊन चालू लागले व्हते. पाठलाग करीत गंगारामची गाडी आली. नंदूला वलांडू लागली. बैलांच्या छंब्यांच्या घुंगुरनादापेक्शा बी त्याची हिंनवनीची नदर नंदूच्या मेंदूवर काकड्याचा फटका देऊन गेली. नंदूनं बी मंग काकड्याच्या पानाचा हवेत आवाज काढला. गाडी घेऊन बैल पळू लागले. गंगारामच्या गाडीच्या पुढं आपली गाडी पळवताना नदूनं शी हासडली अन मंग दोन्हीकडून रस्ताभर फक्त श्यांचा सडा

पडत गेला.

थोड्याच येळात आंतराचा अंत झाला. गाड्या थांबल्या. दोघांनी खाली उड्या मारल्या. गळचुंडे धरले गेले. तुफान हानामारीला सुरवात झाली. नंदू पडला. गंगाराम गाडीसह गायप. नंदूची गाडी रस्त्यात उभीच. बऱ्याच गाड्या आल्या. पुढं गेल्या. आंधारात रस्त्याच्या चारीत पडल्या नंदूला कोनी पाह्यलं न्हाई. शेवटी म्हादुच्या म्हताऱ्या बैलांची गाडी वजंवजं आंतर तोडत जवळून जात आसताना नंदूची उभी त्यानं वळखली. मनात पाल चुकचुकली.

''नंद्या...?'' हाक देऊन बी म्हादूला सुगावा लागना. धोतर सावरत उतरला. अंधारात डोळे फेकत इकडं तिकडं शोद घेऊ लागला. चारीत वळवळ जानवली. नंदूच व्हता तो.

''रगत?...'' वासावरून त्याला कळलं. नंदूला चारीतून वढून वर काढलं. रगतानं भिजले कपडे. घाई करत उचलून गाडीत घातला. आपली गाडी पुढं घेतली. नंदूच्या बैलांचे कासरे आपल्या गाडीच्या पांजरीच्या मुन्यांला बांधले अन बैलांचे व स्वताचे म्हतारपन इसरून गाड्या पळवत नंदूचं घर गाठलं. नंदूच्या धाकल्या भावाला हाका मारत गाडीतून खाली उतरला. मंग आरडावरडा, रडगाग. शेजारीपाजारी धावले. तोवर नंदूला खाली घेऊन त्याच्यावर उपच्याराला सुरवात झाली व्हती. नंदू जरा सावद झाला. समद्यांना घडलं ते सांगून टाकलं पर आखरीला जो कलन्डला तो काय परत उठला न्हाय. सिरपाच्या पिकप गाडीत घालून तालुक्याच्या सरकारी दवाखान्यात नेलं.

''ही पोलीसकेस आहे. आधी केस नोंदवा मग ॲडमीट करा.'' डॉक्टरनं फोन करून पोलीस बोलवले. पंचनामा वगैरे झाल्यावर डॉक्टरनं सलाईन लावलं अन ''ऑक्सिजन संपलाय.'' असं कारण देत तिथून खाजगी दवाखान्यात हाकललं.

आरजंट मेंदूचं आपरीशन.

चंद्रकांत शेटला निरोप गेला. तसा तो थेट दवाखान्यात पैशांची थैली घेऊनच आला. एकरभर जमिनीचा तोंडी सौदा झाला. 'नंदूच्या हिस्स्याची एक एकर जमीन' असी इसार पावती झाली.

मह्यना उलटला. नंदू ठीकठाक व्हऊन घरी आला. बापाच्या मांगं उताऱ्यावार वारस असलेले तिघं तालुक्याला गेले. चंद्रकांत शेटसोबत ठरल्या आटीपरमानं खर्दीखत उरकवल.

पाच सालं उलटून बी नंदूचं वागणं डोक्यावर परिणाम झाल्यागतच ऱ्हायलं. अश्याच एक दुपारी तो एकलाच गव्हाला बारे द्यायला गेला. अन भवळ यऊन पाटसरीत पडला. कायमचा.

वंदी शाळतून घरी आली. आपलं दप्तर उघडत त्यातनं एक पिवळा कागद काढून आईपुढं नाचवू लागली. ''आय दादा कुठंय?... सयी करून उद्या परत मागीतलं बाईंनी.''

''आगं, लय कव्हाधरनं गेले गव्हाला पानी भराया. पाहाय तरी जाऊन.'' मंदाचं बोलनं सरायच्या आधीच वंदीनं धूम ठोकली अन दोन वाटण्या वलांडून तिच्या डोक्याइतक्या वाढलेल्या गव्हाच्या वावरात पोचून हाका मारत सुटली. ''दादा.... दादा...''

दांड फुटून पसरलेलं पानी पाहात कोरड्या बांधावरून चालत ऱ्हाईली. तोच पाटसरीत पालथा पडलेला नंदू पाहिला अन मोठ्यानं वरडून उठली. तिचं वरडनं शिवारभर पसरत गेलं. मंग समद्यांचीच धावाधाव.

नंदूला सरणावर सोडून आलेली मंदा सालभरानं येगळी झाली. नंदाला घेऊन.

आता भायेर फटकलं व्हतं. ''वंदे उट गं. आज शाळाला सुटी हाय ना? तेव्हढं वावर येचून घेऊ.'' आसं म्हणत वंदीचं दप्तर जवळ वढलं. त्यातनं पिवळ्या रंगाचं परगती पत्रक काढलं. त्यावर काल सई करायला इसरली नसल्याची खात्री केली. तेवढ्यात तिच्या डोळ्यातून निसटलेला आसू नेमका त्यावर टपकला. जरी तिनं तो हलक्या बोटान हळूच पुसला तरी त्यानं मराठीचे आकडे खाल्लेच, जे जरा जास्ती व्हते इतरांच्या मानाने.

''झोपू दे गं.'' वंदी जरा वळवळली अन आंगावर गोधडी वढून पुन्हा झोपली.

रात लोटून लावल्याच्या उत्साहानं मंदा उठली. दार उघडलं. चुल्ह्यावर पानी तापत ठीवलं. हातात घोळ घेतला अन आंगनवटा झाडाया भायेर पडली.


**रावसाहेब जाधव (चांदवड)**
**७० महालक्ष्मी नगर, चांदवड,**
**जि. नाशिक-४२३१०१.**

७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



किसान
ट्रेडींग कंपनी
सिंदी रेल्वे

७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



श्री. इंदरचंदजी बैंद
खैरी, जि.यवतमाळ

७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



श्री सुभाष बोकडे
कुरझरी, जि. वर्धा

७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!




श्री मुकुंद खोडे
सेलडोह



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री रविंद्र खोडे
सेलडोह, जि. वर्धा



८ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री. नितीन खेरडे
सामाजिक कार्यकर्ते आणि कॉन्ट्रॅक्टर
ता. वरूड, जि. अमरावती



८ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री. रत्नाकरजी वानखेडे
शेतकरी संघटना जेष्ठ कार्यकर्ते
मु.पो. मांगरुळी, ता. वरुड
जि. अमरावती



८ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री. उमेश उर्फ चंदूभाऊ
यावलकर
नगरसेवक, नगर परिषद, वरूड
ता. वरूड, जि. अमरावती

आता उजाड रानी, वणवा सुसाट सुटला
'बळीराज्य' स्थापनेची, चाहुल नक्की आहे
कां ठावं हे तुम्हाला, आभासी मर्कटांनो
गावात मात्र माझ्या, ही खबर पक्की आहे

नरेंद्र गंधारे, हिंगणघाट

*****

# सीड मदर राहीबाई

डॉ. आदिनाथ ताकटे



आपला देश हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. या कृषिप्रधान देशात अनेक प्रकारचे पिकांचे वाण उपलब्ध आहेत. परंतु, हरितक्रांतीनंतर देशात हायब्रीड बियाणांचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होऊ लागला, भरमसाठ उत्पादनामुळे शेतकरी हायब्रीड बियाणांकडे वळले. आणि पारंपारिक, गावरान वाणांच्या वापराकडे, जतनाकडे दुर्लक्ष झाले. अशा पारंपारिक आणि गावरान वाणांचा जतन सीडमदर राहीबाई करत आहे.राहीबाई या निरक्षर असून, ज्ञानाने समृद्ध आहेत त्यांच्या विषयी आज आपण जाणून घेऊ यात.

विविध क्षेत्रात काम करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या जगातल्या १०० महिलांची यादी दरवर्षी बीबीसी इइउ१०० थेशप प्रसिद्ध करते. २०१८ हे वर्ष जागतिक स्त्री हक्क दिन म्हणून साजरा केल्याची औचित्य साधत २०१८ इइउ१०० थेशप च्या यादीत समाविष्ट झालेल्या १०० महिला नवप्रवर्तनाच्या निदर्शक आहेत. या यादीत राहीबाई ७६ व्या स्थानावर आहेत. १०० थेशप बीबीसी च्या प्रेरणादायी महिलांच्या जागतिक यादीत त्यांचा समावेश करण्यात आला आहे. ज्यांनी आंतरिक ओढ, असमाधान आणि उद्वेगाच्या उद्रेकातून भोवतालच्या जगात मूलभूत बदल घडविले आहेत.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील कोंभालणे या खेडेगावातील राहीबाई पोपरे या जगाच्या पटलावर सीड मदर म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या आहेत. ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांनी एका कार्यक्रमात राहीबाईंचा उल्लेख मदर ऑफ सीड असा केला होता.

आदिवासी समाजाच्या राहीबाई निरक्षर आहेत, पण निसर्गाच्या शाळेत त्या खूप काही शिकल्या.लहानपणापासून त्यांना बियाणे जमविण्याचा छंद होता. राहीबाईंच्या वडिलांकडून त्यांना हे ज्ञान मिळाले.त्यांचे वडील नेहमी म्हणायचे जून ते सोनं त्याचा अर्थ राहीबाईंनी चांगला समजून घेतला. राहीबाईच्या आजूबाजूच्या परिसरातील बहुतांश शेतकरी आजही पारंपारिक देशी वाणाचे बियाणे वापरूनच शेती करतो. सुरुवातीच्या काळात राहीबाईना हे काम करताना अनेकांनी वेड्यात काढलं. राहीबाई हे काम पूर्वी छंद म्हणून करायच्या. सुरुवातीला अनेक लोकांकडून त्यांना अनेक प्रकारची बोलणी ऐकावी लागली,पण त्यांनी मार्ग सोडला नाही. पारंपारिक पद्धतीने त्या बियाणे गोळा करायच्या, शेतात त्याचा वापर करायच्या. पुढे बायफ या संस्थेच्या मार्गदर्शन व सहकार्याने अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी या गावरान बियाणांच्या प्रसार व प्रचाराचे कार्य केले.पुढे त्यांच्या या कार्याला एक दिशा मिळाली त्यांनी गावरान बियाणांची बँक सुरू केली. कळसूबाई परिसरातील पारंपारिक बियाणे गोळा केले आणि त्यांच्या या छंदाला एक नवी दिशा मिळाली. गावरान बियाणांचा मोठा संग्रह करून सीडबँक सुरू केली.त्यांच्या बँकेत सफेद वांगं, हिरवं वांगं,सफेद तूर, टोमॅटो, घेवडा, वाल, उडीद, हरभरा हुलगा, बाजरी, गहू, नागली, तीळ, भुईमूग, सूर्यफूल, जवस, भात, राळा, नाचणी, रायभात, वरंगल, अनेक प्रकारच्या रानभाज्या आदी अनेक प्रकारच्या पिकांची वाण आहेत. त्यांच्या घराभोवती असणाऱ्या अडीच तीन एकर परिसरात विविध प्रकारची चारशे –पाचशे झाडे आज उभी आहेत. त्यांचे घर म्हणजे एक प्रकारच संशोधनाचे केंद्र आहे. प्रत्येक बियाण्याची माहिती त्यांना तोंडपाठ आहे, ते बियाणे औषधी आहे का? त्याचा उपयोग काय, त्याची वैशिष्ट्ये त्यांना मुखोद्गत आहे. त्यांच्या कडील उपलब्ध असलेल्या सर्व पिकांच्या वाणांची खडानखडा माहिती त्यांना आहे. त्या म्हणतात देशी वाणांच धान्य हे केवळ पावसाच्या पाण्यावर येते या बियाण्याला कोणतेही रासायनिक खत व पाणी देण्याची आवश्यकता नाही. राहीबाईंच्या बियाणे बँकेतील बियाणे आज राज्याच्या विविध भागात पोहोचले आहेत.राहीबाई म्हणजे बियाण्यांचा चालता बोलता ज्ञानकोशच.





पारंपारीक गावरान वाणांची बियाणे बँक बायफ या सेवाभावी संस्थेच्या मदतीने सुरू केलेल्या या बँकेमार्फत आतापर्यंत हजारो गरजू शेतकऱ्यांना गावरान देशी वाणांचा पुरवठा केलेला आहे.त्यांच्याकडे सुमारे ५३ पिकांचे ११४ गावरान वाण शास्त्रशुद्ध पद्धतीने जतन करण्यात आलेले आहेत.गावरान बियाणे संवर्धन प्रचार व प्रसार यामध्ये केलेल्या भरीव कार्यासाठी यापूर्वी त्यांना कृषि विभागाने आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. त्यांना आतापर्यंत अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. या पुरस्काराने त्यांचे काम जगाच्या पटलावर अधिक ठळकपणे आले आहे यात शंका नाही.

**राहीबाईच्या बियाणे बँकसाठी साकारले चिरेबंदी घर**

अत्यंत दुर्मिळ, पारंपारिक गावरान वाणांच्या बियाण्यांचे जतन करणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागातील अकोले तालुक्यातील सीडमदर राहीबाई यांच्या मातीकुदडाच्या छपरातील जनुक कोष साठी हक्काचे ब्रिटिशकालीन विश्रामगृहासारखे पण मध्यभागी दगडी चौक आवार असलेले पारंपारिक वाड्यासारखे चिरेबंदी घर साकारले आहे. साबरमती आश्रमाच्या धर्तीवर दगडी चिऱ्याच्या चौमाळी,मंगलोरी, कौलारू पक्के घर अकोले तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.हे घर पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची गर्दी होत आहे. राही मावशी यांच्या बियाणे बँकेसाठी या भागात पडणारा पाऊस, वारा यांच्या अनुषंगाने पर्यावरणपूरक घराचा आराखडा तयार करून घर साकारण्यात आले आहे.४६ लाखाची ही वस्तू झपाट्याने आकारात आली आहे. बीड जिल्ह्यातून दगडी चिरे आणून बांधकाम केले गेले आहे..मध्यप्रदेशातील दगडी बांधकाम करणारे कारागिरांनी हे काम केल्याचे समजते.घरात शेणाने सावरलेल्या भुईची बियाणे बँक, अभ्यागत कक्ष,पुरस्कारासाठी स्वतंत्र दालन,बियाणे प्रदर्शनाची खोली,स्वयंपाकघर बैठक हॉल अशी रचना आहे.

सध्याच्या काळात शेतमालातील सदोषतेने माणसाला कर्करोगासारखे अनेक निरनिराळे आजार होत आहेत, यावर बरीच चर्चा सुरू आहे.या परिस्थितीतही एक गोष्ट मान्य करावी लागते ती म्हणजे आपल्या अन्नाची,म्हणजे अगदी फळे, भाज्या. अन्नधान्य यांची जी चव पूर्वी होती ती कुठेतरी गमावली आहे. याचे कारण संकरित बियाणे हे आहे.या बियाण्याचे काही फायदे आहेत ते नाकारून चालणार नाहीत पण आधीच्या बियाणांची साठवण जतनही तितकाच महत्त्वाचा आहे. जैविविधतेसाठी आदिवासी भागांमध्ये काही लोक असे बियाणे जतन करून ठेवतात. राहीबाई पोपरे यांचे या क्षेत्रातील काम अजोड असेच म्हणावे लागेल. राहीबाईंच्या या कामातून प्रेरणा घेऊन आपणही आपल्याकडे असलेल्या उपलब्ध साधनांचा शेतीला उपकारक ठरेल असा प्रयत्न करावयास हवा.

**डॉ. आदिनाथ ताकटे**
**मृद शास्त्रज्ञ**
**एकात्मिक शेती पद्धती**
**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**
**मो. ९४०४०३२३८९**

कर्जात वाढ होते, शेती पिकात नाही
आहे म्हणून पुरता कर्जात बाप माझा
**– लीलांश**

-----

आंधळ्या देवते..! पट्टी सोडून दे...!
न्याय आतातरी– या बळींच्या व्यथां ..!
**– एकांत**

-----

कष्टकरी शेतकऱ्याला नाही मिळाले जरी योग्य मोल
पोशिंदा तो सर्व जगाचा आहे अनमोल
**– सतीश मानकर**

-------

काय सांगू मी कहाणी जीवनाची;
तारले, सांभाळले मज वेदनांनी.
**– मिलिंद हिवराळे, अकोला**

------

कशास सोसतो गड्या, खुशाल टाक औत तू!
कळूच दे, तयांस तू, लहान की महान रे
**– विनय मिरासे 'अशांत'**

# पहिल्या भारतीय महिला डॉक्टर : रखमाबाई





सुनीता कोंमावार

कोर्टाच्या ह्या निर्णयामुळे समाजातील बुजुर्ग मंडळी खडबडून जागी झाली. समाजात टीकेची झोड उठली होती. 'नेटिव्ह ओपिनियन' या इंग्रजी दैनिकातून कोर्टाच्या या निर्णयावर भयंकर टीका करण्यात आली.

लोकमान्य टिळकांनी पण आपल्या 'केसरी' 'मराठा' या वर्तमानपत्रातून कोर्टाच्या निर्णयाविरुद्ध असंतोष प्रकट केला होता. टीका करणाऱ्यामध्ये टिळक अग्रणी होते. टिळकांचा रखमाबाई आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या संमती वयाच्या कायद्याला प्रखर विरोध होता

आपल्या अस्तित्वासाठी लढणाऱ्या आणि आयुष्यभर संघर्षाला सामोरं जाऊन बाणेदारपणे समाजकार्याचा वसा पुढे चालवणाऱ्या संघर्षकन्या रखमाबाई राऊत ह्या भारतातील पहिल्या प्रॅक्टिस करणाऱ्या महिला डॉक्टर होत्या. पण त्यांची इतिहासाने मात्र खूप उपेक्षा केली असे म्हणावे लागेल. कारण महाराष्ट्राच्या जडणघडणीत सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, इत्यादी महिलांची नावं प्रामुख्याने घेतली जातात. मात्र रखमाबाई हे नाव मात्र दुर्लक्षित राहिलं.

डॉ. आनंदीबाई जोशी या रखमाबाईच्या एक वर्ष आधी आधुनिक वैद्यक शास्त्राचे शिक्षण घेऊन भारतात परतल्या होत्या. परंतु भारतात आल्यावर लगेचच आजारपणात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा फायदा सोसायटीला दुर्दैवाने होऊ शकला नाही. डॉक्टर होऊनही समाजात उपचार करण्याची संधी त्यांना मिळाली नाही. त्यांच्या नंतर जवळपास त्याच काळात डॉक्टर म्हणून ऍनी जगन्नाथ या महिलेचा उल्लेख आढळतो. त्याही डॉक्टर होऊन भारतात १८९४ मध्ये परतल्या आणि त्यांच्यावरही काळाने वैद्यकीय सेवा सुरू करण्याआधीच झडप घातली. त्यामुळे वैद्यकीय सेवा देणाऱ्या पहिल्या भारतीय महिला डॉक्टर होण्याचा मान डॉ. रखमाबाई राऊत यांच्याकडे जातो.

त्यांचा जन्म २२ नोव्हेंबर १८६४ साली मुंबई (गोरेगाव) येथे झाला. रखमाबाई यांचे आजोबा हरिश्चंद्र यादवजी चौधरी म्हणजे त्यांच्या आईचे वडील. ते इंग्रज सरकारकडे नोकरीला होते. त्या इंग्रजांच्या अंमलात त्यांना 'रायबहादूर' आणि 'जस्टीस ऑफ पीस' म्हणून मोठ्या पदावर मानमरातब होता. ते उत्तम इंग्रजी शिकलेले आणि आधुनिक विचारसरणीचे गृहस्थ होते. त्यांना जयंतीबाई नावाची मुलगी होती. त्यांनी जयंतीबाईचा विवाह वयाच्या पंधराव्या वर्षी १८६३ मध्ये मुंबईतील गोरेगाव येथे राहणारे बांधकाम व्यावसायिक जनार्दन सावे ह्यांच्याशी केला. २२ नोव्हेंबर १८६४ साली जयंतीबाईला मुलगी झाली. ती मुलगी म्हणजे रखमाबाई. दुर्दैवाने जयंतीबाई सतरा वर्षाच्या असतांनाच त्यांच्या पतीचे म्हणजे जनार्दन सावे यांचे निधन झाले आणि रखमाबाईच्या डोक्यावरील पितृछत्र हरवले. पुढे जयंतीबाई रखमाबाईला घेऊन वडिलांकडेच राहण्यासाठी गेल्या आपल्या विधवा तरुण मुलीच्या व नातीच्या भविष्यकाळाची त्यांच्या वडिलांना खूप चिंता वाटू लागली आणि त्यांचा भविष्यकाळ सुखाने जावा म्हणून हरिश्चंद्र चौधरी यांनी आपल्या मुलीचा म्हणजे जयंतीबाईचा पुनर्विवाह डॉ. सखाराम अर्जुन राऊत यांच्याशी लावून दिला. त्या काळी समाजात विधवा विवाहाला विरोध तर होताच, त्यात बालविधवा विवाह की प्रौढ विधवा विवाह हा प्रश्न चांगलाच जोर धरून होता. तेव्हा समाजातील विरोध पत्करून केलेलं हे सापत्य विधवेसोबतचं लग्न हरिश्चंद्र चौधरी व डॉ. सखाराम राऊत या दोघांसाठीही खूप धाडसाचं पाऊल होतं. डॉ. सखाराम राऊत प्रगल्भ विचारसरणीचे होते. ते ग्रँट मेडिकल कॉलेज मुंबई येथे प्राध्यापक होते. त्यांनी छोट्या रखमाबाईचा स्वतः ची मुलगी म्हणून स्वीकार केला आणि रखमाबाई सावे ऐवजी त्या रखमाबाई राऊत झाल्या. रखमाबाईच्या जडणघडणीत त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा फार मोठा वाटा होता.

आजच्या पालघर जिल्ह्यातील सफाळेजवळील दातीवऱ्याच्या दादाजी भिकाजी ठाकूर यांच्याशी रीतिरिवाजाप्रमाणे वयाच्या नवव्या वर्षी रखमाबाईचं लग्न झालं. लग्न जरी लहानपणी झालं, तरी मुलीने वयात येइपर्यंत माहेरीच राहायचं अशी त्या काळी प्रथाच होती. वयाचे अठरा वर्षे होईपर्यंत त्या माहेरी शिक्षण घेत होत्या. त्यानंतर दादाजींनी रखमाबाईला सासरी म्हणजे घरी बोलावलं. मात्र शिक्षणामुळे त्यांच्या विचारांची उंची वाढली होती. माहेरी त्यांच्या घरात आधुनिकतेची कास असल्यामुळे त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या होत्या. दादाजी पूर्वी श्रीमंत होते. परंतु सध्या निरोद्योगी होते. कुठलाही उद्योग न करता ते मामाकडे राहात होते. त्यामुळे अशा निरोद्योगी माणसाची बायको म्हणून राहणे रखमाबाईला आवडले नव्हते. त्या घरी जाण्यास रखमाबाईने ठाम नकार दिला. त्या काळी नवऱ्याच्या घरी जायला नाही म्हणणं म्हणजे ही फार मोठी गोष्ट होती आणि विशेष म्हणजे रखमाबाईने सासरी जाऊन लहान वयात आई बनावं ही गोष्ट त्यांच्या आईवडीलांना रुचली नव्हती. म्हणून डॉ. सखाराम राऊतांनी दादाजींना कळवून टाकलं की 'प्रतिष्ठेने राहता येईल असे वातावरण तुमच्याकडे नसल्याने मी रखमाला तुमच्याकडे पाठवू शकत नाही. डॉ. सखाराम राऊत मुलीच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. त्यांची रखमाला खूप साथ होती. तिच्यावर त्यांचा खूप प्रभाव होता. मुलगी नांदायला येणार नाही म्हटल्यावर दादाजींनी १८८४ ला वकिलांमार्फत रखमाला कायदेशीर नोटीस पाठवली.

रखमाबाई यांचे पती दादाजी भिकाजी ह्यांच्या आईने हरिश्चंद्रजी कडून 'जयंतीबाईच्या मुलीचं लग्न माझ्या मुलाशी करून दे' असं वचन घेतलेलं होतं. त्या काळी अशी वचनं देण्याघेण्याची रीतच होती. त्याप्रमाणे रखमाबाईचा विवाह झाला होता. सासरी

पाठवायची वेळ येईपर्यंत या दोन घरांमधल्या सांस्कृतिक, वैचारिक, आर्थिक सगळ्याच दऱ्या खूप रुंदावल्या होत्या. दरम्यान दादाजींना व्यसनं जडली होती. त्यांना स्वतःचं घरही राहिलं नव्हतं. ते आर्थिक दृष्ट्या पूर्णपणे मामावर अवलंबून होते. त्यांना दम्याचा विकार जडला होता. मामाच्या घरचं वातावरणही घरच्या लक्ष्मीवर अत्याचार व घरात आणून ठेवलेल्या बाईच्या हाती सारी सत्ता असं होतं. हे सगळं लक्षात घेऊन रखमाबाईनी सासरी जाण्यास नकार दिला. खरं तर दादाजी अगदी सहज रखमाबाईला सोडून दुसऱ्या स्त्रीशी लग्न करू शकले असते. परंतु एका स्त्रीकडून आलेला नकार, तसेच जयंतीबाईने पुनर्विवाह केलेला असल्याने त्यांच्या पूर्वपतीची रखमाबाईच्या नावे असलेली इस्टेट,  ह्या कारणांमुळे त्यांनी बायकोला सासरी पाठवावे म्हणून कोर्टात दावा केला होता. त्या खटल्याची जबाबदारी तेव्हा न्यायाधीश पिन्हे यांच्याकडे सोपविण्यात आली होती. दोन्ही बाजू व्यवस्थित ऐकून घेतल्यावर न्यायमूर्ती पिन्हे यांनी 'लहानपणी लग्न झालेली मुलगी आता सज्ञान झाली आहे. आता तिच्यात चांगले, वाईट समजण्याची क्षमता विकसित झाली आहे आणि हे सर्व समजणाऱ्या स्त्रीला जबरदस्तीने नांदायला नवऱ्याकडे पाठवण्याची सक्ती करणे म्हणजे रानटीपणाच असेल' असे सांगून त्यांनी कोर्टाचा निर्णय रखमाबाईच्या बाजूने दिला.

कोर्टाच्या ह्या निर्णयामुळे समाजातील बुजुर्ग मंडळी खडबडून जागी झाली. समाजात टीकेची झोड उठली होती. 'नेटिव्ह ओपिनियन' या इंग्रजी दैनिकातून कोर्टाच्या या निर्णयावर भयंकर टीका करण्यात आली. लोकमान्य टिळकांनी पण आपल्या 'केसरी' 'मराठा' या वर्तमानपत्रातून कोर्टाच्या निर्णयाविरुद्ध असंतोष प्रकट केला होता. टीका करणाऱ्यामध्ये टिळक अग्रणी होते. टिळकांचा रखमाबाई आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या संमती वयाच्या कायद्याला प्रखर विरोध होता. ते आपल्या वर्तमानपत्रात एका ठिकाणी लिहितात. रखमाबाई, पंडिता रमाबाई, यांच्यासारख्या स्त्रियांना चोर, व्यभिचारी आणि खुनी अशा लोकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षा दिल्या पाहिजेत( दै. मराठा १२ जून १८८७)

बालविवाह प्रतिबंधक कायद्याला टिळकांचा प्रखर विरोध होता पण त्याच वेळी स्वातंत्र्यापूर्वी सामाजिक सुधारणा हवी असं म्हणणारी दुसरी समाजसुधारकांची फळी होती. दोन्ही चळवळीत मोठमोठी माणसं जोमाने काम करीत होती पण इतिहासात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्यचळवळीत लढणाऱ्यांचाच प्रामुख्याने उल्लेख झाला आणि समाज सुधारकांकडे मात्र दुर्लक्ष झाले. जसं की रखमाबाईच्या कार्याकडे झालं.

सव्वाशे वर्षांपूर्वी एक स्त्रीने आपल्या ज्ञानाच्या तुलनेत खूपच सामान्य असणाऱ्या नवऱ्याला नाकारणे ही त्या काळाच्या परिप्रेक्षात खूपच क्रांतिकारक घटना होती पण समाजातून मात्र विलक्षण टीका होत होत्या. ह्या समाजातून होणाऱ्या टिका तसेच कोर्टकचेरीमुळे होणारी धावपळ आणि मानसिक ताण यामुळे वयाच्या ४५ व्या वर्षी म्हणजे १८ एप्रिल १८८५ रोजी रखमाबाईच्या वडिलांचे म्हणजे सखाराम राऊत यांचे निधन झाले आणि रखमाबाई एकाकी पडल्या.

याच खटल्यानंतर बहुचर्चित एज ऑफ कनसेन्ट ॲक्ट १८९१ हा कायदा पास झाला. या कायद्यामुळे मुलींच्या सेक्स करण्याचं पर्यायाने लग्नाचं वय दहा वरून बारा करण्यात आलं. या कायद्याचं उल्लंघन झालं तर बलात्कारासारख्या शिक्षेची तरतूद कायद्याने करण्यात आली होती.

कोर्टाच्या या निर्णयाविरुद्ध दादाजींनी पुढे हायकोर्टात अपील केले पण रखमाबाई डगमगल्या नाहीत. तेव्हा रखमाबाई कदाचित भारतातल्या पहिल्या महिला होत्या की ज्यांनी आपल्या नवऱ्याकडे कायदेशीर घटस्फोट मागितला होता. कोर्टात आपली बाजू मांडतांना रखमाबाईनी मला हे लग्न मान्य नाही. कारण हे लग्न झालं तेंव्हा मी अतिशय लहान होते आणि या लग्नाला माझी संमती नव्हती. माझ्या संमतीशिवाय झालेल्या लग्नाने मी नांदणार नाही. असा स्पष्ट युक्तिवाद त्यांनी आधीच कोर्टासमोर मांडला होता. हायकोर्टात मुख्य न्यायाधीश म्हणून 'फेरेन' कर्तव्यावर होते. त्यांनी 'निकालाच्या दिवसांपासून एका महिन्याच्या आत रखमाबाईनी नवऱ्याच्या घरी राहण्यास जावे,' असा निर्णय दिला. तेवीस वर्षाच्या असणाऱ्या रखमाबाई आता समाजातून होणाऱ्या टीकेला सरसावल्या होत्या पण हा वाद मात्र समाजात फारच चिघळत होता. देशातील विविध वर्तमानपत्रातून ह्या विषयासंबंधी बातम्या येऊ लागल्या. न्या. रानडे, गोपाळराव आगरकर, रावसाहेब मांडलिक, डॉ. भांडारकर, पंडिता रमाबाई अशी विद्वान मंडळी रखमाबाईच्या पाठीशी उभी राहिली. विदेशातील 'लंडन टाईम्स' 'सेंट जेम्स गॅझेट' अशा अनेक वर्तमानपत्रातून हा विषय गाजू लागला. इंग्लंडमध्ये सुद्धा हा चर्चेचा विषय बनला. तेथील विचारवंत महिलांनी रखमाबाईला सहकार्य करण्याचे पत्राद्वारे आश्वासन दिले. 'लंडन टाईम्स' चे 'बिशप ऑफ चाल्टरी' यांनी पुढाकार घेऊन इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया व व्हॉईसरॉय यांच्या कानावर ही बातमी घातली. परिणामी हा खटला पुन्हा नव्याने चालवण्याचे ठरले. या खटल्याच्या खर्चासाठी प्रिन्सिपल वर्डस्वर्थ यांनी रखमाबाई ए हिंदू लेडी डिफेन्स कमिटी या संस्थेची स्थापना केली आणि हे सर्व उठलेलं वादळ पाहून रखमाबाईचे पती दादाजी व मामा नारायण धर्माजी यांनी प्रकरणावर पडदा टाकण्याचं ठरवलं. शेवटी रखमाबाईशी चर्चा करून असा निर्णय घेण्यात आला की लग्नाचा व कोर्टाचा खर्च म्हणून रु. २०००/– दादाजींना देऊन कायदेशीर घटस्फोट घ्यावा. त्याप्रमाणे ५ जुलै १८८८ ला हा वाद मिटवण्यात आला आणि रखमाबाईच्या आयुष्यातलं एक संघर्षमयी वादळ शमलं. याच खटल्यानंतर बहुचर्चित एज ऑफ कनसेन्ट ॲक्ट १८९१ हा कायदा पास झाला. या कायद्यामुळे मुलींच्या सेक्स करण्याचं पर्यायाने लग्नाचं वय दहा वरून बारा करण्यात आलं. या कायद्याचं उल्लंघन झालं तर बलात्कारासारख्या शिक्षेची तरतूद कायद्याने करण्यात आली होती.

झालेल्या या प्रकाराकडे दुर्लक्ष करून रखमाबाईने आपले लक्ष पुढील शिक्षणाकडे केंद्रित केले. त्यांची ही संघर्ष गाथा इंग्लंड मधील अनेक स्त्रियांना परिचित झाली होती. तसेच एलिस (बर्ट्रेंड रसेल यांची प्रथम पत्नी), हे निएत्तार मुल्लर, इव्हा मॅक्लेरन,

पंडिता रमाबाई, अशी बरीच मंडळी त्यांच्या व्यक्तिसंग्रहात होती. त्यांचे वडील डॉ.सखाराम व आजोबा हरिश्चंद्र यादवजी यांचे समाजातील प्रतिष्ठितात तसेच इंग्रज लोकात बसणे उठणे होते. त्यामुळे रखमाबाईला बऱ्याच विचारवंत व अभ्यासू लोकांचे मार्गदर्शन लाभले. नव्या हिंदुस्थानच्या तरुण पिढीचा प्रतिनिधी म्हणून युरोपियन समाज त्यांच्याकडे कौतुकाने आणि आदराने पाहत असे. त्यांचे वडील पेशाने डॉक्टर होते. त्यामुळे कदाचित रखमाबाईचा वैद्यकीय शिक्षणाकडे ओढा होता. पण ते शिक्षण घेणेही त्यांच्यासाठी सरळ सरळ नव्हते. तिथंही त्यांना लढा द्यावा लागला.

'लंडन स्कूल ऑफ मेडिसिन' येथे त्या काळी महिलांना 'एम.डी.' करण्याची परवानगी नव्हती. रखमाबाईना यासाठी पण आवाज उठवावा लागला. परदेशात सुद्धा स्त्रियांचे वैद्यकीय शिक्षण तितके सोपे नव्हते. असे असताना त्यांनी १८९० मध्ये 'लंडन स्कूल ऑफ मेडिसिन फॉर वूमन' ह्या कॉलेजात प्रवेश मिळवला. तसेच १८९१ व १८९२ मध्ये वैद्यकशास्त्राची पहिली व दुसरी परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी रॉयल हॉस्पिटल मध्ये प्रॅक्टिकल ट्रेनिंग साठी प्रवेश घेतला. तेथे त्यांनी शवविच्छेदन आणि अनेस्थेशीया ह्या विषयाचा अभ्यास केला. त्यानंतर डब्लिन येथील 'रोटांडो' हॉस्पिटलमध्ये मिडविफ्रि व स्त्रीरोगतज्ज्ञ हा शिक्षणक्रम पूर्ण केला. तसेच नॅशनल डेंटल हॉस्पिटलमधून दंतचिकीत्सेचं शिक्षण घेतले. लंडन कॉलेज ऑफ मेडिसिन येथील अभ्यासक्रमात त्या विशेष प्रावीण्याने पास झाल्या होत्या. अशा विविध विषयांचा अभ्यास केल्यानंतर १८९४ मध्ये त्यांनी शेवटची वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण केली. परंतु लंडन विद्यापीठाला मुलींना वैद्यकीय पदवी देण्याचा अधिकार नव्हता. पण रखमाबाई खचल्या नाहीत. त्यांनी पुढील शिक्षणासाठी On joint board of the college of physicians Surgeons of Edinburgh Glasgow या स्कॉटलांडच्या संस्थेत प्रवेश घेतला. त्यांचं नाव इंग्लंडच्या मेडिकल रजिस्टरमध्ये सनदशीर दाखल झालं आणि डॉ. रखमाबाई सखाराम राऊत ह्या नावाने १८९४ मध्ये त्या भारतात परतल्या.

भारतात आल्यानंतर मुंबई, सुरत, राजकोट अशा वेगवेगळ्या शहरात डॉक्टर म्हणून १८९५ ते १९३० पर्यंत काम केले. इंग्लंडहून आल्यावर लगेच त्या मुंबईच्या कामा रुग्णालयात 'हाउस सर्जन' म्हणून रुजू झाल्या. खरं तर त्यांचा आतापर्यंतचा प्रवास फार संघर्षमय होता. त्यांनी त्यांचे झालेले लग्न नाकारून डॉक्टर होण्याचा पर्याय समाजाला मंजूर नव्हता. परिणामी जेव्हा त्या इंग्लंड मधून भारतात आल्या तेंव्हा समाजात त्यांचा स्वीकार होण्याची शक्यता धूसर होती. कामा रुग्णालयात सहा महिने काम केल्या नंतर त्यांची गुजरात मधील सुरतच्या 'मोरारदास व्रजभूषणदास माळवी' ह्या रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली. त्या काळात महिलांना कितीही समजावून सांगितले तरीही त्या प्रसूतीसाठी रुग्णालयात येत नसत आणि त्यात रुग्णालयाची ती इमारत झपाटलेली आहे अशी त्या भागात सर्वत्र अफवा पसरल्यामुळे तिथे कोणतीही स्त्री प्रसूतीसाठी येत नव्हती. त्यामुळे तेथील स्त्रियांचे समुपदेशन करणं खूप गरजेचं होतं. ते त्यांनी केलं. तसेच स्त्रियांसाठी वेळोवेळी आरोग्यविषयक व्याख्याने आयोजित केली. महिलांना रुग्णालयाकडे वळवण्यासाठी शेळीचे सुखरूप बाळंतपण त्यांनी त्याच इमारतीत करून दाखवले आणि वास्तुदोष, शकून, अपशकुन, अशा समजुतीचा जो समाजावर पगडा होता त्यावर पडदा टाकण्याचे काम रखमाबाईने खूप सामर्थ्याने केले.

सुरत येथे माळवी रुग्णालयात नोकरी करताना त्यांची कसोटी पाहणारे दोन मोठे प्रसंग सुरवातीलाच आले. ते म्हणजे १८९६ ला आलेली प्लेगची साथ आणि १८९७ चा दुष्काळ, त्यामुळे आत्यंतिक गरिबी, औषधांपासून ते जाणिवांपर्यंत समाजात अनेक गोष्टींचा अभाव निर्माण झाला होता. त्यावेळी एक स्त्री असूनही त्या बिकट परिस्थितीत त्यांनी रुग्णांची अहोरात्र सेवा केली. तेव्हा त्या साधारणपणे बत्तीस, तेहतीस वर्षाच्या असतील. त्यांना त्यांच्या या कामगिरीबद्दल ब्रिटिश सरकारने कैसर-ए-हिंद हा मनाचा 'किताब दिला होता. १९१८ मध्ये आलेल्या फ्लूच्या साथीतही त्यांनी आपल्या कामाचे कसब दाखवले होते.

त्यांच्या प्रयत्नामुळे स्त्रियांचा बाळंतपणासाठी रुग्णालयात ओढा वाढला होता. तेव्हा बाळंतपणासाठी आलेल्या बाईला चाळीस दिवस रुग्णालयातच ठेवून घेतले जात. त्यातील अनेक बाळंतिणीसोबत त्यांची आधीची लहान मुले पण असत. त्या लहान मुलांसाठी रखमाबाईनी माळवी रूग्णालयाच्या आवारातच बालक मंदिर सुरू केले. मुलांचे संगोपन, शिक्षण, यासाठी काही साधनेही पुरवली. प्रसंगी स्वतःचा वेळही दिला. सतत कार्यरत राहणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांना कामामुळे स्वतःकडे लक्ष देणे शक्य नव्हते. तरीही नीटनेटकी राहणी ही त्यांची आवड होती. त्यांचा पेहराव त्यांच्या कामाला साजेसा होता. पोषाखाची कामात अडचण येऊ नये, यासाठी त्यांनी काही खास कप्त्या शोधून काढल्या होत्या. निऱ्या घालून साडी नेसताना लागणारा वेळ वाचवण्यासाठी, साडीच्या निऱ्या त्या पेटिकोटलाच शिवून घेत असत. तसेच रुग्णालयात किंवा इतरत्र कामं करताना, साडी वाऱ्यावर उडू नये म्हणून साडीच्या खालच्या काठाला शिशाच्या गोळ्यांची पट्टी त्या लावत असत. जसे की आत्ता च्या काळात स्त्रिया साडीला फॉल लावतात. त्यांचे प्रत्येक काम व्यवस्थित आणि टापटीप असे. १९ व्या शतकातील एक असामान्य व्यक्तिमत्त्व अशी त्यांची ओळख बनली होती.

ज्या काळात स्त्रियांना दुय्यम स्थान होतं अशा काळात रखमाबाईनी परिस्थितीवर मात करून यशाचं शिखर गाठलं होतं. त्यांनी रुग्णांची सेवा तर केलीच पण महिलांच्या अधिकारासाठी संघर्षही केला होता. बालविवाह प्रथा बंद होण्यासाठी त्यांनी दिलेलं योगदान भारतीय इतिहासात मैलाचा दगड ठरलेलं आहे. सुरत येथे असताना रमाबाई रानडे यांनी अध्यक्षपद भूषवलेल्या १९०७ च्या सुरत येथे भरलेल्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या स्वागतसमितीच्या चिटणीस पदी त्यांनी काम केले होते. सुरत येथून निवृत्त झाल्यानंतर त्यांना राजकोटच्या रसूलकालजी जनाना रुग्णालयात सौराष्ट्र आणि कच्छ प्रांताच्या प्रमुख डॉक्टर म्हणून

निमंत्रण आले होते. त्यावेळी पहिले महायुद्ध सुरू होते. त्या बिकट परिस्थितीतही त्यांनी त्यांची धुरा समर्थपणे सांभाळली. त्यांचे उत्कृष्ट योगदान पाहून रेडक्रॉस ह्या नामांकित सोसायटीने त्यांचा गौरव केला होता. पुढे त्यांनी राजकोट येथे रेडक्रॉस सोसायटीची शाखा उघडली होती. लोकांना आरोग्यविषयक माहिती देण्यासाठी प्रथमोपचाराचे शास्त्रीय ज्ञान देणारा अभ्यासक्रम तेव्हा सुरू केला होता, त्याचे राजकोट येथील केंद्र रखमाबाईच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले होते. त्यांनी त्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थिनी मिळवणे, त्यांना शिकवणे, शिकते ठेवणे या अवघड जबाबदाऱ्या सहज पेलल्या. एकीकडे दिवसाचे अठरा-अठरा तास काम करून पुन्हा दर शनिवारी आयरिश मिशनच्या रुग्णालयात मोफत सेवा द्यायला त्या जात असत. तसेच मुलींना स्वावलंबी करण्यासाठी त्या शिक्षणात मदत करीत असत. नर्सिंगच्या शिक्षणासाठी मुलींना त्या प्रेरित करीत.

आरोग्य आणि शिक्षण प्रसार या कामात संस्थानिक, व्यापारी, ब्रिटिश राज्यकर्ते आणि सैन्य अशा सर्वांची मदत घेऊन त्यांनी हे काम खूप दर्जेदारपणे हाताळले. निवृत्तीनंतरच्या आयुष्यात त्या अस्पृश्यता निवारण यासाठीच्या लेखनात, भाषणात सक्रिय राहिल्या. त्यांनी मुलांमध्ये जातीविरोधी भावना जागृत व्हावी म्हणून महापालिकेच्या शाळांशाळांमधून व्याख्याने दिली. तसेच खास स्त्रियांसाठी विज्ञान स्त्रीशिक्षिकेंच्या व्याख्यानमाला त्यांनी चालवल्या.  त्या व्याख्यानमालेला किती स्त्रिया हजर होत्या, व्याख्यान किती स्त्रियांपर्यंत पोहोचलं याची त्या स्वतः नोंद ठेवत असत. त्यांनी स्वतःवर कधीही अन्याय होऊ दिला नाही. तसेच इतरांवर ही अन्याय होऊ नये, याची त्या फार काळजी घेत असत. त्यांच्या एका शिष्येनं, रखमाबाईनी तिच्या भावाच्या सुनेला दिलेला सल्ला लिहून ठेवला आहे. बायकोचं पोट हे नवऱ्याच्या पोटात हे तत्त्वतः मान्य कर, परंतु पाचपंचवीस माणसांच्या घरात सर्वात शेवटी जेवायला बसणाऱ्या बायकांचे जेवण आधी वेगळे काढून ठेवत जा ..!! वरवर साध्या वाटणाऱ्या वाक्याचं काय मोल होतं हे त्या परिस्थितीतून गेलेल्या स्त्रीलाच कळेल.

रखमाबाईचा मूर्तिपूजेवर विश्वास नव्हता. पण निवृत्तीनंतरच्या उत्तरायुष्यात त्यांनी दासबोध, तुकारामाच्या अभंगाचं मनन व संस्कृत श्लोकाचा अभ्यास चालू केला होता. तसेच समाजाकडून अव्हेरलेल्या विधवा व त्यांच्या मुलांचं त्या आश्रयस्थान बनल्या. इतकंच नव्हे तर आसपासच्या स्त्रियांना लिहिता, वाचता यावं म्हणून त्या त्यांचे खास वर्गही घेऊ लागल्या. त्या काळी स्त्रियांनी घराबाहेर पडून काही नवीन करावं, शिकावं म्हटलं तर सर्वसाधारणपणे घरातून विरोध होत असे पण तोच विरोध जर त्या स्त्रिया धार्मिक कार्यासाठी बाहेर पडत असतील तर तितकासा तीव्र होत नसे आणि नेमकी हीच बाब लक्षात घेऊन रखमाबाईंनी स्त्रियांना धार्मिक पुस्तकं वाचण्याच्या नावाखाली प्रथमतः एकत्र केले. लिहायला, वाचायला शिकवणे, तसेच कलाकौशल्याच्या गोष्टी शिकवणे, अशास्त्रीय समजाचे निराकरण करणे, स्वच्छतेचे, प्रथमोपचाराचे महत्त्व पटवून देणे, तसेच स्त्रियांना बचतीचे महत्त्व सांगून त्यांना बँकेत खाते काढायला लावणे अशी अनेक समाजोपयोगी कामे त्यांनी जन्मभर केली. स्त्रियांमधील अंधश्रद्धा निर्मूलनाच काम त्यांनी हाती घेतलं होतं. विधवा स्त्रियांसाठी त्यांनी 'वनिता' या नावाने आश्रमांची स्थापना केली. १९३२ मध्ये स्वतःच्या आजोबाच्या मालकीचं गावदेवी मंदिर अस्पृश्यांसाठी खुलं केलं. तसेच कामाठीपुऱ्यात राहून शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांच्या वस्तीवर जाऊन आरोग्यविषयक व्याख्याने त्यांनी दिली. असमर्थांना समर्थ करण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला. परंतु जे दुर्लक्षित आहेत, जे समाजासमोर कधीच आले नाहीत त्यांच्या प्रश्नांचे काय..?? ही भावना त्यांना कायम छळत होती. त्यावेळी त्यांनी प्रत्येक जातीचे हक्क काय आहेत. यांच्या याद्या लिहून काढल्या होत्या. वय अगदी ऐंशीच्या आसपास असताना देखील एकाकी मुलीला आसरा देणं, तिला लिहायला, वाचायला शिकवणं, वेगवेगळ्या परीक्षा द्यायला लावून स्वतःच्या पायावर उभं राहण्याची ताकत तिच्यात निर्माण करून तिचा आत्मविश्वास त्या वाढवत असत. त्या स्वतः पण एकट्याच होत्या. त्यांनी पुन्हा लग्न केलं नाही. आयुष्यभर समाजासाठी झिजत राहिल्या. अभिनेता आणि दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी रखमाबाईच्या जीवनावर आधारित चित्रपट बनवला आहे. ते म्हणतात मुळात आपल्याकडे पुरुषांनाच हीरो बनवण्याची पद्धत आहे. त्यांचाच उदोउदो करून, त्यांनाच केंद्रस्थानी ठेवून पटकथा रचल्या जातात. त्यामुळे साहजिकच स्त्रियांची कामं मागे पडतात. त्यांना इतिहासात अनुल्लेखानं मारलं जातं. म्हणून मी त्यांच्या कामाची दखल घेऊन रखमाबाईच्या जीवनावर चित्रपट काढणार आहे. त्याचप्रमाणे मोहिनी वर्दे यांनी लिहिलेले 'रखमाबाई: एक आर्त' हे पुस्तक पण त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष दाखवते. डोळ्यांनी दिसणं अगदीच कमी झालं तेंव्हा पण आजूबाजूच्या मुलांना एकत्र करून त्या 'बालसभा' घेत असत. मुलांच्या अंगी सभाधीटपणा यावा म्हणून त्या मुलांना गाणी-गोष्टी म्हणायला लावत. दुर्दैवाने रखमाबाईनी त्यांचा पत्रव्यवहार जपून ठेवला नाही. उलट तो वेळोवेळी जाळून टाकला. त्यांच्या टिपणातल्या काही वह्या सापडल्या होत्या. त्यांवरून त्यांच्या कार्याची पावती मिळते. नव्या जाणिवा, नवी क्षितिजं, नवी कार्यक्षेत्र जी त्या काळी अगदी थोड्या लोकांनी आपलीशी केली होती. त्यांची यादी रखमाबाईंच्या नावाशिवाय पूर्ण होऊच शकणार नाही. फक्त स्वतःसाठी न जगता आणि सुधारणेच्या प्रश्नाचं नुसतंच प्रदर्शन न करता, त्या सुधारणा प्रत्यक्ष जीवनात उतरवून त्या खरोखरच एक ध्येयनिष्ठ जीवन जगल्या. वैद्यकीय व सामाजिक कार्यासाठी योगदान देणाऱ्या, आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत धडपडणाऱ्या रखमाबाईनी २५ डिसेंबर १९५५ रोजी वयाच्या ९२व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. ऊर्जेची अखंड ज्योत शांत झाली. विचाराचं घोंगावणारं वादळ रूढार्थाने शमलं. पण त्यांनी दिलेला लढा सर्वकालीन महिलांसाठी आजही आदर्श आहे.

**सौ. सुनीता दिक्कतवार कोंमावार**
**परळी वै. - ४३१ ५१५**
**जि. बीड. मो.नं. ९४०५४६४३१४**

# युगात्मा शरद जोशी स्मारक

युगात्मा जोशींचे स्मारक म्हणजे त्यांच्या अपूर्ण स्वप्नांची पूर्तता करणारे आदर्श मॉडेल असेल. या उपक्रमाचे ३ विभागात वर्गीकरण असेल.

१) **स्मृतींचे जतन –** युगात्मा शरद जोशींच्या स्मृतींची जपणूक, स्मृती समारंभ, प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन, चिंतन–मनन सुविधा व विचारप्रसारासाठी युगात्मा स्मारक

२) **साहित्य प्रसार –** युगात्मा शरद जोशींच्या साहित्याच्या प्रसारासाठी युगात्मा ग्लोबल ग्रंथालय. ग्लोबल ग्रंथालयाची व्याप्ती मोठी असेल जेथे शेतीविषयातील सर्व साहित्याचा संग्रह असेल. सोबतच Online ग्लोबल डिजिटल ग्रंथालय ही कल्पना सुद्धा आपल्याला साकार करायची आहे. शेती विषयातील सर्व ग्रंथ, प्रबंध, शोधप्रबंध, पुस्तके, विशेषांक, कादंबरी, काव्यसंग्रह यासहित सर्व शेती साहित्य एकत्रितपणे वाचकांना व अभ्यासकांना उपलब्ध करून देणे हा यामागील प्रमुख उद्देश असणार आहे.

३) **युगात्मा शरद जोशी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी –** सीता शेती, माजघर शेती, व्यापार शेती व निर्यात शेतीची शरद जोशींची संकल्पना साकार करण्यासाठी

**पहिले वर्ष – पहिला टप्पा :**

पहिल्या टप्प्यात पहिल्यावर्षी आपल्याला युगात्मा शरद जोशी फार्मर्स प्रोड्युसर कंपनीवर लक्ष केंद्रित करायचे आहे. ''सीता शेती, माजघर शेती, व्यापार शेती, निर्यात शेती..... म्हणजेच युगात्मा शरद जोशींच्या स्वप्नातील भारत''

बदलत्या काळाच्या प्रवाहाचा वेध घेत १९९२ मध्ये द्रष्टे शेतकरी नेते शरद जोशी यांनी शेतकरी उत्पादक कंपनीची संकल्पना मांडून शेतकऱ्यांनी यापुढे सीता शेती, माजघर शेती, व्यापार शेती आणि निर्यात शेती अशी चतुरस्त्र शेती करावी, असे आवाहन केले होते. सोबतच काही प्रात्यक्षिके म्हणून त्या दिशेने पाऊलही टाकले होते पण त्यावेळेस शासकीय धोरणे शेती प्रक्रिया व्यवसायाला पूर्णतः प्रतिकूल असल्याने ही दार्शनिक प्रात्यक्षिके आदर्श मॉडेलमध्ये रूपांतरित होऊ शकली नव्हती. त्यासोबतच रस्त्यावरची लढाई निकराने लढण्यातच पुरेशी दमछाक झाल्याने संघटनेच्या पाईकांना आर्थिक लढाई लढायला उसंतच मिळाली नाही.

१९९२ मध्ये शरद जोशींच्या गुरुकिल्लीकडे कानाडोळा करणाऱ्या शासनाने कालांतराने मात्र हीच संकल्पना शरद जोशींचे नाव न घेता आडपडद्याने स्वीकारली. शेतमाल प्रक्रियेला प्रतिकूल असलेली पूर्वीची धोरणे हळूहळू अनुकूल व्हायला लागली. शेतकरी उत्पादक कंपन्यांना मदत करण्यासाठी स्वतंत्र विभागांची निर्मिती झाली आणि आता तर शेतकरी उत्पादक कंपन्यांना भरघोस अनुदान देणाऱ्या विविध योजना अस्तित्वात आल्या आहेत. जागतिक बँकेच्या सहकार्याने अर्थपुरवठा केला जात आहे. शेतकऱ्यांनी एकजूट करून शेतमाल मूल्यसाखळी विकसित करण्याची, प्रक्रिया उद्योग उभारण्याची, शेतमाल प्रक्रिया उद्योगाचा पाया रचण्याची हीच योग्य वेळ आहे.

**युगात्मा शरद जोशी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी Companies Act, 2013 नुसार रजिस्टर झाली असून ३१ जानेवारी २०२२ रोजी नोंदणी, पॅन व टॅन प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.**

**सभासद व्हा, भागधारक व्हा**

१. १८ वर्षावरील कुणीही भारतीय व्यक्ती कंपनीचा भागधारक होऊ शकेल.

२. महिलांना प्राधान्य

आपण सभासद (शेअरहोल्डर) होऊ इच्छित असाल तर आपणास खालील बाबींची पूर्तता करावी लागेल.

१) आपला सभासद अर्ज सादर करावा लागेल. अर्जासोबत आधार, पॅन, फोटो व सातबारा, ८ अ. जोडावा लागेल. कुटुंब प्रमुखाच्या नावाने असलेला ७/१२ चालेल. स्वतःच्या नावानेच असला पाहिजे हे बंधन नाही.

२) शेतकरी नसल्यास भूमिहीन असा उल्लेख अर्जात करून बिगर शेतकऱ्यांनाही सभासदत्व (शेअरहोल्डर) मिळवता येईल.

३) शेअरची रक्कम कंपनीच्या खात्यावर जमा करावी लागेल.

४) १८ वर्षावरील व्यक्ती सभासद होऊ शकतो.

५) एका कुटुंबातील कितीही सदस्य सभासद होऊ शकतात.

**सभासदत्व मिळवण्यासाठी करावयाचा अर्ज :**

१) www.sharadjoshi.in/node/226 या लिंकवरून अर्ज डाउनलोड करावा. पूर्ण फॉर्म व्यवस्थित भरून कंपनीच्या पत्यावर पोस्टाने पाठवावा. (कुरिअरने पाठवू नये.) तसेच व्यवस्थित स्कॅनिंग करून एक प्रत yugatmagmail.com वर किंवा व्हाटसपवर पाठवावी.

२) 'युगात्मा शरद जोशी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी या नावे चेक लिहून अर्जासोबत जोडावा किंवा ऑनलाईन रक्कम भरण्यासाठी बँक डिटेल्सकरीता संपर्क करावा किंवा शुल्काची रक्कम प्रत्यक्ष बँकेत जाऊन रोखीने किंवा NEFT/RTGS च्या माध्यमातून भरावी व पैसे भरल्याची पावती अर्जासोबत जोडावी.

३) अधिक माहिती ्रींसिरीर.ाहिरीरवर्क्षीहळ.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**शेअर मूल्य :**

**पुरुषांसाठी शेअर मूल्य :** प्रती शेअर एकूण रक्कम रु. १६००/– किंवा त्यापटीत शुल्क भरून कंपनीचे सभासद–भागधारक होता


येईल.

**महिलांसाठी शेअर मूल्य :** प्रती शेअर एकूण रक्कम रु. १४००/- किंवा त्यापटीत शुल्क भरून महिलांना कंपनीचे सभासद-भागधारक होता येईल.

**: संचालक मंडळ :**



**सरोज काशीकर**



**वामनराव चटप**




**गंगाधर मुटे**




**शैलजा देशपांडे**




**वंदनाताई चटप**



**रमेश खांदेभराड**




**दिलीप भोयर**



**जयंत बापट**



**गणेश पाटील**



**सुभाष बोकडे**



**रविंद्र खोडे**



**उषा दरणे**



**मनोरमा मुटे**

**आमचे मार्गदर्शक**

सौ. सरोजताई रवीभाऊ काशीकर आमचे मार्गदर्शक रामनगर मगनवाडीजवळ वर्धा

ॲड. श्री वामनराव चटप आमचे मार्गदर्शक देशपांडे वाडी, राजुरा ता- वरोरा जि. चंद्रपूर

**संस्थापक संचालक मंडळ**

श्री. गंगाधर महादेवराव मुटे, आर्वी छोटी, ता. हिंगणघाट जि. वर्धा

सौ. शैलजाताई लक्ष्मीकांतजी देशपांडे, जाजुवाडी, आर्वी ता. आर्वी जि. वर्धा

सौ. वंदनाताई वामनराव चटप, देशपांडे वाडी, राजुरा ता. वरोरा जि. चंद्रपूर

श्री. रमेशराव जिजाभाऊ खांडेभराड, शिवनगर, जालना ता. जि. जालना

श्री. दिलीपराव लक्ष्मणराव भोयर, धनोडी, ता. वरुड जि. अमरावती

श्री. जयंतराव रामचंद्र बापट, पहूर इझारा ता. कळंब जि. यवतमाळ

श्री. गणेशराव दिनकरराव पाटील, किनगाव ता. यावल जि. जळगाव

श्री. सुभाषराव धनुजी बोकडे, कुरझाडी जामठा ता. जि. वर्धा

श्री. रविंद्रजी जगन्नाथजी खोडे, सेलडोह ता. सेलू जि. वर्धा

सौ. उषाताई सारंगजी दरणे, टाकळी दरणे, ता. देवळी जि. वर्धा

सौ. मनोरमाताई गणेशराव मुटे, आर्वी छोटी ता. हिंगणघाट जिल्हा- वर्धा



Sahyadri farms
Seeding goodness
उच्च गुणवत्तेचा भाजीपाला व फळे
उच्च दर्जाच्या उत्पादनांची विशेष श्रेणी
सशक्त व निरोगी रोपांची अत्याधुनिक नर्सरी
दर्जेदार खते, कीडनाशके व यंत्रसामग्री
शेतकऱ्यांनी, शेतकऱ्यासाठी चालवलेली शेतकरी उत्पादक कंपनी
सह्याद्री फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लि.
मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक, महाराष्ट्र
फळे भाजीपाला व प्रक्रिया उत्पादने - 7030943504
कंपनी ला भेट देण्यासाठी संपर्क करा: 7030947036
खते, कीटकनाशक आणि यंत्रसामग्री - 7066037329
अत्याधुनिक नर्सरी - 9022030964
Toll Free No. 1800 212 00 2020
www.sahyadrifarms.com
/SahyadriFarms

## डोळ्यातील द्राक्ष पाहू दे

**मृदगंधा**

**गंगाधर मुटे**



चांदसा मुखडा, झिलसी आँखे
जुल्फोका बादल ऱ्हाऊ दे
तुझ्या डोळ्यातलं वादळ पाहू दे

वेलीवर बसली, पानांत घुसली
लुकलुक चवळी शेंग
उन्हात खुलली, हवेत झुलली
डोळ्यात झिलमिल पेंग
चाकवत, मेथी, गाजर, बटाटा
करडीचा काटा ऱ्हाऊ दे
तुझ्या डोळ्यातला पाटा पाहू दे

पाटाचं पाणी, मुळ्याची न्हाणी
थरथरथरते ओठ
धुक्यात भिजले, दवात थिजले
अलगद फिरले बोट
चंदन, चांदणं, नयनकटाक्ष
चंद्राची साक्ष ऱ्हाऊ दे
तुझ्या डोळ्यातील द्राक्ष पाहू दे

शिराण छाया, हृदयी समाया
लवलवथवती वक्ष
मध्यगुरुत्व, अल्लड स्वत्व
अभय रेखीती अक्ष
नवथर हरिणी, अवखळ अरुणी
अचपळ तरुणी ऱ्हाऊ दे
तुझ्या डोळ्यातली यरुनी पाहू दे

**– गंगाधर मुटे 'अभय'**

## बांधावरल्या अस्वस्थ नोंदी

**मृदगंधा**

**सचिन शिंदे**



बांधावर उभं राहून
शेतावर नजर टाकली
अन् तरळून गेलं नजरेसमोर
काय काय...
पुरानं वाहून वाकून
मोडलेलं ते बाभूळझाड ..
वाळून गेलेला
विहिरीवरचा तो कोरडा पळस ..
उभ्या बांधावर उदासपणे
उभा असलेला तो म्हातारा साग ..
नदीपात्राजवळची ती
पळसाची गर्द झाडी ..
पक्ष्यांच्या आवाजानं
भांबावून गेलेलं ते बोरबन ..
मोडक्या जाळ्यांचा आधार घेत
उभा राहिलेला तो निर्जीव मांडव ..
उभा जन्म मसाईला सावली देता देता
स्वतःच वाळून गेलेलं ते लिंबाचं झाड ..
गेल्या अनेक वर्षांपासून शेतराखण करणारी
माईची ती दगडी समाधी ..
अन् पावसाळ्यात रों रों आवाज करत धावणारी
पण नंतर कोरडी पडणारी ती पैनगंगा ..
असं काय काय अन् किती किती...
हे सारं कित्येक वर्षे
काळजात सलतेय
अन्
शेताचा बांध
ते पुन्हा पुन्हा जिवंत करतोय...

**सचिन शिंदे**
**मुरली,उमरखेड**
**८४२१५२७५४२**

# मराठी भाषेची चिंता नकोच

श्रीकांत धोटे



कालपरवाच आपण मराठी भाषा दिन साजरा केला. गेल्या दोनचार दिवसात आपण मराठीचा केलेला प्रचंड जागर अभिमानास्पद असून मराठीच्या उत्कर्षच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. जगात बोलल्या जाणाऱ्या एकूण भाषांमध्ये मराठी ही दहाव्या क्रमांकाची भाषा आहे हे मराठीचा एक शिलेदार म्हणून भूषणावह आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याकरिता शासन, प्रशासन, साहित्यिक संघटन, विविध संस्था, मराठीचे हितचिंतक हे प्रयत्न करीत आहेत आणि त्या प्रयत्नांना लवकरच यश मिळेल याचे संकेत मिळत आहे. तो दिवस लवकरच उजाडावा ही आस आहे. हे सर्व सकारात्मक असले तरी काही प्रश्न, चिंता या सतत व्यक्त केल्या जात आहे त्या म्हणजे मराठीवर इंग्रजीचे आक्रमण, हिंदीचा शिरकाव, मराठी शाळा बंद पडणे, मराठी शाळांमध्ये कमी होत असलेली पटसंख्या, हे झालं तर मराठी कशी टिकेल, जगेल, मराठीचे भविष्य काय?, ती कशी जगवावी?, मराठीच्या संवर्धनाकरिता काय करावे? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे. मराठी प्रेमी म्हणून मराठीच्या प्रेमाखातर ते केले जात आहे. ते प्रश्न निर्माण होणे म्हणजेच आपण आपल्या मायबोलीसाठी किती संवेदनशील आहोत याचे द्योतक आहे.

मात्र खरंच मराठीची एवढी चिंता करणे आवश्यक आहे काय? यावर मला वैयक्तिकरीत्या एवढंच वाटतंय की चिंता वाटणं हे आपल्या जिवंतपणाचं लक्षण आहे. पण एवढी चिंता करण्याची गरज नसून मराठीस सर्वसमावेशक कशी करता येईल, तिला व्यापक कशी करता येईल याचे चिंतन करण्याची खरी गरज आहे.

आपण वारंवार मराठी शाळांचा विषय काढतो पण वास्तव विचार केल्यास आज जे वातावरण समाजात आहे, जी शिक्षणपद्धती सर्वव्यापक होत आहे त्यात इंग्रजी शिक्षणाशिवाय आपला मुलगा या स्पर्धेत टिकू शकत नाही हि जनभावना आहे आणि तिला आधार आहे. त्यामुळे त्यावर जास्त चर्चा करण्यापेक्षा किंवा त्यासाठी आपली शक्ती खर्च करण्यापेक्षा सर्व माध्यमाच्या महाराष्ट्रात असणाऱ्या प्रत्येक शाळेत पूर्वप्राथमिक पासून ते उच्चमाध्यमिक पर्यंत एक मराठी हा विषय सक्तीचा असावा. मग तो विद्यार्थी कुणीही असो, राज्यातला असो की परदेशातला. जर महाराष्ट्रात शिक्षण घ्यायचे असेल तर मराठी हा विषय शिकावाच लागेल. याप्रमाणे धोरण जर आखल्या गेले तर शिक्षणातून मराठी टिकेल ती व्यापक होईल आणि मग मराठीतून विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण शिकविता येईल पण त्यासाठी खूप तयारी करावी लागेल. विज्ञानातल्या सर्व इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द शोधावे लागतील त्यामुळे सर्व माध्यमाच्या शाळांमधून मराठी हा विषय सक्तीचा हे मला शक्य वाटते. त्यानुसार नियोजन आणि आपला आग्रह असायला हवा.

दुसरं महत्त्वाचं म्हणजे मराठी भाषा ही प्रमाणभाषेच्या नावाखाली बंदिस्त नसावी. नेमकी मराठी भाषा कोणती हा प्रश्न वारंवार कुणाच्याही मनात यायला नको. माझी भाषा मराठी नसून गावरान आहे हा न्यूनगंड निर्माण व्हायला नको, तो करायला नको. शहरात गेलो तर माझ्या भाषेला कुणी हसतील, मला गावंढळ म्हणतील, ही भीती प्रत्येक मराठीजनांच्या मनातून निघायला हवी. कारण आज याबाबत प्रचंड भीती ग्रामीणांच्या, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मनात दिसते आणि मग मी शहरात गेलो तर मला शहरासारखा बोलता आलं पाहिजे हा विचार मनात येतो. बोलता बोलता एखादी शब्द बोलीभाषेतील आला तर कसंतरीच होते. आणि बहुसंख्य मग शहरात गेले की शहरी मराठी शिकतात पण मग ते आपली बोली विसरून जातात. मला नाव आठवत नाही पण मी टीव्ही वर एका कार्यक्रमात एका ज्येष्ठ साहित्यिकांचे मत ऐकले आणि त्यांनी आपल्या संभाषणात बोलीभाषेमुळे आपली मराठी टिकून आहे असे एक विधान केले होते. ते खरे आहे. म्हणजे मला वैयक्तिकरीत्या तरी पटले आहे.

महाराष्ट्रात कुठेही जा दर दहा कोसाला म्हणजेच जवळपास २५ किमीला भाषा बदलत असते आणि हे सर्वांना लागू आहे. विदर्भ, मराठवाडा, कोंकण, खान्देश यापुरते हे मर्यादित नाही तर एका जिल्ह्यात भाषेचे दोन तीन चार प्रकारे बदलताना ती तुम्हाला दिसू शकते. ग्रामीण बोलीभाषेतील ते सर्व शब्द मराठीतच असतात ते त्यांच्या बोलीतल्या मराठीत असतात किंवा जर दुसरे भाषिक राज्य लागून असेल तर त्याचा प्रभाव असतो. जी मूळ प्रमाण मराठी आपण मानतो त्याशीच साम्य सांगणारे ते असतात फक्त जसेच्या तसे नसतात. बोलीभाषेतही असे किती शब्द असतात तर फार कमी असतात बाकी शब्द हे प्रमाणभाषेतीलच असतात. जसा आपण मला हा शब्द प्रमाणभाषेत मूळ शब्द मानू. या शब्दाला मले हा शब्द वऱ्हाडी, काही मराठवाड्यात, तर कोंकणात मना हा शब्द वापरतात. जसा कोथिंबिरीला विदर्भात सांबार

म्हणतात. विदर्भातल्या लोकांना सांबाराला कोथिंबीर म्हणतात हे माहीतच नाही. रात्रौ हा शब्द प्रमाणभाषेत मूळ शब्द आहे पण प्रमाणभाषा मानणारे सुद्धा हा शब्द रात्रौ असा ना उच्चारता रात्री असाच उच्चारतात. संपूर्ण महाराष्ट्रात हा शब्द रात्री असाच उच्चारतात मात्र फक्त झाडीत हा शब्द रात्रौ असा उच्चारतात. महाराष्ट्रातील आदिवासी बोलीभाषांवर सुद्धा मराठीचाच प्रभाव जाणवतो. कातकरी बोलीभाषेत कुठेला कुसं, केव्हाला कदवा, तुझीला तुनी, केवढाला कोडा असे मराठीशी साम्य दर्शविणारे शब्द वापरतात तर ठाकर या आदिवासी जमातीची बोली सुद्धा मराठीशीच साम्य साधणारी असून भाषेचा लहेजा फक्त वेगळा आहे. जसा प्रमाण मराठीत पांढरा या रंगासाठी धवल हा शब्द आहे. मात्र विदर्भात धवळा हा शब्द सर्रास वापरल्या जातो आणी तो बैलाकरिता जास्त वापरला जातो. लालसर पिवळा बैलास लाखा हा शब्द वापरतात मात्र इतरत्र कुठेही हा शब्द वापरातच दिसत नाही किंवा कोणत्याही रंगाकरिता वापरतांना दिसत नाही. मग एका रंगाचे ते नाव म्हणून आपण त्याला का स्वीकारू नये? कातकरी आणि ठाकुर या दोन्ही भाषेत पांढऱ्या रंगासाठी धवळा हाच शब्द वापरल्या जातो. त्यामुळे प्रमाणभाषेच्या जोखडातून बाहेर येऊन बोलीभाषेतील जे जे शब्द आहे त्याला प्रमाणभाषेचा दर्जा मिळणे आवश्यक आहे कारण अनेक पिढ्यानपिढ्या हे शब्द बोलले जात आहे त्यात कुठलाही बडेजाव नाही. हे शब्द अस्सल आहे. हे सर्व शब्द जर आपण स्वीकारले तर आपले शब्दभांडार समृद्ध होणार आहे. साहित्यिकांना लिहिण्याकरिता अनेक पर्यायी शब्द निर्माण होणार आहे. हे सर्वात महत्त्वाचे आहे. जसे १. बावळट, बह्याड, बायताड, पागल, म्याड, म्याट २. म्हटलं, मनलं, मतलं, बोललो ३. भाऊ, गडी, दादा, बंधू याप्रमाणे एकाच अर्थाचे शब्द आहेत पण ते क्षेत्रानुसार बोलले जातात याचा अर्थ एखादा शब्द श्रेष्ठ, कनिष्ठ होतो असं नाही तर त्या त्या भागात बोलीभाषेत त्याला अधिष्ठान आहे. ते अधिष्ठान आपण सर्वानी स्वीकारले पाहिजे तरच मराठी हि समृद्ध होणार आहे. मराठीचे काळजीवाहू म्हणून बोलीभाषेस योग्य अधिष्ठान प्राप्त करून दिल्यास मराठीचा झेंडा निश्चितच उंच फडकणार आहे.


मराठी साहित्यात ग्रामीण क्षेत्राचे योगदान हे अतिशय महत्त्वाचे आहे त्या ग्रामीण साहित्यिकांचा सन्मान त्यांना योग्य स्थान देणे आवश्यक आहे. आज ग्रामीण महाराष्ट्रात अनेक सकस, दर्जेदार लेखन करणारे साहित्यिक आहे पण साहित्याच्या क्षितिजावर त्यांना कुठेही संधी नाही. त्या सर्व साहित्यिकांना योग्य संधी देणे आवश्यक आहे. बोलीभाषेत आहे म्हणून ते नाकारणे बंद करावे लागतील. या महाराष्ट्रात प्रतिमाताई इंगोले संपूर्ण महाराष्ट्रातील बोलीभाषांची चळवळ चालवितात. हरिश्चंद्र बोरकरांसारखे साहित्यिक, कलावंत झाडीबोलीची चळवळ उभी करतात, दंडार या लोककलेस जिवंत करण्यासाठी धडपडतात, नीतिन देशमुखांसारखा कवी ज्याचा लिहिलेला प्रत्येक शब्द काहीतरी शिकवूनच जातो. गंगाधर मुटेसारखा माणूस शेतकरी साहित्याकरिता शेतकरी साहित्य चळवळ चालवितो. त्याची संमेलने घेतो. बंडोपंत बोडेकरांच्या 'खंजडी'तून अस्सल झाडीबोलीचे दर्शन घडते. अविनाश पोईनकर हा युवा साहित्यिक वास्तवाची पेरणी करतो. का. रा. चव्हाण, नरेंद्र इंगळे, किशोर बळी, यासारखे साहित्यिक वऱ्हाडीच्या संवर्धनासाठी कवी लेखकांना लिहिते बोलते करतात, तर लक्ष्मण खोब्रागडे हा युवा साहित्यिक अस्सल झाडीबोलीचा खजिना ज्याला म्हणता येईल असा 'मोरगाड' सारखा कवितासंग्रह जेव्हा लोकांसमोर ठेवतो तेव्हा मराठी भाषेची चिंता का असावी असा प्रश्न उभा राहतो.

गेल्या ५०/६० वर्षात भाषेच्या प्रचाराकरिता, बोलीभाषेच्या प्रचाराकरिता जे काम झाले नसेल ते काम गेल्या दोनचार वर्षात ॄर्ीिलश, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या माध्यमाचा सकारात्मक वापर करून कराळे सर, अमरावतीची धत्रझ फिल्म, विजय खंदारे, सोलापुरी, कोल्हापुरीॄर्ीिलश चॅनेल, कोकणातील कोंकण पुणे, कोकणातील विनायक माली यांचे चॅनल, खान्देशी बोलीभाषेकरिता असलेली चॅनेल यासारख्या माध्यमातून झालाय असा मी मानतो. त्यामुळे मला वैयक्तिकरीत्या भाषेची चिंता वाटत नाही मात्र तिला जगविण्याकरिता, समृद्ध करण्याकरिता आपल्याला व्यापक होणे आवश्यक आहे. बोलीभाषेचा स्वीकार करणे, बोलीभाषेत लिहिण्याबोलण्याकरिता प्रवृत्त करणे आवश्यक आहे कारण बोलीभाषा ही अस्सल आहे त्यामुळे अस्सल बोलीभाषेतून जर संवाद झाला तर तो निश्चितच प्रभावी होत असतो आणि त्या बोलीभाषेतून निर्माण होणारे साहित्य सुद्धा अस्सलच असणार आहे.बोलीभाषा जगविण्याकरिता जे प्रयत्न करीत आहे त्यांचाही सन्मान व्हायला पाहिजे. काही इंग्रजीचे शब्द मराठीत येतील काळानुसार ते एकरूप होतील त्यांना पर्याय शोधण्याचा प्रयत्न करूया. ज्ञानेश्वरीतील मराठी आणि आजची मराठी यात जो फरक आहे तोच फरक मराठीचे बाबतीत भविष्यातही राहणार आहे पण त्याचं ओझं मानून घेण्यापेक्षा सकारात्मकता पेरणे व संवर्धनासाठी प्रयत्न करणे, जे करत आहे त्यांचा आदर सन्मान करणे इतके जरी आपण करू शकलो तरी मराठीची चिंता करण्याचे कारण दिसत नाही. मराठी जगेल आणि मानाने जगेल याबाबत माझ्या मनात तीळमात्र शंका नाही.

**श्रीकांत धोटे, ८०८७३३२५९३**

# मोटर सायकलशी लग्न!

**विनय मिरासे 'अशांत'**



**रीती-रिवाज**

त्या दिवशी त्या गावात सगळीकडे एकच चर्चा! साऱ्यांचा एकमेकांना एकच प्रश्न- 'कितीवर जुटली. कितीवर तुटली!' बैठकीच्या बाहेर उभा राहून कानोसा घेणारा एखादा शेजारी-बाहेर येऊन जवळच्या कुणाला तरी सांगायचा- 'पाव्हने सव्वा दोनवर अडून बसले अन वरून पाच तोळे सोनंही मांगत आहेतं' मग साऱ्या गावभर हीच चर्चा! जणू गावाला दुसरं कामच नाही!. मग थोड्या वेळातच बातमी यायची, 'पाव्हणे दोन पर्यंत उतरले आहेत, पाचच्या ठिकाणी चार तोळे सोनं मागताहेत'... गावच्या बऱ्याच लोकांना वाटलं- 'गडपायले पाटला कडची ही सोयरिक मोडते. चांगला शिकलेला शंभर-दिडसे एकर जमिनीचा हिस्सेदार असलेला वजनदार पोरगा - पाटलाच्या हातून जाते' - दुपारी बारा वाजता सुरू झालेली, सोयरिकीच्या फायनलची ही बैठक - सेमी फायनल म्हणून तुटते कि काय - असंही काहींना वाटून गेलं. पण सायंकाळी पाच वाजता बातमी आली. 'सोयरिक जुटली. गडपायले पाटलानं गड जिकला'.

पोरगा सरकारी नवकरीत नाही, या अडचणीमुळे पोराकडच्या लोकायनं - अडून घेतलं नाही. दीड लाख हुंडा नगदी- पोरीच्या आंगावर तीन तोळे सोनं पोराले चार ड्रेस, दोन आंगठ्या, एक गोफ आन एक मोटार सायकल - एवढ्या वर सोयरिक पक्की झाली. तिकडे सोयरिक झाली, पन्नास साठ लोकांची सुग्रास जेवणाची पंगत बसली अन गावात-घरा-घरात, चौका-चौकात चर्चा रंगली. ''बापरे, का हुंडा होये का काय व्हये! गडपायले पाटलाले तर पार वरपूनच टाकलं, पाव्हन्यायनं! पाच लाखात तं हुंडाच जाते अन पाचेक लाख लग्नाचा खर्च येते. आजून दोन पोरी उजवाच्या हायेत! मंजे इका लागते पाटलाले चार पाच एकर जमीन'' - चौकातला सायंकाळच्या गप्पांच्या अड्यातला एक जण म्हणाला. ''जमीन कायले इका लागते बे! पाटलाजवळ का तेवढा पैसा नायी का!'' ''हौ, बरोबर हाये भाऊ तुमचं, पाटील का आजचाच शिरिमंत हाये का, त्याले काय पैशाले कमी हाये - आता पाहातच राहा तुमी, पाटील कसा धुमधडाक्यात लगन करते - या पोरीचं'' पुन्हा एकजण. हे सर्व तिथं उभा असलेला- शहरात मोठ्या कॉलेजात शिकत असलेला - एक शिक्षित युवक ऐकत होता. तो म्हणाला ''अहो पण - या श्रीमंत लोकांचं पाहून गरीबांनीही हुंडे मागायला सुरूवात केली तर! गरीबांनी कुठून आणायचा पैसा? मग गरीबांच्या पोरींची, लग्ने कशी होतील?'' - यावर सर्वांनी हसून घेतलं. ''आरे, गरीबायनं हुंडे मांगतले तर, असं कायले मंत बाबा! गरीबयी आता हुंडे मांगूनच रायले ना! तू हाये कुठं आजून!'' आणखी बरेच बोलून, चौकातली ती गप्पांची बैठक संपली. गाव पुन:पुन्हा पाटलाने दिलेल्या हुंड्याची चर्चा करीत होतंच.

आता साऱ्यांचं, लग्नाची वाट पाहाणं सुरू झालं. होता होता - लग्नाचा दिवस उजाडला. गडपायले पाटलांचे व्याही - तीन-चारसे लोकांची वरात घेऊन दिमाखदार चारचाक्यांमधून लग्न स्थळी हजर झाली. शिवाय त्यांच्या परिचयाच्या लोकांच्या इतर गाड्या गाड्याच गाड्या. साऱ्या चारचाक्या अन दोन चाक्या. लग्न समारंभ गावातल्या हायस्कूलच्या मैदानात. गडपायले पाटलांच्या इतर दोन मुली आणि दोन मुले जिवाचे रान करून लग्न कार्यात राबत असलेले. गावालाही झाडून आमंत्रण. सारा उत्साह, धावपळ, आनंद आणि उत्सुकता. लग्नाची वेळ जवळ येत चाललेली. सारे उत्सुक. अन तेवढ्यात वराच्या जानवशाकडून बातमी आली 'नवरदेव बुवा रूसले, मोटार-सायकल भेटली नाही मनून'. झालं, जळणाऱ्या लाकडांवर पाणी पडावं अन ती विझावी, तसे सारे विझले.

हजाराच्या गर्दीचा, तो मांडव एकाएकी गप्पगार झाला. नवरी कडले चार-पाच लोक - जिल्हा परिषद शाळेच्या त्या जानवश्यावर गेले. ''मोटार सायकल आमी लग्नातच देणाराच होतो, पण बुकींग करूनयी गाडी आली नायी?'' - एकजण म्हणाला. ''लग्न कार्य पार पडू द्या. आठ-दहा दिवसात आमी नवी कोरी मोटार सायकल घेऊन - तुमच्या वाड्यासमोर हजर होतो.''-- दुसरा बोलला. ''मोटार सायकल आली नायी मनून का लगन मोडाले निंगाले का हो? वा रे वा! भलतेच दिसता'' - आणखी एकजण, थोडासा उसळून बोलला. आत्तापर्यंत सारं निमुटपणे ऐकणारी - नवदेवाकडची मंडळी याबरोबर उसळली. सारे जण एकाच वेळी बोलू लागले. काहिंनी तर गडपायले पाटलांना अन त्यांच्या पोरांना शिव्या द्यायलाही सुरूवात केली. नवरीकडचे लोक मात्र आता गप्पगार! वातावरण एकदम टाईट! सारे जण ताणात! लग्नाचा मुहूर्त टळून गेलेला. नवरी मुलगी - सरला - हायस्कूलाच्या एका खोलीत नवरीच्या साजात रडत असलेली. साऱ्यांच्या चेहेऱ्यावर चिंता. शेवटी हो - नाही करता करता - मोटार सायकलची त्यावेळेची पूर्ण किंमत पासष्ट हजार-इकडून तिकडून जमवून गडपायले पाटलांनी नवरदेवाच्या हातात ठेवली. तेव्हा नवरदेव लग्नाला तयार झाला.

अन नवरदेवाचं - न आलेल्या मोटार सायकलशी लग्न लागलं. मोटार सायकलशी? होय. मोटार सायकलशीच! तरण्या-ताठ्या, देखण्या, सुस्वभावी सरलाशी त्याला काय देण-घेणं होतं! लग्नानंतर बुक केलेली मोटार सायकल घरी येताच, अगोदर दिलेले पासष्ट हजार रूपये, परत करण्याची कबुली नवरदेवाने अन त्याच्या वडिलांनी, भावांनी दिली होती. पण लग्नानंतर ते लोक, हे साफ विसरले त्यांनी पासष्ट हजार रूपये घेतल्याचेच नाकारले. गडपायले पाटील गप्प बसलेत. त्यांना, आणखी दोन मुली उजळायच्या होत्या म्हणून! हे असं सारं! माणसांची किंमत न करणारं! माणसांचा, नव्हे माणुसकीचा बाजार भरवणार! एकमेकांच्या गरजांचा अमानुष गैरफायदा घेणं! वस्तुंच्या बाजारात, वस्तू उच्च दर्जाची असेल तर तिची किंमत जास्त. पण या बाजारात-केवळ उतरणाऱ्याचीच किंमत चढलेली! शिवाय किंमत कमी आली म्हणून - पुन्हा पुन्हा ती वाढवून थकित बाकी मागणं! अन ती न आल्यास जिवंत मुलगी जाळणं! आजपर्यंत किती मुली गेल्या असतील बळी! पण ह्याची कुणाला ना खंत, ना खेद! कुठवर चालायचं हे असं? मुलींसाठी भरमसाठ पैसा देऊन मुलं विकत घेणं! माणसाला वस्तू बनविणारी ही क्रूर व्यवस्था नष्ट नाही का व्हायची? माणसाची, माणूसकीची आणि लाज-लज्जेची, ही क्रूर छळ -यात्रा थांबायला हवी! माणसाला माणूस मानून साऱ्यांनी जगायला हवं! होय ना!

**विनय मिरासे 'अशांत'**
**यवतमाळ.**
**मो. ९४२०३६८२७२**

# अनाथांची आई सिंधुताई

**सतीश मानकर**





आजवर आपल्या राष्ट्रभूमीत स्वकर्तृत्वाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविणारे महान थोर असे अनेक व्यक्तिमत्त्व होऊन गेलेत. असेच एक महिला व्यक्तिमत्त्व आपल्या महाराष्ट्र राज्यात होऊन गेले त्यांना संपूर्ण विश्व अनाथांची माय म्हणून ओळखतात.

अनाथाची माय सिंधुताई सपकाळ यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४७ रोजी महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील नवरगाव येथे झाला. जन्मापासूनच त्यांच्या वाट्याला कधी प्रेम, जिव्हाळा किंवा सुख आले नाही कारण त्यावेळी असलेली मुलगा-प्रधान संस्कृती होय. वडील श्री अभिमान साठे यांचा गुरे पाळण्याचा व्यवसाय होता त्यामुळे बालपणापासूनच चिंधीला म्हणजेच सिंधुताईला गुरे चारायला न्यावे लागत होते. बालपणी सिंधुताईला सर्वजण चिंधी या नावानेच बोलवायचे. सिंधुताईच्या घरी शैक्षणिक महत्त्व कसे म्हणून नव्हते त्यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्षच झाले तरी पण सिंधुताईंनी कसेबसे चौथीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यावेळी समाज मुलींनाच महत्त्व देत नसत तर मग त्यांचे शिक्षण दूरचीच बाब होती. त्यावेळी समाजात असलेली बालविवाह प्रथा सिंधुताईला सुद्धा नडली आणि त्यांच्या वडिलांनी त्यांचा बालविवाह वयाच्या नवव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी लावून दिला. त्यामुळे बालवयातच सिंधुताईवर संसाराची जबाबदारी पडली.

सिंधुताईच्या सासरीही माहेरपेक्षा काही भिन्न परिस्थिती नव्हती. सासरीही त्यांच्या वाट्याला प्रेम, जिव्हाळा किंवा सुख आले नाही. सिंधुताईच्या पतीने त्यांना समजावून घेतलेच नाही. बाल सिंधुताईच्या विचारांना आणि त्यांच्याकडे असलेल्या बुद्धिमत्तेला दुर्लक्षितच राहावे लागले. सिंधूताई काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न कुणीच केला नाही. पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये त्यांच्या पतीकडून मिळणाऱ्या अविवेकी वागणुकीचा खूप त्रास सिंधुताईला सहन करावा लागत होता. शेवटी सिंधुताईच्या पतीने त्यांना सोडून दिले. नवऱ्याने सोडून दिल्यावर सिंधुताईंना कुणाचाच आधार राहिला नाही. अगदी माहेरच्यांनी सुद्धा त्यांना आधार दिला नाही. दोन वेळेची भूक भागविण्यासाठी व पोटाची खळगी भरण्यासाठी सिंधुताईंना भीक मागण्याशिवाय काही पर्याय नव्हता आणि त्यांनी भीक मागून उदर निर्वाह करणे सुरू केले. रेल्वे स्थानकावरून रेल्वेत बसून गाणी म्हणणे व मिळालेल्या पैशातून भूक भागविणे असा उपक्रम सुरू असतानाच इतर छोटी-छोटी मुले जी अनाथ होती ती सुद्धा रेल्वेत भीक मागत होते. ही मुले सिंधुताईच्या दृष्टीस पडत होती. त्या छोट्या अनाथ बाल मुलांना आधार देणे सुरू केले आणि इथूनच सिंधुताई अनाथांची माय व्हायला सुरुवात झाली.

जे दुःख सिंधुताईंच्या नशिबी आले ते या अनाथ मुलांच्या वाट्याला न यावे या विचाराने त्यांनी अनाथ मुलांचा आधार बनण्याचा दृढ संकल्प केला. अनाथ मुलांचे संगोपन, शिक्षण, त्यांचे भविष्य घडविण्याच्या विचारातून सिंधुताईंनी १९९४ मध्ये 'ममता बाल सदन 'नावाची पहिली समाजसेवी संस्था पुणे जिल्ह्यातील पुरंदर जवळील कुंभारवळण येथे उभारली. यानंतर सिंधुताईंनी अनेक सेवाभावी संस्था उभारल्या. त्यातील एक म्हणजे वर्धा येथे असलेली 'अभिमान बाल भवन -वर्धा' होय. सिंधुताईंनी आधार दिलेल्या अनेक अनाथ मुलांपैकी कितीतरी विद्यार्थी आज उच्च विद्याविभूषित आहेत. अनेक जण डॉक्टर इंजिनिअर बनले.आता सिंधुताई सपकाळ हे नाव एक महान थोर समाजसेविका म्हणून विश्व पटलावर उमटले होते. सिंधुताईंच्या संघर्षमय कार्याची ख्याती जगभर पसरली. सिंधुताईंच्या अदम्य, अद्भुत, महान कार्याची दखल अनेक विश्वविख्यात संस्थांनी व शासनाने घ्यायला सुरुवात केली. सिंधुताईंच्या अभिमानास्पद कार्याचा गौरव व्हायला लागला. सिंधुताईला जीवनात अनेक पुरस्कार मिळाले. २७० पेक्षा जास्त राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारने सन २०२१ चा पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित केले.

सिंधुताईचा जन्म अतिसामान्य कुटुंबात झाला. परिस्थितीही प्रतिकूल होती. त्याच सिंधुताईंनी जगाला दाखवून दिले की जन्माने कुणी सान-थोर होत नसते तर कर्माने मोठे होत असते. महिला सुद्धा आपलं नाव विश्वपटलावर कोरू शकते हे सिंधुताईंनी सिद्ध केले.कठीण, कठोर प्रसंगातून मार्ग काढीत सिंधुताईंनी न खचता धैर्य, हिंमत व सहनशीलता दाखविली ती सर्वांसाठी प्रेरणा बनून आज काम करीत आहे आणि पुढेही काम करीत राहणार. स्त्रीशक्तीची खरी ओळख घडवून देणारे प्रज्वल व्यक्तिमत्त्व म्हणजे सिंधुताई सपकाळ होय. कोणत्याही व्यक्तीला परिस्थिती किंवा संकटे थांबवू शकत नाही याचे उत्तम आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे सिंधुताई सपकाळ होय. जन्मापासून प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत व परिस्थितीवर मात करत पुढे मार्गक्रमण कसा करायचा ही सिंधुताईंनी समाजाला दिलेली देणगी आहे. सिंधुताईकडून आपल्याला घेण्यासारखे, शिकण्यासारखे भरपूर काही आहे. सिंधुताई कर्तृत्वाने महान तरीही त्या एका मुलाखतीत म्हणाल्या होत्या की इथे मोठे होण्यासाठी मरावे लागते. कदाचित सिंधुताईंना सुचवायचे असेल की मोठे होण्यासाठी अपार कष्ट हाल-अपेष्टा सहन करावे लागतात. मरणासम परिस्थितीतून जावे लागते किंवा सिंधुताईंच्या मनात असलेली खंत समाजाला सुचवायची असेल.

सिंधुताईंच्या जीवनपटातून मिळालेली ऊर्जा आपणा सर्वांना सदोदित ऊर्जावान करून परिस्थितीशी संघर्ष करण्याची अविरत प्रेरणा देत राहणार आहे.

**सतीश मानकर**
**आर्वी छोटी, वर्धा**

## लेक

**खुशाल गुल्हाणे**



**मृदगंधा**

लेक उल्हास आनंद
देवी लक्ष्मीचेच रूप,
घेई जन्म ज्यांच्यापोटी
भाग्यवंत मायबाप.

राबे घरासाठी सदा
नाही कंटाळा कामाचा,
काया नाजुक साजरी
येई सुगंध घामाचा.

माया आईची देणारी
लेकीविना नाही दुजी,
नाती तपासून पहा
बाकी वाटतील खुजी.

घर लेकीच्या हास्याने
होई बोलके प्रसन्न,
लेक रूसता बापाच्या
हातातून गळे अन्न.

घरी दुसर्या जाणार
लेक आपली लाडकी,
शब्द पडताच कानी
भरे बापास धडकी.

होता पोरीची पसंती
सुटे माऊलीचा धीर,
बाप तुटतो आतून
असो कितीही खंबीर.

लेक कुणा दुर्भाग्याचा
ठरे कारण तापास,
'कन्यादान' सुख मोठे
देई मुलगी बापास.

लेक जळे दोन्ही घरी
जसा कापूर नि राळ,
ठेवी कुटुंब सुखात
यत्ने सदा सर्वकाळ.

लेक जीवनी उजेड
टाकी उजळून घर,
जपा सदैव लेकीस
पुढे चालाया संसार.


**खुशाल गुल्हाणे**
**साईनगर, अमरावती.**
**भ्रमण.** ९४०३०१९७९५


## तू नसल्यावर....

**अनिकेत देशमुख**



**मृदगंधा**

हसरे अंगण घरात घरपण तू असल्यावर
जगण्याची बघ होते लाही तू नसल्यावर...

अबोल भिंती खिडक्या दारे वारा अबोल होतो
पाखरांचीही किलबिल सूनी तू नसल्यावर...

रूसून बसते रंदावन अन् माजघरही सुने
श्वासांची वहिवाट बदलते तू नसल्यावर...

विरह तुझा मज जाळू लागतो क्षणोक्षणी
घरभर पसारा मी सैरावैरा तू नसल्यावर...

जीवनाचा या पळस फुलला तुझ्या साक्षीने
श्रावण वसंत नीरस वाटतो तू नसल्यावर...

आणाभाका वचने सारी अधुरीच राहिली
हुंदके उसासे उरलेत बाकी तू नसल्यावर...

तू असतांना जगण्यामध्ये अवीट गोडी होती
मरणही आता बेचव झाले तू नसल्यावर...


**अनिकेत जयंतराव देशमुख**
**गोपालखेड, जि. अकोला ४४४००६**
**मो.-९६८९६३४३३२**

## व्यथा
**निलेश तुरके**



**मृदगंधा**

तिच्या शरीरावर बोललं की
तिला ट्रोल केल्या जाते
प्रश्न अस्तित्वाचा आला की
मात्र स्क्रोल केल्या जाते..

लाज लज्जा संकोच
तीनेच का पाळावेत
काय घालावे काय नको
लोकांनी का ठरवावेत..

मर्दाना औषधींच्या जाहीराती
इथे भिंती भिंतीवर दिसतात
तिच्या अंर्तवस्त्राबद्दल बोलले
की लोकं तोंड का वासतात..

स्त्री लैगिंकतेच्या शिव्या
चौकाचौकात दिल्या जाते
स्त्री पुरुष समानतेच्या नावाखाली
मात्र पुन्हा तिलाच जुंपल्या जाते...

महिला दिनीच फक्त
तुम्ही तीचा उद्धार करता
बाकी दिवशी मग
तीला पायदळी धरता..

संस्कृतीने नटलेल्या देशात
लिंगभेदाला का स्थान आहे ?
पुरुषाइतकाच स्त्रिलाही
सर्वोच्चतेचा मान आहे..!!

**– निलेश दिगंबर तुरके**
**आटमुर्डी, यवतमाळ**
**मो. ७७४१८७७१७४**

## बोंडसड
**रंगनाथ तालवटकर**



**मृदगंधा**

कर्जातल्या जिंदगीला
सावरू मी कसा
संकटाच्या मालिकेला
आवरू मी कसा
जपून पोटच्या पोरावानी
समदं काही केलं
नगदी पीक कापसाचं
बोंडसडीने मेलं
बोंड अळीच्या नावानं
नुसता गाजावाजा
फवारणीचा फायदा नाही
वाढत चायलाय बोजा
बोंडसडच मुख्य असून
लक्ष नाही दिलं
बोंडअळीच्या कांगाव्यात
पीक हातून गेलं
औषध नसेल हमखास
औषध तरी काढा
दिवाळीतही कापसाविना
सुनसान दिसतोय वाडा
खर्च तर सोडाच साहेब
समदं बियाणंही गेलं
जगाच्या या पोशिंदयानं
सांगा पाप काय केलं
दिस-रात्र ऊन-पाऊस
सदैव डोक्यात असतं पीक
बोंडसड आहे केव्हापासनं
अजूनही झालं नाही लीक
औषध मिळेल हमखास
अजूनही आस आहे
रक्तात आमुच्या अजूनही
मातीचाच श्वास आहे

**– रंगनाथ तालवटकर**
**चिखली (कोरा) जि. वर्धा**
**मो. ७३८७४३९३१२**

BSE
INVESTORS' PROTECTION FUND

# तुमची गुंतवणूक कशी सुरक्षित करावी?

**तपशीलावर व्यवस्थित लक्ष द्या.
गुंतवणूक करण्यापूर्वी कंपनीची
विश्वसनीयता तपासून घ्या.**



केवळ शेयर्सची किंमत पाहून
गुंतवणूक करू नका.
गुंतवणूकीचा निर्णय घेण्यापूर्वी
कृपया कंपनीच्या फंडामेंटल्सचा
अभ्यास करा.

**इन्व्हेस्ट राइट तर फ्यूचर ब्राइट**

सुरक्षित गुंतवणूक पद्धतीविषयी अधिक माहितीकरिता भेट द्या: https://bseipf.com/doandonts.html

Ankur®

सन १९७६ पासून

# अंकुर सीड्स ची वचनबद्धता ...

## नाविन्यपूर्ण संशोधन, शेती मार्गदर्शन, शेती विकास व गुणवत्ता !



**प्रमुख उत्पादने**

### संकरित

**बोलगार्ड कपाशी** : ३०२८, जय, किर्ती, हरीश
**धान** : ७४३४, ७५७६, ७८८, १३५५५ **मका** : भानु, भास्कर, **बाजरी** : ०४५
**टोमॅटो** : रणवीर, श्री, ३६८९ **मिरची** : ९३०, अमिशा, सारंगी, मोनिका
**वांगी** : राकेश, किर्ती, उत्कर्ष, विजय **वाल** : डॉली, ४२७
**दुधीभोपळा** : १५८, नटवर, अमित **भेंडी** : २३३८, सिध्दी, ईशानी
**कारले** : करिश्मा, श्रीधर, टिल्लू, गिरीजा **टरबूज** : शुगरक्युब, सरस, ब्लॅक बॉल
**काकडी** : निराली, आलिया, जीनत

### संशोधित

**धान** : सोनम गोल्ड, पूजा गोल्ड, शतायु, एकवीरा, श्री-१०१, याराना
**सोयाबीन** : प्रभाकर, अग्रेसर **गहू** : केदार, शिवा **तुर** : चारू, प्रभा
**चवळी** : गोमती, व्ही.यु.-५, हरी, केतकी **वाल** : ऋतु, गोल्डी **वाटाणा** : राजस

www.ankurseeds.com

अंकुर सीड्स विश्वासाचे प्रतीक !